शनिवार । ८ फेब्रुवारी १९७५
एक रुपया
माणूस

# आता ६ मार्च, दिल्ली कार्यक्रमाच्या तयारीला सर्वांनी लागावे

श्री. संपादक माणूस यांसी, बिहार संघर्ष सहाय्यक समितीचे एक चिटणीस श्री. अण्णा जोशी यांचे 'मानपत्राचा गोंधळ का झाला?' हे पत्र आपण (मागील अंकी) कोणत्या हेतूने छापलेत याचा उलगडा होत नाही. तथापी पत्र छापायचेच होते तर त्याच अंकात माझा खुलासा छापणे औचित्यपूर्ण झाले असते. समितीचे एक कार्यकर्ते व माझे मित्र म्हणूनही ते आवश्यक होते.

श्री. अण्णा जोशी यांनी काही गोष्टी लिहिण्याचे का टाळले कळत नाही. त्या मी मांडतो.

१. समितीत विविध विचार व प्रवृत्ती असल्याने सर्व संमतीने ठरले तेच कार्यक्रम घ्यावे लागले. २. युवक आघाडीची जबाबदारी डॉ. लिमये व श्री. अण्णा जोशी या दोघांकडे होती. ३. युवक आघाडीत मानपत्र समितीप्रमाणेच युक्रांद, समाजवादी युवजन सभा, राष्ट्रसेवा दल, जनसंघ युवक आघाडी इत्यादीही संघटना होत्या. ४. युवक मेळाव्याची जबाबदारी युवक आघाडीकडे होती. ५. मानपत्राच्या कार्यक्रमावर सुरवातीपासून तीव्र मतभेद होते. ते मतभेद जोशी-लिमये मिटवू शकले नाहीत. ६. युवक मेळाव्यात मानपत्र वाचण्याचा कार्यक्रम असावा याबाबत मी सर्वांचे मत कळविले होते. ७. युवक मेळाव्यात अण्णा जोशींनी मानपत्र वाचण्यास डॉ. लिमये व त्यांच्या मताच्या युवकांचा विरोध नव्हता. उलट मानपत्र समितीचा विरोध होता. ८. विशिष्ट नावाच्या आग्रहाबाबत युवक आघाडीत मतभेद होते. ९. महापौरांचा एक हार असावा हा निर्णय समितीचा होता; एकटचा महापौरांचा नव्हता आणि तसे स्टेशन व्यवस्थेची जबाबदारी असणाऱ्या डॉ. लेलेंनीही विद्यार्थ्यांना सांगितले होते. १०. जेपींनी सांगितले म्हणून नव्हे तर महापौरांनीच श्री. मुंडे यांना ओढून आत घेतले, हेतु हा की गोंधळ मिटावा.

आता खोटेपणाच्या आरोपाबद्दल. हा आरोप मी क्षणभरही स्वीकारू शकत नाही. जेपींनी हाती घेतलेले भेंडोळे मागे फेकले तेव्हा ते मानपत्र आहे हे त्यांना माहीत नसणे स्वाभाविक आहे. नंतर त्यांनी ते उचलून ठेवले. पण त्यांनी मानपत्र मागे डब्यात टाकले तेव्हा 'तरुण भारत'चे प्रतिनिधीही जवळच उभे होते. मी जेपींवर खोटेपणाचा आरोप करू इच्छित नाही; पण मीही तो आरोप सहन करणार नाही. अन्य हेतूसाठी ज्यांना असा आरोप करणे आवश्यक वाटत असेल त्यांनी तो हवा तर करावा.

आता माझ्याबद्दलच्या आकस, अरेरावी, दुराग्रही, खुनशीपणा इ. शब्दप्रयोगाबद्दल. कधीतरी सदसद्विवेकबुद्धी जागृत झाल्यावर हे वारेमाप शब्द परत घेतले जातील अशी मला आशा आहे. सार्वजनिक जीवनात क्षणिक मोठेपणा मिळविण्यासाठी सहकारी पक्षातील मित्रांवर दुगाण्या झाडणे ही माझी रीत नाही.

समितीच्या कार्यकर्त्यांना मी अशी विनंती करीत आहे की कोणत्याही हेतुसाठी का होईना, असे वाद वाढवून त्यांनी समितीच्या कामात अडथळे आणू नयेत व आता ६ मार्चच्या दिल्ली कार्यक्रमाच्या तयारीस लागावे. कळावे.

२।२।७५

—भाई वैद्य

[ १ : अण्णा जोशी यांचे पत्र छापण्याच्या हेतूत उलगडा न होण्यासारखे काही नाही. वाद वृत्तपत्रातून चालूच होता. तो वेडयावाकडया स्वरूपात लोकांसमोर येण्यापेक्षा मूळ आहे तसा यावा हा स्पष्ट हेतू पत्र छापण्यामागे होता. २ : एकदा पत्र छापायचे ठरल्यावर मूळ पत्र व आपला खुलासा एकाच अंकात यायला हवा ही आपली अपेक्षा अयोग्य नसली तरी त्रासदायक जरूर आहे. जागा, वेळ, वगैरे गोष्टींचाही औचित्यात समावेश होतो. ३ : आपला मित्र, समितीचा एक कार्यकर्ता म्हणून मलाही आपल्याप्रमाणेच हा वाद येथे थांबावा, सर्वांनी ६ मार्चच्या दिल्ली कार्यक्रमाच्या तयारीला लागावे असे वाटते. आपण, 'मानपत्र जेपींनी भिरकावले' वगैरे वृत्तपत्रांना काहीच सांगितले नसते तर हा वाद कदाचित् उद्भवलाच नसता. इतर वाद नाही का आपण आपापसात विचारविनिमय करून मिटविले?

—संपादक ]

# सा प्ता हि क मा णू स

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ८ फेब्रुवारी | अंक : सदतिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


८–९ फेब्रुवारीला पालघर तालुक्यातील दामखिंडला 'ग्रामायन' संस्थेचे विभागीय शिबीर होत आहे. यानिमित्त दामखिंडच्या कामाची कल्पना आणून देणारा हा लेख.

# दामखिंडला आम्ही काय करीत आहोत?

## आबा करमरकर

पंधरा मे १९७२ पासून गेली २।। वर्षे मनोर वन्य गटात आर्थिक विकासाचे कार्यक्रम आम्ही अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. बहुतेक सर्व वस्ती आदिवासी आहे. शाळा बंद आहेत. त्यामुळे चालू पिढीही अशिक्षितच रहाणार आहे.

भयानक दरिद्रय आहे. दोन वेळचे जेवणही बहुसंख्य लोकांना मिळत नाही. जे जेवण म्हणून असते त्यात भरण पोषणाला आवश्यक तो सकस आहार वगैरे तर दूरच. पण नुसती अंबील पिऊनच दिवस काढावे लागतात. उपासमार ही नित्याची बाब आहे. पांडू बरक अगदी रंगात येऊन त्याची महत्त्वाकांक्षा सांगत होता, की त्याच्या मुलांना काही झाले तरी २ दिवसापेक्षा जास्त दिवस उपास पडणार नाहीत हे तो पहातो. तर लक्ष्मण भुयाल सांगत होता की त्याने पिकविलेले सर्व भात पाले मोडीवर सावकारांना द्यावे लागते, आपण नालायक आहोत, आपल्या बायका पोरांना जेवायला घालू शकत नाही. म्हणून रात्री झोप लागत नाही आणि रडू कोसळते. आणि जर अशा एखाद्या वेळी त्याची बायको जागी झालीच आणि त्याला विचारू लागली की काय झाले? रडतोस का? तर 'फार वाईट सपान पडला, भ्या वाटला' म्हणून सांगून वेळ मारून न्यावी लागते.

उपासमार, दारिद्रय, याचबरोबर भयंकर शोषण आहे. १० रुपये कर्जाऊ आणले तर तीन महिन्यात ४५ ते ५० रुपये किंमतीचे भात द्यावे लागते. ५ रुपयास तीस रुपये किंमतीचे गवत द्यावे लागते. अशा व्यवहाराला पालेमोड म्हणतात. त्यात व्याजाचा दर दरसाल दर शेकडा ८०० ते १२०० रु. पडतो.

अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचा भयावह पगडा आहे. मर्तिकावर २००–३०० रु. खर्च करावेच लागतात. लग्नाला ८००–१००० रु. कर्ज काढूनच खर्च करायचे असतात. ते न करून चालतच नाही.

दारू हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. देवाचा प्रसाद म्हणून गावची देवयात्रा करतात. तेव्हा अगदी लहान मुलापासून प्रसाद म्हणून दारू पिण्याचे शिक्षण मिळते. लग्न, सण, गावजमा, माणसांचे दिवस, पानं, दारू ही असायलाच हवीत.

शेतीत कसेतरी एकमेव भाताचे पीक घेतात. ते सुद्धा अत्यंत अल्प येते. सरासरीने एकरी २०० किलो भाताचे उत्पन्न जेमतेम येत असावे.

खायलाच पैसा नाही तेव्हा अंगावर कपडा असा फारसा असतच नाही. घरे म्हणजे नुसत्या झोपड्या. आतून अगदी रिकामी. भांडी कुंडी फारशी नाहीत.

जातिप्रथेचा– वारली, कोळी, काथोडी, वंजारी, कुणबी प्रभाव फारच आहे. स्त्रीला जीवनात एखाद्या निर्जिव वस्तु पलीकडे मुळीच किंमत नाही. तिला अक्कल नसतेच असा ठाम विश्वास असतो. आणि त्याबद्दलची स्त्रीचीही खात्री पटलेली असते.

काम करायला उपयोगी पडतात एवढीच पोरांची व बायकांची किंमत असते. म्हणून दोन लग्ने व ८–१० पोरे ही सर्वसाधारण प्रत्येक घरी असतातच. औषधोपचार म्हणजे भगत खेळवणे, अंगारा, धुपारा. त्यामुळे मृत्यू हाच रोगावरचा परिणाम कारक इलाज.

बहुसंख्य आदिवासींजवळ थोडी–थोडी जमीन आहे. किमान ७० टक्के रहिवाशांजवळ तरी जमीन आहे. भूमिहीन शेतमजुरांची संख्या शेतजमिनी असणारांच्या मानाने कमी आहे. पोटातील भुकेपेक्षाही जमिनीची भूक फार तीव्र आहे. जमीन असणे म्हणजे उपासमारीविरुद्ध थोडी तरी शाश्वती असे त्याला वाटते. मग त्या जमिनीत काही पिकले नाही तरी चालेल. जमीन कसणूक ही नेहमीच आतबट्ट्याची असते.

ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन शास्त्रीय शेती उत्पादनाला अग्रक्रम द्यायचे असे ठरविले. बहु उत्पादनाच्या भाताच्या लागवडीमुळे पीक एकरी १२०० ते १५०० किलो येऊ शकते. हा आमचा अनुभव जमेस धरून, शास्त्रीय भातशेती लागवडीची सुरुवात, काही शेतकऱ्यांना करण्यास आम्ही उद्युक्त केले. त्या उत्पादन व्यवस्थेचे सर्व बारीक सारीक जमाखर्च ठेवून, उत्पादनवाढ करून गरिबी कमी करण्याबरोबरच आमचे शिक्षणही चालू ठेवले. शेती हा नफा देणार धंदा करण्याचा आमचा प्रयत्न राहिला.

अशा बहुउत्पादनाच्या भात लागवडीमध्ये रसायनिक खताचा वापर फार मोठ्या प्रमाणात करावा लागतो. पाण्याची हमी पावसाळ्यातही लागते. पाऊस फारच लहरीने पडत असतो. दर

वर्षी ८–१० दिवसांचा खंड हमखास पडतो. त्यावेळी भात पिकाचे फारच नुकसान होते. ते टाळण्यासाठी पाण्याची व्यवस्था हा आमच्या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. गेल्या ३ वर्षांची पाऊस पडण्याची नोंद आम्ही ठेवली आहे. दरवर्षी केव्हाना केव्हातरी १२–१५ दिवसांचा खंड आहेच. सन १९७२ सालीतर दुष्काळच होता. अशा वेळी नाले, नद्या, बंधारे, कच्च्या विहिरी यातून पाणी घेण्याची व्यवस्था करता येते. करायला हवी. पावसाळ्यात पहिला पाऊस १०–१५ इंच पडला की जमिनीतील पाण्याची पातळी बरीच वर येते. अशावेळी विहिरीतील सर्व पाणी काढून टाकले तरी दुसऱ्या दिवशी पाणी भरतेच. शिवाय पावसाळ्यात जमिनी पाणीही फार पीत नाहीत. भरणे लवकर होते. त्यामुळें पावसाळ्यात ४० फूट व्यासाची एक विहीर १५ मार्चनंतर मुळीच पाणी नसले तरी ८–१० एकर भात शेतीला पावसाळ्यात खंड पडलेल्या दिवसात पाणी पुरवठा करू शकते. ज्याविभागात वर्षाला ५०–६० इंच पाऊस पडतो आणि भाताचे पीक घेतले जाते त्या विभागात अशी पाण्याची सोय करता येते. आणि त्यामुळे पावसाची अशाश्वती निश्चितपणे कमी करता येते.

शास्त्रीय उत्पादन मार्गदर्शनाबरोबरच राष्ट्रीकृत बँकेकडून पीक कर्ज, खावटी कर्ज उपलब्ध करून देऊन येथील शेतकऱ्याला पालेमोडींच्या अजगराच्या विळख्यातून सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. बँक ऑफ महाराष्ट्रने ह्या प्रश्नाचे औचित्य लक्षात घेऊन कर्जाला जरूर असलेले तारणाचे नियम सैल करून, विषमता दूर करण्याच्या दृष्टीने व सामाजिक तळच्या लोकांची कर्जाची गरज लक्षात घेऊन कर्ज पुरवठा केला आहे. त्यामुळे ह्या विभागात शोषणाला चटावलेले सर्वत्र सावकार आमच्या योजनेकडे दुःस्वासाने पाहू लागले आहेत. शोषणाचे जे अनेकविध प्रकार आहेत त्यात गरजू शेतकऱ्याचे शेतच ५–१० रुपयांना कसणुकीकरता घ्यायचे आणि त्यातील उत्पन्न सावकाराने घ्यायचे हा एक प्रकार. त्यामुळे जमीन हेच जे उत्पन्नाचे प्रमुख साधन, त्यापासून शेतकरी वंचित होतो. अशी जमीन सावकाराला कसणुकी करिता घेता येत नाही. त्यामुळे त्या व्यवहाराचे स्वरूप बेकायदेशीर असते. पण तरीही असे व्यवहार खूप मोठ्या प्रमाणात होत असतात. यात जमीन घेणाऱ्या बरोबरच देणाराचाही दोष असतो ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाही.

ही जी शोषणाची शर्यत जीवनाच्या सर्व स्तरावर चालू असते, त्यांत ज्याला संधी मिळेल तो सामील होतो. एक आदिवासी दुसऱ्या आदिवासीचे शोषण करतो. एक कुणबी दुसऱ्याचे करतो. त्यामुळे कुणबी, वंजारी, मुसलमान, मारवाडी, लोहार, आदिवासी, ब्राह्मण, कायस्थ, सर्वच जण ह्या स्पर्धेत उतरत असतात. आणि शोषण हाच येथील जीवनाचा स्थायीभाव बनतो. त्यात कोणालाच काही गैर आहे असे वाटत नाही. उलट सावकाराशिवाय आपले चालूच शकणार नाही, अशी दृढ समजूत येथील रहिवाशांच्या मनात घर करून बसलेली आहे. सावकार हा येथील जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे बँकेमार्फत कर्ज पुरवठा योजनेत नजरेला कोणीच सावकार दिसत नसल्यामुळे ही काहीतरी भानगड आहे असेच या मंडळींना वाटते. सावकारावर भोळी श्रद्धाही असते.

आमच्या येथील कामात तरुणांनी सहभागी व्हावे म्हणून आम्ही आवाहन करीत असतो. कॉलेजचे शिक्षण संपले की, किंवा कॉलेज शिक्षण सोडावेच असे वाटत असल्यास २ वर्षे येथे काम करावे. असे आमचे तरुणांना आमंत्रण आहे. त्याप्रमाणे सध्या येथे चार तरुण काम करीत आहेत. तरुणांत अर्थातच तरुणींचाही समावेश आहे. हीं तरुण मुले येथे काम करता करता, जीवनाची जिवंत आव्हाने समजून घेत असतात. त्यांना सामोरे जाण्यासाठी धडपडत असतात. स्वतः मधील सुप्त शक्तींना कार्यप्रवण करीत असतात. येथील विकासाबरोबर स्वतःच्या विकासाचीही सुरुवात करतात. व्यक्ती समाज यांचे नाते, संवादित्व समजून घेत असतात. स्वतःचा आत्मविश्वास वाढवीत असतात. सत्य आणि शिस्त यांचे पालन कसे आवश्यक आहे हे कामांतून जाणून घेत असतात. प्रामाणिकपणे जगण्याची जिद्द आणि ईच्छा असेल तर त्याचे प्रात्यक्षिक पहात असतात. हे सर्व होतच असते असा आमचा दावा नाही. पण असे घडावे अशी कल्पना आहे.

ह्या दोन वर्षांच्या काळात एक वर्षभरात शेती, जमाखर्च, कचेरी व्यवस्थापन, पत्रव्यवहार ह्या संबंधीचे शिक्षण काम करीत करीत कार्यकर्त्यांनी घ्यावे अशी कल्पना आहे. आपल्या कल्पना जगता येतात ह्याची अनुभूती ह्या वर्षभरात मिळावी, त्यातील तफावतीची व्याप्ती लक्षात यावी अशीही कल्पना आहे. आणि एक वर्षानंतर कोठल्यातरी गावात जाऊन तेथे स्वतंत्रपणे त्या खेड्याच्या समस्या सोडवाव्या अशी कल्पना आहे.

### उत्पादक कामे

शिवाय सुट्टी पडली की कॉलेजमधील विद्यार्थी येथे काम करायला येत असतात. अडलेली कामे हाताने करीत असतात. शिक्षण घेत असतानाच कॉलेजमधून बाहेर पडल्यावर येणाऱ्या समस्यांची तोंडओळख करीत असतात. त्यांची उत्तरे, समस्यांची उगमस्थाने व उगम कारणे जाणून घेत असतात. तरुणांचा सहभाग हा कल्पनेप्रमाणेच प्रत्यक्षात येतो असे नाही. त्यातही आपल्या शिक्षणाचे, समाजाचे जे स्वभाव विशेष आहेत त्यांचे प्रतिबिंब उमटतेच. आणि विचार व कृती यात पडणारी तफावत येथेही जाणवते. ती जाणून घेण्याची व कमी करण्याची प्रक्रिया सुरू करता येते. आम्ही करीत असलेल्या उपक्रमातून जे विविध स्वरूपाचे आमचे शिक्षण होत असते त्यातील हे अनुभव हेही एक महत्त्वाचे शिक्षण असते.

आमचे शेती उत्पादनाचे काही प्रयोगही सुरू असतात. येथे ज्वारी मुळीच होत नसे. खरीप व रब्बी दोन्हीही हंगामात आम्ही ज्वारी लागवड करीत आहोत. त्याची आकडेवारी, उत्पादन व खर्च यांचा काय मेळ बसतो ते पहात आहोत. उताारावरची बरीच जागा ह्या विभागात पावसाळ्यात ज्वारीच्या पिकाखाली घेता येण्यासारखी आहे. येथील उपक्रमातून ज्वारी लागवड उत्क्रांत होत आहे. ज्वारीचे सामान्यपणे उत्पन्न एकरी २०० ते ५०० किलो येते. आम्ही १२०० ते १५०० किलो एकरी उत्पन्न काढण्यात यशस्वी झालो आहोत.

सामुदायिक विहिरींचा कार्यक्रमही आम्ही हाती घेतला आहे. अशा खणलेल्या विहिरीवर वीज पंप बसवून पाण्याचा वापर कसा करायचा ते लोकांना समजावून सांगून दुसरे पीक काढण्यास लोकांना उद्युक्त करीत आहोत. तीन वर्षे पाठपुरावा करीत राहून आता ह्या विभागात ज्वारी, बाजरी, गहू ही पीके थोड्या थोड्या प्रमाणात पीक कार्यक्रमात समाविष्ट केली आहेत.

ह्या उत्पादक कामाबरोबर आंदोलनात्मक किंवा संघर्षात्मक कामाचाही अंतर्भाव आमच्या कामात आहे. लहान लहान वाटणाऱ्या अन्यायाविरुद्ध जनशक्ती संघटित करून आंदोलनाने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आहे. येथे रेशन धान्य दुकानाची गरज होती. सरकारी

कामावर मजुरांना २ रु. रोजच मिळत असे व तो वेळेवरही मिळत नसे. त्याकरिता संघटित विरोध करून, मोर्चा काढून ह्या दोन्हीही मागण्या मिळवू शकलो आहोत. सावकारांनी बेकायदेशीर लागवड केलेल्या जमिनी जमीन मालकांनीच कापून घेऊन, प्रत्यक्ष प्रतिकारातून अन्याय रोखण्याचा विश्वास लोकात निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. पण अजून हे कार्य म्हणावे तसे होत नाही. कारण अन्यायासंबंधीची जाणच मुळी अगदी क्षीण आहे. अन्याय होतो म्हणजे काय होते हेच मुळी समजत नाही.

ह्या सर्व कामात आम्ही काही सूत्रे पकडली आहेत.

(१) गरिबी कमी करायची आहे : त्याकरिता शेतीत उत्पादनवाढीला चालना द्यायची. बँकेमार्फत जरुरीचा कर्जपुरवठा करून शोषण कमी करायचे. (२) श्रमशक्तीने भांडवल निर्मिती करायची : त्याकरिता विहिरी खणून घेऊन त्या पाण्याचा उपयोग करून, हायब्रिड ज्वारी, बाजरी, वगैरे लागवड करून रोजगार उपलब्ध करून देणे. ह्या अशा पिकांना मजूर जास्त प्रमाणात लागतात. (३) कर्ज फेडण्यासाठी असते : बुडवण्यासाठी नाही : ह्याकरिता उत्पादित माल व विक्री यांची सांगड घालणे. (४) मजुरीचा काही भाग धान्याच्या रूपाने द्यावा : म्हणून धान्य कोठाराची कल्पना कार्यवाहीत आणणे.

ही सूत्रे कार्यवाहीत आणीत असताना आम्हाला माणूस ह्या समस्ये भोवती गुंफलेले जे दर्शन घडले त्यावरून आमचे काम किती कठीण आणि करावयाच्या कामाची व्याप्ती किती विस्तीर्ण आहे ह्याचा अंदाज येत आहे. आर्थिक विकासाचे भौतिक टप्पे व उद्दिष्टे साध्य करणे त्यामानाने बरेच सोपे आहे. पण ही उद्दिष्टे आत्मसात करण्यासाठी येथील माणसाची मानसिक तयारी करणे किती दुरापास्त आहे ह्याची जाणीव होत असून एक वेगळीच परिस्थिती ह्या कामासाठी नजरेसमोर येत आहे. एखाद्या शेतातून एकरी १२०० ते १५०० किलो भात, किंवा ज्वारी काढून ती शेती निश्चित नफ्यात येते हे दाखविता येते. विहिरी खणून त्यांना कामापुरते पाणी लागते. विहिरीकरिता जरूर तो पैसा उपलब्ध होऊ शकतो. वीजपंप बसविता येतो. पण हे सर्व काम करणारा माणूस तयार होणे फार कठीण आहे हे लक्षात येत आहे.

## इथला माणूस

कसा आहे इथला माणूस ? आम्हाला आमच्या कामातून दिसणारा ? दोन-चार नमुने पुढे देत आहे. त्यातून हे चित्र स्पष्ट करता येईल.

दामखिंड येथे एका गटात जमीन असलेले ६ शेतकरी आहेत. एकाची १॥ एकर जमीन आहे. बाकी पाचांची प्रत्येकी सरासरीने ५ एकर जमीन आहे. ही जमीन कूळ कायद्याखाली त्यांना मालकी हक्काने मिळाली आहे. ह्या शेतकऱ्यांचा व आमचा संबंध २-२॥ वर्षापूर्वी सन १९७२ च्या मार्च महिन्यात आला. आता सतत ३ वर्षे भातशेतीचे हंगाम आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. ते काम कसे करीत आहेत ते पहात आहोत. त्यांच्या वेगवेगळ्या हंगामातील प्रतिक्रियाचा अंदाज घेत आहोत.

त्यांच्या जमिनीच्या किंमतीचे हप्ते भरलेले नव्हते, जमिनीत पेरण्याकरिता जरूर तेवढे सुद्धा बियाणे नव्हते. बैल नव्हते. नांगर नव्हते. खायला भाताचा दाणा नव्हता. स्वतः उपासमारीने खंगलेले होते. शेतीत अगदी किमान श्रम करावे लागतात तेवढे सुद्धा त्राण त्यांच्यात नव्हते. आमच्या मार्गदर्शनाखाली शेतीच्या कामाला सुरुवात झाली.

आम्ही दामखिंड मध्ये विहीर खणायला सुरुवात केली. त्याकरिता पंचायत समितीकडून अनुदान मिळाले. त्यातून शेतकऱ्यांना मजुरीची सोय झाली. मुंबईहून चांगला गहू आणून, गव्हाच्या स्वरुपात मजुरी द्यायला सुरुवात केली. आठवड्याला २० किलो गहू व उरलेली रोख रक्कम मिळू लागली. आठवड्याच्या आठवड्याला धान्य व ते सुद्धा चांगले मिळू लागल्यामुळे त्याचा दृश्य परिणाम त्यांच्या शरिरावर दिसू लागला. माणसांच्या चेहऱ्यावर हसू दिसू लागले. इतपत शक्ती त्यांच्यात आली. विहिरीला पाणी दिसू लागले. इतक्या वर्षात जीवनातून अदृश्य झालेला आनंद पाहून आम्हीही मनातल्या मनात फुलून जात होतो. मार्च महिन्यात खणायला सुरुवात केलेली 'कल्पना' विहीर पाणी लागून, १५ जून पर्यंत अर्धी बांधून झाली. ह्या विहिरीने उपाशी शेतकऱ्यांना रोजगार दिला.

बँक ऑफ महाराष्ट्र यांचेकडून पीक कर्ज व खावटीसाठी पुरेसे कर्ज मिळाले. शेतीची कसणूक सामुदायिक रीतीने करीत होते. उत्पन्न मात्र प्रत्येकाला त्याच्या जमिनीतून निघेल तेवढे मिळायचे होते. प्रत्येकाच्या शेतीवर होणारा खर्च व्यवस्थित लिहिला होता. माणसे काम करीत होती. कधीही सवय नव्हती, माहिती नव्हती अशी कामे मार्गदर्शनाप्रमाणे करीत होती. गादी वाफे तयार करीत होती. त्यावर अगदी पातळ बी पेरीत होती. खते टाकीत होती. औषध फवारीत होती. पॉवर टिलरने नांगरकी, चिखलणी करीत होते ते कुतुहलाने पहात होती. जमीन जाळल्याशिवाय आम्ही भाताची रोपे करीत आहोत याबद्दल बारीक तक्रार करीत होती. फार जवळ लावणी करतो म्हणून भात पडेल आणि कुजून जाईल म्हणून घाबरत होती. भाताची रोपे लावणीपूर्वी औषधात बुडवून लावीत होती. एक नवीन जिवंत प्रवाह सुरू झाला आहे त्यात सामील होत होती. आता दारू पिणार नाही, ताडी पिणार नाही अशा कणसरी हातात घेऊन शपथा घेत होती. नियमितपणे आठवड्याला त्यांच्याच कर्जातून खावटी म्हणून मिळणारा २० किलो गहू कमी पडतो म्हणून कुरकुरत होती.

त्या वर्षी पावसाने दगा दिला होता. लावणीकरिताही पुरेसे पाणी नव्हते. तेव्हा कल्पना विहिरीचे पाणी वापरून एरवी जी जमीन ओसाड गेली असती ती लावता आली आणि दुष्काळामुळे सर्वत्र हाहा:कार माजलेला असताना योग्य वेळी विहिरीचे पाणी वापरून ६ पैकी ४ शेतकऱ्यांची २०-२२ एकर जमीन आम्ही वाचवू शकलो. आमच्या शेतकऱ्यांची भाताची शेते आजपर्यंत कधीही आले नव्हते एवढ्या भाताच्या दाण्यांनी, लोंब्यांनी भारावली होती. पहिले भाताचे उत्पन्न आले आणि गव्हाऐवजी शेतकरी त्यांच्या शेतांत पिकलेले भात खाऊ लागले. त्यांना आता आठवड्याला २५ किलो भात मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यांच्या चेहऱ्यावर अपरिमित आनंद ओसंडून वहात होता. कामाचे चीज होत आहे अशा खुशीत आम्ही होतो. पण हे सर्व काही खरे नाही हे आम्हाला नंतर समजू लागले.

ह्या सर्व शेतकऱ्यांना आजुबाजूची सावकार मंडळी, गावकरी, शेतकरी, सर्वच जण भीती दाखवीत होते की, तुमचे हे जे काम चालले आहे त्यात तुमच्या जमिनी तुमच्याकडे रहाणार नाहीत. हा सर्व डाव आहे. तुम्हाला फसवून तुमच्याकडून जमिनी खाण्याचा हा प्रयत्न आहे. 'आबा तुमच्या जमिनी खाणार' असा सारखा प्रचार होतच होता आणि त्यांना ते खरेही वाटत असे. आजपर्यंतचा त्यांचा अनुभव तसाच होता. आमच्या मार्गदर्शनाखाली शेतीचे काम म्हणजे जमीन आपल्याकडेच आहे असे त्यांना वाटत नसे. सावकाराला जमीन द्यायचीच; व तो ती घेणारच; ही इतकी स्वाभाविक प्रक्रिया आहे की, ह्यापेक्षा वेगळे काही असू शकते हे समजण्याची शक्तीच लुप्त झालेली आहे. वेळोवेळी आम्ही त्यांना कितीही समजावून दिले तरी ते सर्व आकलनं होण्यापलीकडचे आहे. सावकार हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आपल्याला जगायचे तर त्याला जगवायलाच हवे अशी भाबडी, भोळेपणाची, आपुलकीची भावना सावकाराबाबत फारच मोठ्या प्रमाणात मूळ धरून बसलेली आहे. बँक काय आज आहे, उद्या नाही; आबा आज आहे; उद्या नाही; सावकार खरा, त्याला धरून रहायलाच हवे ही मनोमन असलेली भावना एक वर्षानंतर उत्पन्न त्यांना मिळाले तरी हटत नाही. जमीन आबाला दिली आहे, आबा हा नवीन सावकार आहे, कदाचित बरा असावा, अजून हा कशा जमिनी खात नाही, असा अचंबाच आदिवासी शेतकऱ्यांच्या मनात होता. हे सर्व समजल्यावर आम्ही निराशेच्या काळोखात गुडुप होऊन जात असू. काय केले म्हणजे यांचे मनातून आम्ही सावकार नाही ही भावना दूर होईल याची विवंचना आम्हाला हैराण करीत होती. आपण काम करीत रहावे. त्यातूनच बदल होईल अशी मनाची समजूत आम्ही घालून आणखी जोमाने कामाला लागत असू आणि आता तर आम्ही ह्या अवस्थेला आलो आहोत, की आम्हाला ही मंडळी सावकारच म्हणणार आहेत. त्याचे फारसे काही वाटून घ्यायचे नाही. फारसे हळवे बनायचे नाही. 'पहा आणि समजून घ्या, अनुभव घ्या' हे तंत्र अंमलात आणायचे ठरविले.

पहिल्या वर्षी आमचे उत्पादन सरासरीने एकरी १२०० किलो प्रमाणे आले. काही तर १८०० किलोपर्यंतही आले. भातशेतीचा धंदा फायद्यात जाऊ शकतो हा अंदाज येऊ लागला. एकरी ३०० ते ५०० रु. नफा झाला.

पहिल्या वर्षी भाताचे पीक हाती आल्यावर नोव्हेंबर–डिसेंबर १९७२ च्या सुमारास शेतकऱ्यांची सभा घेऊन त्यांना विचारले की, भात तुम्ही तुमच्या घरी ठेवणार की शेतकरी मंडळाकडे? त्यावर त्यांनी आपापसात बराच काही विचार केल्यासारखे केले आणि त्यांचेकडे नको, आठवड्याचे आठवड्यालाच आम्ही घेऊ, आमचेकडे असल्यास जास्त पाव्हणे येतील, किंवा आम्हीच जास्त खाऊन टाकू म्हणून नको असे ठरविले. पुन्हा आम्हाला आनंद झाला. माणसे विचार करीत आहेत, बदलत आहेत, आपले कार्य योग्य दिशेने जात आहे वगैरे वगैरे आम्हाला वाटू लागले. काम करीत असताना दिलासा मिळण्यासाठी जो आधार आपण शोधीत असतो तो मिळाल्याच्या आनंदात आम्ही होतो. पण तेही काही खरे नव्हते.

खाण्याची भ्रांत नाहीशी केली, आता माणसे काम करू लागतील, नव्या जोमाने, प्रेरणेने त्यांची परिस्थिती सुधारायला लागतील, अशा वेड्या विचारात आम्ही मग्न होतो. थोडेसे हवेत तरंगत होतो. कसचे काय आणि कसचे काय? २ वेळचे पोटभर जेवण मिळू लागल्याबरोबर माणसांना काम करायची जरुरीच उरली नाही! माणसे काम करीनाशीच झाली.

## गुंगी हेच जीवन वाटू लागते

असाच आणखी एक आनंदाचा क्षण. पावसाळ्याच्या सुरुवातीला, भातशेतीची लागवडीची कामे सुरू झाली की अडचण राहू नये म्हणून खावटीला लागणारे १७-१८ आठवड्यांचे भात मोजून त्या शेतकऱ्यांच्या स्वाधीन केले. त्यावेळी इतर शेतकऱ्यांची फारच हलाखीची अवस्था असते. १ गोण खावटीकरिता सावकारांचे उंबरठे झिजवावे लागतात. ज्वारीच्या एका गोणीकरिता म्हणजे २०० रुपयांकरिता भाताच्या आठ गोणी म्हणजे ८०० रुपये द्यावे लागतात. अशावेळी एकदम २-३ महिन्यांची खावटीची सोय झालेली पाहून शेतकऱ्यांच्या मनात, जमीन त्यांचीच आहे, उत्पन्न त्यांचेच आहे, असा विश्वास निर्माण होईल, ही आमची कल्पना पण ठराविक पद्धतीने विचार करावयाची आपल्याला सवय झालेली असते. अमुक केले की तमुक होईल असे कार्यकारणभावाने आपण मांडीत असतो. पण येथे ते सर्व लंगडे ठरत आहे. कारण येथील जीवनच असे घडविलेले आहे की, ते इतरांच्याच फायद्याचे व्हावे. आणि ज्याच्याशी ह्या जीवनाचा संबंध आहे त्याला त्याचे काहीच वाटणार नाही. अज्ञानाचा मॉर्फिआ देऊन त्याला गुंगीत ठेवलेले आहे. आता त्याला ती गुंगीच, तो मॉर्फिआच हे जीवन असे वाटू लागले आहे. तुमचा तर्कवाद ह्यापुढे निरुपयोगी ठरत असतो. आणि ताडीसाठी, दारूसाठी धान्य विकून, काम न करताच, आपल्या शेतीत किती नुकसान होते ह्याचा विसर पडून १८-२० आठवड्यांचे धान्य १०-१२ आठवड्यात संपविले जाते.

ह्याचे होणारे अनिष्ट परिणाम दिसायला फारसा वेळ लागला नाही. शेतीच्या एक रुपयाच्या कामाला पाचपट रुपये लागू लागले. सर्वांचे शेतीचे काम एकत्रित केल्यामुळे कोणालाच चिंता नाही असे आढळून आले. सर्वांचे काम म्हणजे कोणाचेच काम नाही असा अनुभव आला. परिणामी दुसऱ्या वर्षाचा भाताचा हंगाम तोटयात गेला. पहिल्या वर्षी दुष्काळ असूनही, बँकेची कर्जफेड करूनही पुढे उन्हाळ्यात खाण्याला धान्य उरले होते. सन १९७३ मधील हंगामात सहाही शेतकऱ्यांची शेती तोटयात गेली. कोणाचेही कामावर लक्ष नाही. आठवड्याच्या आठवड्याला पुरेसा धान्याचा उकाडा असल्यामुळे काम करायलाच खळखळ सुरू झाली. केव्हातरी हे थांबवायला हवे होते. आणि एके दिवशी मी त्यांना सांगितले की, 'भात बँकेचे आहेत. तुम्ही काम करून मजुरीच्या पैशातून भात खरेदी करू शकता. पण काम न करताच भात घेतल्यास कर्ज वाढत जाईल आणि बँकेकडे आपली पत राहणार नाही. ३० किलो भात व २ रुपये म्हणजे आठवड्याचे ३२ रुपये होतात. आपल्या शेतीत कामे आहेत. एका कुटुंबातून चार माणसे कामाला येऊ शकतात. त्याचे ६ दिवसांचे ७२ रु. होतात. अर्धी रक्कम कर्जफेडीपोटी व उरलेल्या ३६ रुपयात भात व रोख पैसे घेऊन तुमचे भागविता येईल.' पण ही योजना अमलात आणायची म्हणजे

काम करायला हवे. पण त्याचीच तयारी नव्हती. तेव्हा मी सर्व भात विकून टाकून बँकेची फेड करायचा निर्णय घेतला. आणि त्याप्रमाणे त्यांना सांगितल्यावर स्फोट झाला. सर्व मंडळी जमली. पूर्वी कधी तोंड उघडीत नव्हता तोही मला शिव्या देऊ लागला. आम्हाला फसवून जमिनी घेतल्या वगैरे बरेच अद्वातद्वा बोलणे झाले. मी काहीच बोललो नाही. परंतु निर्णयाबाबत दृढ होतो. बराच वेळ बसून मंडळी निघून गेली.

केव्हातरी परिस्थिती थांबवायलाच हवी होती. जी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती ती विचारपूर्वक घडवून आणली होती. एकतर्फी बुद्धिबळाचा जो डाव चालला आहे त्यातीलच ती एक खेळी होती. परिस्थिती मोडण्यापर्यंत आली होती. ह्यातूनच पुढे रोज काम, त्यातून अर्धी मजुरी व त्यातून धान्यखरेदी ही क्रिया सुरू झाली. नंतर ती पुढे अंगवळणी पडली. प्रत्येक शेतकरी आपापल्या शेतीवर मन लावून काम करू लागले. प्रत्येकाने आपल्या शेतीचे लागवडीचे काम स्वतंत्रपणे सुरू करावे असे ठरविले. धान्याची हमी संपली तेव्हा ही मंडळी कामाला लागली. आणि १९७४ च्या हंगामात तर एका वेगळ्याच उत्साहाने सर्व शेतकऱ्यांनी कामे केली आणि त्यांच्या करिता बँकेकडून खास कर्ज-योजना मंजूर करवून घेऊन आम्ही लहान शेतकऱ्यांच्या भातशेतीसंबंधी फारच उपयुक्त माहिती गोळा करून आणली.

दीड एकर भात शेतीत १३००–१३५० रु. नफा राहिला आहे. ५ एकरांच्या शेतीत २००० ते ५००० रु. पर्यंत नफा आहे. बँकेचे पीक कर्ज देऊन मध्यम मुदतीच्या कर्जाचे हप्ते भरता येण्यासारखी परिस्थिती आहे. ह्या एका वर्षाच्या आकड्यावरून निर्विवाद निष्कर्ष काढण्याचे धाडस आम्ही करीत नाही. पण कामाची दिशा स्पष्ट होत आहे. परंतु ह्या सर्व कामात 'माणूस' समजून घ्यायला हवा हे अधिकाधिक जाणवत आहे.

ह्या संबंधी मनात खूप विचार मंथन सुरू होते. अधिक उत्पादन, फायदेशीर उत्पादन, कर्ज फेड, लोकांनी काम करणे, गाव पातळीवर सावकारी बंद करणे वगैरे किती तरी समस्यांचा विचार दटावीत समोर उभा रहातो—त्या संबंधी मी आमच्या एका कार्यकर्त्याला लिहिलेल्या पत्रातील हा उतारा—

'आता प्रश्न आहे की धान्य पिकले की, पेंढा व भात ताब्यात घेऊन ते बँक हप्त्यांसाठी वापरावे लागेल. आणि तसेच करायला हवे. हप्ता फेडून भात उरलेच तर ते त्याच्या घरी गेले तर पुन्हा आळस, काम न करणे वगैरे सुरू होईल. तेव्हा सर्व धान्य गावानेच खरेदी करून नंतर कामाच्या कूपन्सवर ते खायला द्यायला हवे हा विचार मनात येत आहे. उपासमारीचा भो भो करीत चावरा कुत्रा मागे लागला तरच ही मंडळी पाय उचलणार असे दिसते. तेव्हाच हे कामे करणार. निदान काही वर्षे तरी असेच रहाणार असे वाटते. आपले होडके फारच फुटके आहे. डागडुजी केलेले आहे. आणि त्याला फारच संत्रस्त पाण्यातून आणि खडककातून मार्ग काढावा लागणार आहे असे दिसते.'

आता आणखी एक दोन अनुभव सांगतो.

यंदा पाऊस फारच उशिरा सुरू झाला. दरवर्षी साधारणपणे १ ते ५ जूनला सुरू होतो. तो यंदा एक जुलैला सुरू झाला. पाऊस यंदा एक महिना उशिरा सुरू झाला हे वस्तुस्थिती सांगणारे विधान आपण सहज करतो. पण ह्या एक महिना असंख्य लोकांच्या जीवनात किती कोलाहल निर्माण करतो त्याचे प्रत्यंतर यंदा मला मिळाले. येथील गावातील बरीच मंडळी—भूमिहीन व भूमी असलेली—संक्रांत झाली म्हणजे जवळचे धान्य संपते, गावात धान्य असत नाही, म्हणून बाहेर गावी जातात. घराला चारी बाजूंनी बोरीचे किंवा करवंदीचे काटे लावून, गुरे ढोरे आत जाऊन घराचे म्हणजे खोपटाचे नुकसान करू नये, म्हणून बंदोबस्त करतात. चोरण्यासारखे घरात काहीच नसते. बायका पोरे सर्व जण डोक्यावर बोचकी घेऊन कामासाठी बाहेर गावी जातात. ह्याला येथे 'जगायला जाणे' म्हणतात. प्रथम जेव्हा मी माणसे जगायला जातात हा शब्द प्रयोग ऐकला तेव्हा फारच गांगरून गेलो होतो. कासावीस झालो होतो. जगण्यासाठी माणसांना घरे दारे, शेती वाडी सोडून बाहेर गावी जावे लागते ही कल्पनाच मुळी कळमळायला लावते. पण ही येथील वस्तुस्थिती आहे. आणि जगायला जाणे ही एवढी अंगवळणी पडलेली गोष्ट आहे की, त्यात काही गैर आहे असे वाटतच नाही. आपली शेती आहे, तिच्यावर मेहनत करायची आहे, जास्त उत्पन्न काढायचे आहे, मुलांना शिक्षण द्यायचे आहे, भविष्याचा विचार करायचा आहे, वगैरे जे सामान्य सुखासंबंधीचे विचार आपण गृहीत धरलेले असतात त्यांना येथे स्थानच नसते. त्यामुळे आमचे कार्यकर्ते येथे कशाला आले आहेत हेच मुळी त्यांना समजत नाही. ते अगदी सहजपणे, सरळपणे सांगतात की 'दिलीप (एक कार्यकर्ता) जगायला आला आहे. यायलाच हवे.'

## जगायला जाणे !

तर असे गावच्या गाव जगायला गेलेले असते. आणि मे महिन्याच्या अखेरीला परत येतात. तशी ही माणसे यंदाही परत आली. वाफेवर बैल घेणे—म्हणजे चांगल्या शेतकऱ्याकडून त्याची शेती लावून झाली की एका बैल जोडीला भाड्याचे म्हणून ६ मण भात म्हणजे सुमारे ३०० रु. देऊन बैलजोडी मिळविणे—बियाची शोधाशोध, खावटीसाठी सावकाराकडून धान्याची मागणी, पावसामुळे कोणाकडे शेतीची कामे सुरू झाली तर मजुरी करणे वगैरे कामे सुरू होतात. परंतु यंदा पाऊसच नसल्यामुळे, काम नाही, खायला नाही म्हणून उपासमार सुरू झाली. आम्ही पण बँकेकडून कर्ज मिळवून देणारे सावकार म्हणून आमच्याकडेही माणसे येऊ लागली. रोज २०–२५ माणसांची घोळकी येत होती. पोटाच्या खळग्या दाखवीत होती. पोट भरण्यासाठी त्यांनी काय काय केले याचे वर्णन सांगत होती. त्याचा नमुना—

डोंगरात असलेले कंद खणून खणून संपत होते. डुकरांनी डोंगर उकरून काढलेले असावे असे सर्व डोंगर उकरून झाले होते. हे कंद कापून सोलून, तुकडे करून राखाडीत घालून उकळावे लागतात. नंतर २४ तासानंतर ते कडूपणा कमी होऊन खाता येतात. तर असे कंद उकळण्यासाठी राखाडीही संपली. राखाडी शोधीत फिरावे लागत होते. कंद संपले. 'कोवळी' भाजी जी ह्या सुमाराला उगवते ती खाऊन संपली. नदीच्या डोहात असलेले मासे संपले. करवंदे, जांभळे तर कधीच संपली होती. कंद खाऊन पायाचे सांधे व पोट दुखू लागले होते. आणि आता काही करून खायला मिळाले

नाही तर उपासमार चालूच होती. माणसें मरगळलेली होती. काहीतरी काम द्या म्हणत होती.

मी त्यावेळी गावोगावी, पाडयापाडयावर शेती पहाण्यासाठी हिंडत होतो. तेथे गेलो की अशीच माणसे गोळा व्हायची. बोचल पाडा, वरठा पाडा, सानवीपाडा, डोलार पाडा सर्व ठिकाणी एकच रडारड. येथील बऱ्याच जणांनी बँकेकडे, खावटी, पीक कर्जाकरिता अर्ज केले होते. कर्ज मंजूर होणार होते. एक महिन्ना खावटीचा वाढणार होता. म्हणून मी पाण्यासाठी खड्डे करण्याची योजना सुचविली. सर्वजण तयार झाले. असे ४ खड्डे खणायला सुरूवात केली. एका विहिरीला चक्क पाणी लागले. माणसे रोज संध्याकाळी मजुरीबद्दल ज्वारी नेत होती. झटून काम करीत होती. त्यांचे तीच सर्व संभाळीत होती. एक प्रकारची सामुदायिक जाणीवेची लाट आल्यागत, झपाटल्यासारखी माणसे काम करीत होती. त्यांतूनच नेतृत्व तयार होत होते आणि पुढाकार घेत होते. माझा खूप संपर्क वाढला होता. संवाद सुरू झाला होता. तो तसाच पुढे पावसाळयांत चालू राहिला आणि अशी एकत्र आलेली माणसे पावसाळयांत शेतीची कामे एकत्र करू लागली. पूर्वी कधीही ५०–६० दिवसात शेती लागली नव्हती त्याची शेती ८–१० दिवसात लागली. सर्वजण एकर दोन एकरवाले लहान शेतकरी आहेत. मी पुन्हा आनंदात न्हाऊन निघत होतो. दामखिडला सामुदायिक कामाचा प्रयोग फसला! तर बोचल पाडयावर तो यशस्वी झाला असे अंदाज बांधीत होतो. पण ते सर्व अंदाज दिवाळी नंतर भात पिकल्यावर कोलमडून पडले. कर्ज फेड करायलाच हवी असे तोंडाने म्हणत म्हणत कोणीही तोंड दाखवीनासे झाले. ज्यांना मी चांगले समजत होतो ते कर्ज बुडविण्यांत पुढाकारी होते. माणुसकीवरील माझ्या विश्वासाला तडा जातो किंवा काय अशी भीती निर्माण झाली. पोकळ पायावर रचलेली तटबंदी कोसळून पडावी असे विलक्षण अनुभव मला येऊ लागले. कर्ज वाटप, कर्ज उपयोग, कर्ज वसुली ह्याकरिता आम्ही केलेले संघटन, समित्या सर्व कांही निरर्थक आहे, आम्हाला येथील माणूस समजलाच नाही असे जाणवू लागले. तारीख ३।१०।७४ च्या डायरीत मी लिहिले आहे–बोचल पाडयावर सभा झाली. ३–४ मुद्दे मांडले. पण ह्या खेपेला लोक मला थंड वाटले. पूर्वी जेव्हा गरज होती त्यावेळचा उत्साह आणि आता कर्ज फेडीच्या वेळची मानसिक अवस्था मला कोंदट वाटली. लोक कर्ज फेड करायला कचरत असतात असे दिसते. ८–१० माणसे दोन पाडा प्रेसवर काम करू शकतात. पण कोणी फारसे तयार दिसले नाहीत. काम करायला नको असे दिसले. कारण घरात खायला आहे. काम करून पैसा मिळविणे हे ह्या मंडळींना आकर्षक वाटत नाही. कर्ज काढून दिवळीचा सण साजरा करायची प्रवृत्ती आहे. लाचारी कमी करण्याची गरजच कोणाला वाटत नाही. एकंदर अवस्था भयावह आहे. येथील माणूस कसा सुधारणार असा भेडसावणारा प्रश्न आहे. कसा बदलेल येथील माणूस? त्यांना गरज असेल तेव्हा ते जे वागतात ते काही खरे नसते. फार शिकण्यासारखे आहे असे वाटते.'

संघर्ष आणि रचना यांची बेमालूम जोड करून काम करायला हवे असा आमचा आग्रह आहे. बारेशेती गावात ह्याचा प्रत्यय घेण्यासारखी परिस्थिती होती. आम्ही तेथे अगदी प्रथमपासून संघटना, लोकशिक्षण वगैरे व्हावे म्हणून जागरूकपणे दक्षता घेत होतो. गाव कमिटी केली होती. त्या कमिटीत एक दोन स्त्रियाही घेतल्या होत्या. खास लक्ष त्या गावावर होते. बऱ्याच गावात सावकारांचे वास्तव्य नसते. पण काही गावात सावकार रहातो. तेथे तो जमिनदारही असतो, दुकानदार असतो, ताडी, दारूचा ठेकेदारही असतो. गवताचा व्यापारी सुद्धा असतो. अशीच थोडी फार परिस्थिती बारेशेती गावात आहे. त्यामुळे तेथे बऱ्याच आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे फुटकळ सावकारांकडे लागवडीकरिता गेलेल्या होत्या. बँकेने ज्यांना कर्ज पुरवठा केला होता अशा सभासदांच्या जमिनी कापून घेण्याचा संघर्षात्मक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला. ज्या शेतकऱ्यांचे शेत दुसऱ्याने लावले असेल; त्या शेतात स्वतः शेतकऱ्याने सावकारला सांगून भात कापायला जायचे. आणि नंतर त्याला इतर शेतकरी सभासदानी मदत द्यायची अशी कामाची आखणी होती. त्याप्रमाणे बरीच तरुण मुले ह्या रोमांचकारी वाटणाऱ्या कार्यक्रमात सहभागी झाली. उत्साहाने नेतृत्व करू लागली. भात झोडून घेऊन बँक कर्ज फेड करणार म्हणू लागली. एक नवीन वातावरण संचारू लागले. आम्ही तेथे एक सभा घेतली. त्याचा आधार घेऊन आम्हाला व आणखी २५–२६ जणांना एका चोरीच्या केसमध्ये अडकवून जेरीस आणण्याचा प्रयत्नही झाला. आता केस सुरू आहे. रीतसर चालून निकाल लागेल. दरम्यान ८–१० तारखांना २५–२६ माणसांची यात्रा पालघरला काढावी लागते आहे. केस करणारांचा उद्देश सफल झाला आहे. पण अन्यायाशी सामना करायचा म्हणजे असे होणारच असे मी गृहीत धरलेले आहे. ह्या अशा कामातून लोकशिक्षण व संघटन वाढविता येण्याची संधी चालून आली आहे म्हणून उत्साहाने ह्या लोकांजवळ बोलायला लागलो.

## वास्तववाद हवा

यंदा वेळेवर कर्ज मिळाल्यामुळे, खतांचा पुरवठा झाला असल्यामुळे, नवीन भात बियाण्यांची लागवड केल्यामुळे उत्पन्नही चांगले आले होते. माणसे खुशीत होती. पुढच्या वर्षी खावटीकरिता गहू, ज्वारी न घेता भातच खायचे आणि त्यासाठी जादा पिकलेले भात शेतकरी मंडळाच्या धान्य कोठारात जमा करायचे असे मनसुबे सर्व जण रचीत होते. संघर्ष आणि रचना यांची सांगड घालून, लोकशिक्षण, संघटन कसे करता येते ह्याचा हा एक उत्तम नमुना दाखविता येईल. म्हणून आम्ही मनातल्या मनात मांडे खात होतो. परंतु कोणाचेच भात कोठारात येईना. घरी कोणीच भेटेनासे झाले. मुलांच्या अंगावर नवे कपडे दिसू लागले. मुलींच्या डोक्यात रंगीबेरंगी फिती दिसू लागल्या. चड्डया, चांगले बुशशर्ट, नवीन सुडकी वगैरे घालून माणसे स्मार्ट दिसू लागली. पोटभर जेवायला मिळू लागल्याचे तेज शरीरावर दिसू लागले. पण माणसे आम्हाला टाळीत आहेत असे आढळून येऊ लागले. आणि कर्ज फेडायलाच हवे सांगणारी माणसे एक हजार रुपया ऐवजी १०० रुपये आणून देऊ लागली. बाकीची रक्कम कोठे मुलाच्या लग्नात तर कोठे जुन्या कर्जात, तर कोठे खर्चात संपली होती असे आढळून आले. हजारपासून अठराशे रुपये लग्नात संपले होते. भात कापून घेण्यासाठी आघाडीवर असलेली तरुण मंडळीच स्वतःची लग्ने उरकून घेण्यातही आघाडीवर होती.

आमचा तेथील पुढारीच मी मुखिया आहे सांगून सर्वांचे भात गोळा करून काळ्या बाजारात विकण्यासाठी लॉरी भरून देण्यात पुढाकार घेऊन कमिशन कमवीत आहे असे आढळून आले. हे सर्व पाहून आम्ही वाळूचे किल्ले तर बांधीत नाही ना, असा संभ्रम निर्माण झाला.

सर्वच गाव व सर्वच माणसे अशा तऱ्हेने वागत आहेत असे नव्हे. काही ठिकाणचे अनुभव उत्साहजनक आहेत. काही काही माणसे फारच जबाबदारीने वागत आहेत, असे दिसून येत आहे. पण या जाणीवेचे रूपांतर सामुदायिक जबाबदारीमध्ये होत असताना दिसत नाही. तसेच बँकेचे कर्ज वसूल होणार नाही किंवा होत नाही असाही याचा अर्थ नाही. पहिल्या वर्षी ९० टक्के वसुली झाली. दुसऱ्या वर्षी ५५ ते ६० टक्के झाली. तिसऱ्या वर्षाचे आकडे लवकरच हाती येतील. परंतु कर्जफेड करून स्वतःच्या हिमतीवर स्वतःचे भवितव्य घडविण्याचे दृष्टीने येथील माणूस कसा उभा होत आहे हा खरा प्रश्न आहे. आणि त्या दृष्टीने आमचे अनुभव आम्हाला त्याचे दर्शन घडवीत आहेत. आम्ही निराश नाही, अश्रद्धावादी तर मुळीच नाही. पण त्याचबरोबर वास्तववादी बनण्याचा प्रयत्न आहे. माझ्या डायरीतील १६।११।७४ तारखेचा उतारा देतो—

'आमचे येथील काम सुधारणावादी आहे असा आक्षेप आहे. वर्गलढा तीव्र करून, भांडवलदारी निपटून काढून, कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित झाल्याशिवाय ही चौकट मोडणार नाही. मार्किस्टांच्या मते आमच्यासारखे सुधारणावादी काम करणारी मंडळी भांडवलदारांपेक्षा जास्त उपद्रवी असतात. कारण आम्ही जे काम करतो त्यामुळे अभावग्रस्तांचा असंतोष त्यांना तीव्र करता येत नाही. आणि आम्हाला भांडवलदारही म्हणता येत नाही. मात्र आम्ही छुपे भांडवलदारच असतो असे त्यांचे म्हणणे असते. 'भांडवलदार' म्हणून आम्हाला उघडपणे झोडपता येत नाही. मात्र आम्ही प्रस्थापितांचेच हात बळकट करीत असतो, असे त्यांना वाटत असते. वर्गलढ्याशिवाय भारतापुढील समस्या सुटणारच नाहीत, असे ह्या मंडळींना वाटते.

'आम्ही ज्या परिस्थितीत काम काम करीत आहोत तेथे 'वर्ग' खऱ्या अर्थाने आहेत काय ? ते जर नसतील तर मग वर्गलढा कोणामध्ये ? येथील प्रश्न गरीब आणि थोडे जास्त गरीब यांच्यामधील आहेत. तेव्हा ह्या कमी गरीब लोकांनाही त्यांची शोषण प्रवृत्ती टाकून द्यायला प्रवृत्त करून ग्रामीण संघटनेत समाविष्ट करायला हवे. येथे प्रश्न कुणबी–आदिवासी, वंजारा–आदिवासी, कातोडी–आदिवासी किंवा कातोडी–कुणबी, कातोडी–वंजारा असे जातिवाचक आहेत. आणि जाती-प्रथा तर आपल्याला मंजूर नाही. प्रश्न स्त्री आणि पुरुष यांच्यातील विषम व्यवस्थेसंबंधी आहेत. स्त्रीविमोचनाची गरज फारच मोठ्या प्रमाणावर आहे. येथील प्रश्नाचे स्वरूप समजून घेऊन काम करायला हवे आहे.

'सर्वोदयाच्या ग्रामदानी चळवळीमध्ये बहुमताचा नव्हे तर एकमताचा पुरस्कार आहे. गांधीजींची 'विश्वस्तता'ची कल्पना हा तिचा आधार आहे. पण हे शक्य आहे का ? श्रीमंत किंवा कमी गरीब हा गरिबांचे शोषण करीत असतो. ही प्रवृत्ती कमी करून 'सर्वेषाम् अविरोधेन' काम करता येईल असे वाटत नाही. तसेच वर्गलढ्यावर आधारित कामही येथे करता येईल असे वाटत नाही. भूमिहीन, लहान शेतकरी व बेकार तरुण यांचे संघटन करून परिवर्तनाचे काम करायला हवे आहे. येथील कामाचा ढाचा जरा वेगळ्या स्वरूपाचा आहे.'

संघर्ष आणि रचना यांची फारकत करून चालणार नाही. येथे भूमिमुक्ती आंदोलनानंतर रचनात्मक कामाचा आग्रह धरीत असताना नवी संघर्षस्थाने आमच्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत. शासन, अधिकारी, चुकीची धोरणे, सावकारी, यांविरुद्ध संघर्ष करणे एक वेळ सोपे आहे. पण येथे सामना करावा लागतो तो उदासीन आणि निष्क्रिय वृत्तीशी. 'अधिक श्रम करून अधिक मिळवावे' ही प्रेरणाच येथे दिसत नाही. निष्क्रियता हा इथल्या जीवनाचा स्थायीभाव आहे. या लोकांची दृष्टी वर्तमानकाळापुरतीच मर्यादित असते. आपल्या संकुचित, मागास जीवनाच्या तटबंदीपलीकडे काही जाणून घ्यायची इच्छाच उरलेली नाही असे वाटते. लोकशाहीत, जिथे लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे, तिथे ही परिस्थिती फार भयावह आहे.

अंधश्रद्धेचा पगडा फार मोठा आहे. लग्न आणि मयत ही खर्चाची मोठी निमित्ते आहेत. त्यासाठी कर्ज काढून जन्मभर सावकाराची गुलामी करावी लागली तरी हरकत नसते. दारूचा प्रभावही तसाच जबरदस्त आहे. हातात पैसा आला की तो ताबडतोब दारूच्या दुकानाकडे वाटचाल करू लागतो. दारूने इथले जीवन पोखरलेले आहे. दारिद्र्यातून मनुष्य कधीच वर येऊ शकणार नाही, इतका दारूचा अंमल येथे आहे.

या अपप्रवृत्ती झटकून सामाजिक परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. नेमका इथेच स्वतःविरुद्ध संघर्ष करावा लागतो. नव्या जाणीवा स्वीकारल्याच जात नाहीत असे दिसते.

या सामाजिक जागृतीची जोड नसेल तर आर्थिक कार्यक्रम हा नुसता सांगाडा होतो. त्यातून जिवंत माणूस निर्माण होत नाही. या जागृतीची सुरुवात एका वेगळ्या स्तरावरून करायला हवी असे आता आम्हाला वाटू लागले आहे. उगवत्या पिढीवर नव्या जीवनदृष्टीचे संस्कार केले तर ते मूळ धरतील. परिवर्तनाच्या क्रियेत प्राण भरण्यासाठी 'शिक्षण' ही एक आवश्यक बाब वाटत आहे.

आजच्या शिक्षणाचीही प्रत्यक्ष जीवनाशी फारकत झाली आहे. ती टाळून जीवननिष्ठा जोपासणारे शिक्षण इथे लहान वयाच्या मुलांपासून द्यायला सुरुवात केली पाहिजे, असे आम्हाला प्रकर्षाने वाटू लागले आहे.

आमचे काम एका टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. या वाटचालीकडे यशापयशाच्या दृष्टिकोणातून न पाहता 'माणूस' या समस्येचे दर्शन व अनुभव या दृष्टीने पाहिले पाहिजे. 'क्रांती आधी मनात व्हावी लागते,' असे म्हणतात. त्या 'पहिल्या' क्रांतीच्या वाटेतल्या अडचणींचा मागोवा घेण्याचा हा प्रयत्न आहे. ☐ ☐

# कुरुक्षेत्र मुंबई

## अखेरच्या तीन दिवसांची झुंज वातावरण चेतवणारी होती....

माणूस प्रतिनिधी



सामन्याच्या पाचव्या दिवशी होल्डरपुढे नांगी टाकून विश्वनाथ परतला त्याच वेळी भारतीय संघाला खेळाव्या लागलेल्या या पहिल्या सहा दिवसाच्या सामन्याचे भवितव्य निश्चित झाले. आणि तरीही सहाव्या दिवसाचा विचार करीत जमेच्या बाजूने बोटे मोडताना क्रिकेट रसिक–गायकवाड, पटेल...अगदी पतौडीचा सुद्धा समावेष करीत होते. या खुळचट आशेला गायकवाड-पटेलच्या बासष्ट मिनिटांच्या भागीमध्ये थोडीफार पालवी फुटली तरी निश्चित निर्णयाच्या बाजूने सुरू झालेली वाटचाल अपेक्षेप्रमाणे वेस्ट इंडिजच्या पदरी धवधवीत यश टाकूनच पूर्ण झाली. संपूर्ण मालिकेचा साकल्याने विचार केला इतके कशाला अगदी याच सामन्याचा तटस्थ दृष्टीने विचार केला तरी एक गोष्ट खचित मानावी लागेल, की या विजयामुळे या बलाढ्य संघाला त्याच्या लायकीला साजेल अशी विजेतीपदाची बिरुदावली मिरवीत क्रिकेट वेडा भारत निरोप देत आहे. ही वस्तुस्थिती महापराक्रमी लॉईडला आणि त्याच्या सर्व साथीदारांना पुरेपूर न्याय देणारी आहे.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशीपर्यंतचा तपशील पहिल्या वार्तापत्रामध्ये येऊन गेला आहे. उरलेल्या तीन दिवसाच्या खेळाच्या तपशीलाची अपेक्षा नाही. आणि आपला क्रिकेडवेडा प्रेक्षक भारतीय संघाविरुद्ध मोकळे मतप्रदर्शन वाचण्यास फारसा राजी नसल्याने झाल्या खेळाच्या संदर्भामध्ये फार खोल पाण्यात उतरण्यात अर्थ नाही.

चौथ्या दिवसाकडे मंडळींचे लक्ष होते ते प्रारंभी सोलकरच्या शतकाकडे. सामन्याची अवस्थाही अस्वस्थ करणारी नसल्याने सोलकरला सरसरून टाळी देण्यास प्रेक्षक विलक्षण उत्सुक होते. पण सोलकर प्रारंभापासूनच असा काही विक्षिप्त खेळत होता की काल ज्याचा खेळ आपण पाहिला तो एकनाथ सोलकर हाच काय याची शंका येत होती. शाहत्तरपासून नव्वदपर्यंत पोचायला या पठ्ठ्याला पंचाहत्तर मिनिटे लागली. चौऱ्याण्णव धावांवर या भाग्यवान खेळाडूला एक लहानसे जिवदानही मिळाले. आणि मग अखेरीस शंभरीचा टिळा सोलकरच्या माथी लागला. शतक झळकले पण खेळाची शान गेली. सोलकर माझ्या लक्षात राहील तो शतकवीर म्हणून नव्हे तर आदल्या दिवशी खेळावर हुकमत गाजवीत शहाहत्तर धावा फडकवणारा फलंदाज म्हणून. या खेळामध्ये शतकाचे अनन्य साधारण महत्त्व असल्याने व्यक्तिशः सोलकर या शतकाबद्दल समाधानी असेल. त्याचे हे शतक त्याच्या आदल्या दिवशीच्या खेळाचे पारितोषिकच मानावे लागेल. अशी जबर उतरण त्याच्या खेळाला लागली होती. वानखेडे स्टेडियमवरील पहिल्या कसोटी सामन्यात शतक फडकवणारा–पहिला आणि एकमेव भारतीय फलंदाज अशी दप्तरी झालेली नोंद सोलकरला सुखविणारी आहे यात शंका नाही. विशेषतः संपूर्ण मालिकेमध्ये सातत्याने फलंदाजीमध्ये चमक दाखवणारा विश्वनाथ–२५, ७४, ८४ अशी तीन जिवदाने मिळूनही शतकवीर ठरू शकला नाही हे पाहिलेल्या मला सोलकर खरोखरच भाग्यवान वाटतो. चौथ्या दिवशी चहापानाच्या खेळापर्यंत समाधानकारक वाटणारी परिस्थिती गिब्जने दिवसअखेर पूर्ण फिरवून टाकली. शतक चुकल्याची हुरहुर उरी घेऊन

पृष्ठ ३८ वर

# बांगला देश

## मुजीबपुढील आव्हान

वा. दा. रानडे

भारतीय प्रजासत्ताकाचा पंचविसावा वाढदिवस आपण साजरा केला त्याच दिवशीच्या वृत्तपत्रात बांगला देशमध्ये संसदीय लोकशाही रद्द होऊन अध्यक्षीय लोकशाही सुरू झाल्याची आणि शेख मुजिबूर रहमान यांनी स्वतःकडे अध्यक्षपद घेतल्याची बातमी प्रसिद्ध झाली. देशात आणीबाणी पुकारल्यानंतर एक महिन्यात हा दुसरा महत्त्वाचा बदल जाहीर करण्यात आला. 'बांगला देशमधील ही दुसरी क्रांती आहे. भ्रष्टाचार, काळाबाजार, चोरटा व्यापार आणि दहशतवाद यांचे उच्चाटन करण्यासाठी ही नवी पद्धती आम्ही स्वीकारली आहे. ही दलितांची लोकशाही आहे.' असे घटनादुरुस्ती बिल पास झाल्यानंतर पार्लमेंटपुढे केलेल्या भाषणात शेख मुजीब यांनी सांगितले.

या बदलामुळे मुजीब सर्वाधिकारी झाले आहेत. मंत्रिमंडळ आणि पार्लमेंट यांच्याकडे फक्त सल्ला देण्याचे काम राहणार आहे. मुजीब यांच्या निर्णयांवर पार्लमेंटचे कोणतेही नियंत्रण राहणार नाही. या दृष्टीने अमेरिकन अध्यक्षांपेक्षाही अधिक अधिकार मुजीब यांनी स्वतःकडे घेतले आहेत. अमेरिकेत काँग्रेसचे साध्या बहुमताचे निर्णय अध्यक्ष आपल्या अधिकारात बाजूला सारू शकतात. पण काँग्रेसने दोन तृतियांश बहुमताने एखादा निर्णय घेतला तर अध्यक्षांना तो मान्य करावा लागतो. तसेच अध्यक्षाने घटनेचे उल्लंघन केल्यास त्याबद्दल त्याची चौकशी करून त्याला अधिकारपदावरून दूर करण्याचा अधिकार काँग्रेसला आहे. अशा काही तरतुदी बांगला देशच्या घटनादुरुस्ती बिलात आहेत की नाहीत याचा तपशील अजून समजलेला नाही. पण अशा काही तरतुदी नसतील तर नव्या बदलाला अध्यक्षीय लोकशाही न म्हणता अध्यक्षीय हुकूमशाहीच म्हणावे लागेल. मुजीब निवडून आले असे समजून पाच वर्षे अध्यक्षपदी राहणार आहेत. त्यानंतर मात्र अध्यक्षीय निवडणूक होईल. पण पाच वर्षे तरी अनियंत्रित सत्ता मुजीब यांच्या हाती राहणार आहे. अध्यक्षांना जरूर वाटल्यास देशात एकपक्षीय राजवट ते जाहीर करू शकतात. या पक्षाला 'राष्ट्रीय पक्ष' (नॅशनल पार्टी) असे संबोधण्यात येईल. त्याचा कार्यक्रम, सभासदत्वाच्या अटी वगैरे सर्व गोष्टी अध्यक्ष ठरवतील. घटनादुरुस्तीने सुप्रीम कोर्टाचे जवळजवळ सर्व अधिकार काढून घेतले आहेत. अध्यक्षांच्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टात दाद मागता येणार नाही; असे हे अमर्याद अधिकार नव्या बदलांमुळे अध्यक्षास मिळाले आहेत.

पार्लमेंटपुढे केलेल्या भाषणात मुजीब म्हणाले, 'मित्र आपल्याला किती दिवस धान्य व मदत देत राहतील ? आपण लोकसंख्या नियंत्रित केली पाहिजे. मनाला हवे तसे वागून चालणार नाही. आपण स्वतःला शिस्त लावली पाहिजे. भिकाऱ्यांच्या देशाची अवनत दशा मला माझ्या देशात येउ द्यावयाची नाही. चोरटे व्यापारी, भ्रष्ट अधिकारी, काळाबाजारवाले आणि दहशतवादी यांना मी देशात धुमाकूळ घालू देणार नाही. प्रबळ पाक सेनेपासून मी देशाची मुक्तता करू शकलो तर या सामाजिक डाकूंचा नायनाट करणे हा काही माझ्यापुढे मोठा प्रश्न नाही. देशबांधवांमध्ये सुरक्षितेची भावना निर्माण करण्याचा आणि देशाला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचा माझा निर्धार आहे.' मुजीब यांच्या शब्दात आत्मविश्वास होता.

सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याच्या मुजीब यांच्या निर्णयाने लोकशाहीच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न, मुजीबना जे साधावयाचे आहे त्यासाठी संसदीय लोकशाही रद्द करण्याची आवश्यकता होती का? भ्रष्टाचार, काळाबाजार, चोरटा व्यापार हे संसदीय लोकशाहीचे अंगभूत दोष आहेत का ? आणि अध्यक्षीय पद्धती स्वीकारल्याने ते एकदम नष्ट होणार आहेत का ? आशिया व आफ्रिकेतील अनेक अविकसित देशांत संसदीय लोकशाही यशस्वी झालेली नाही हे कटु सत्य आहे. भारतात संसदीय लोकशाहीचा सांगाडा आपण टिकविला आहे. पण आपल्याकडेही ती खऱ्या अर्थाने यशस्वी झाली आहे काय याचे राजकीय नेते, घटनातज्ज्ञ आणि सर्व लोकशाहीवादी विचारवंतांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. निवडणुकीत पैशाचा प्रचंड प्रमाणात


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन रुपये

होणारा वापर लक्षात घेता आपली लोकशाही म्हणजे प्रत्यक्षात धनिकशाही झालेली आहे. राज्यकर्ते तोंडाने समाजवादाची भाषा बोलत राहतात. पण ज्या वर्गाच्या पैशाच्या पाठबळावर आपण निवडून आलो त्यांच्या हितसंबंधांना धक्का लागेल असे काहीही करावयाचे नाही, याची दक्षता ते घेत असतात. लोकप्रतिनिधींवर लोकांचे नियंत्रण काहीच राहत नाही. सत्तारूढ पक्षाशी तुल्यबळ असा प्रभावी विरोधी पक्ष देशात नसल्याने सत्तारूढ पक्षात अनेक अपप्रवृत्ती बोकाळतात. भ्रष्टाचार यातूनच फोफावत जातो. आपल्या हाती सत्ता टिकविण्यास ही पद्धती सत्तारूढ पक्षास सोयीची वाटत असल्याने ती बदलण्याची त्यांची तयारी नाही. संसदीय लोकशाही आपल्याकडे टिकून राहिली म्हणून मोठा अभिमान बाळगावा अशी परिस्थिती नाही.


याचा अर्थ संसदीय लोकशाहीच्या जागी अध्यक्षीय लोकशाही आणल्याने हे सारे दोष एकदम दूर होतील असे नाही. अध्यक्षीय लोकशाहीतसुद्धा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि सत्तेचा गैरवापर होऊ शकतो, याचे अलीकडच्या काळातील मूर्तिमंत उदाहरण अमेरिकेतील वॉटरगेट प्रकरण. पण जागृत लोकप्रतिनिधी, न्यायसंस्था आणि वृत्तपत्रे यांनी हे प्रकरण धसास लावल्याने अखेर निक्सन यांना राजीनामा देणे भाग पडले. अशी परिस्थिती नसेल तेथे अध्यक्ष हुकूमशहा बनण्याचा धोका असतो आणि भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळाबाजार, अकार्यक्षम कारभार हे दोष अधिकच बळावतात.

सध्याचे सर्व पक्ष रद्द करून बांगला देशामध्ये स्वतःच्या नेतृत्वाखाली 'राष्ट्रीय पक्ष' हा एकच पक्ष राज्यकारभाराच्या क्षेत्रातही आपले जाळे पसरणार आहे. आतापर्यंतच्या नियमाप्रमाणे सरकारी नोकरांना राजकारणात भाग घेण्याची व कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद होण्याची बंदी होती. पण आता सरकारी नोकरांनाही या नव्या पक्षाचे सभासद होता येईल.

पार्लमेंटमध्ये चर्चा न होताच घटना दुरुस्ती बिल पास झाले. बिलावर सही करण्यामाठी अध्यक्ष महमदउल्ला अध्यक्षभवनातून संसदभवनात स्वतः आले. त्यांनी सही केली आणि दोन तासांत मुजीब यांनी नवे अध्यक्ष म्हणून सूत्रे हातीही घेतली. एवढ्या मोठ्या बदलावर चर्चा करण्याची पुरेशी संधी लोकप्रतिनिधींना का देण्यात आली नाही? अशी टीका केली जात आहे. पण चर्चेची संधी मिळाली नाही हे म्हणणे पूर्णार्थाने खरे नाही. सत्तारूढ अवामी पक्षापुढे हा विषय गेल्या जुलैमध्येच मांडण्यात आला होता. तसेच बिल पार्लमेंटमध्ये मांडले जाण्याच्या आधी चार दिवस पक्षसभासदांना त्यावर चर्चा करण्याची संधी मिळाली होती. काही सभासदांनी या बिलाबद्दल सुरुवातीला नापसंती व्यक्त केली होती. पण देशाला आर्थिक व राजकीय पेचप्रसंगातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक वाटतील ते उपाय योजण्याचे अधिकार मुजीब यांना दिले पाहिजेत या निर्णयाला अखेर सर्व सभासद आले व त्यांनी या बदलांना पाठिंबा दिला.

मुजीब यांनी मोठे आव्हान स्वीकारले आहे. ते यशस्वीपणे पेलण्यात त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. स्वातंत्र्यलढ्याचा झुंजार नेता ही भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडली, पण आता नवराष्ट्राच्या उभारणीचे कार्य त्यांना करावयाचे आहे. सध्याच्या चौकटीत हे कार्य करता येणार नाही. असे गेल्या तीन वर्षांच्या अनुभवाने त्यांना दिसून आले. म्हणून आता पक्षउभारणीपासून सबंध समाजाची घडीच ते नव्याने बसवू पाहत आहेत. पण सर्वांत अवघड गोष्ट आहे ती माणसे बदलण्याची. नवीन समाजघडी बसविण्यासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची, संघटना आणि निर्णय निर्धाराने अंमलात आणणारे कार्यक्षम अधिकारी यांची जोड मुजीब यांना मिळाल्याशिवाय त्यांचा प्रयोग यशस्वी होणे कठीण आहे. □ □



**'आई, कुएन, दार उघडा, मी आलोय.'** मोठ्या शर्थीनं शत्रूच्या तुरुंगातून सुटून गॅन साऊ आणि तिच्या सू आणि कुएन या मुलींच्या घरी दाखल झाला.
हॉन डॅट या गावातील हे घर म्हणजे क्रांतिकारकांचा अड्डाच. साऊ ही साठी ओलांडलेली वृद्धा या सर्वांचं जणू स्फूर्तिस्थान. दक्षिण व्हिएतनाम सरकारच्या मदतीला आलेल्या अमेरिकन सैन्यानं आपल्या शेतांवर हेलिकॉप्टरमधून विषारी रसायनांचे फवारे मारल्याची बातमी आली होती. रोजच्या एकापेक्षा एक क्रूर घटनांमुळे साऊचं मन विदीर्ण होत होतं. तरीही दोन्ही व्हिएतनाम एक झाल्याशिवाय, अध्यक्ष हो चि मिन्हना एकदा तरी भेटल्याशिवाय मरायचं नाही अशी तिची प्रतिज्ञा क्रांतिकारकांचा उत्साह वाढवणारी होती.
टामचान, हाईथेप, गॅनचं जेवण चालू असतानाच हॉन डॅटवर हजार सैनिकांचा हल्ला येऊ घातल्याचं बारेन आणि ताननं सांगितलं. अत्यंत क्रूर, उलटच्या काळजाचा त्यांचाच फितूर गाववाला झॅम या सैनिकांचं मार्गदर्शन करीत असल्याची अशुभ बातमीही त्यांनी दिली. संरक्षणाच्या मोहिमेचा आराखडा आखण्यात झोपडीतील मंडळी गुंग झाली. आता यापुढील सर्व हालचाली गावाबाहेरील प्रचंड, भक्कम गुहेतून करायच्या असं ठरलं....

# हॉन डॅट

## भाग : तीन

मूळ व्हिएतनामी लेखक : **अॅन्ह डक**
इंग्रजी भाषांतर : **रॉबर्ट सी. फ्रेंड**
मराठी भाषांतर : **लक्ष्मण लोंढे**

**ट्रीठॉन हे छोटंसं गांव त्या दुपारी एकदम खडबडून जागं झालं. राच गियाहून सैनिकांच्या लॉऱ्यामागून लॉऱ्या तिथे येऊन दाखल झाल्या. लॉऱ्यांच्या आगमनानं धुळीचे हे लोट उठले. गावातली रस्त्याच्या कडेची घरं, दुकानं धुळीनं भरून गेली. लॉरी थांबली की खाकी गणवेशातले सैनिक भराभर खाली उड्या घेत. जंगलात युद्ध करायचं असल्यामुळे त्यांच्या अंगावर हिरव्या पानांच्या डहाळ्या बांधलेल्या होत्या. धुरळा उडत होता. त्यातच त्यांच्या चामडी आणि कॅनव्हासच्या बुटांचे आवाज येत होते. गटागटानं ते पुढे सरकत होते.**

घरांच्या दरवाजांतून गावकऱ्यांची गर्दी उसळली होती. संचलन करीत जाणाऱ्या सैनिकांकडे गावकरी श्वास रोखून बघत होते. आणि मधून मधून हलक्या आवाजात त्यांच्यावर कडवट टोका करीत होते. जंगल रक्षकांच्या तुकडीतले कितीतरी चेहेरे त्यांच्या परिचयाचे होते. पण गावकऱ्यांपैकी कोणीही त्यांना ओळख दाखवीत नव्हते. खड्या सैन्याच्या तुकड्या थेट सायगावहून आल्या होत्या. त्या तुकड्यांतले सैनिक घरादारांकडे, दुकानांकडे माना उचावून बघत होते. जंगल रक्षकांच्या तुकडीतल्या सैनिकांना गावांत कांही नावीन्य वाटत नव्हते. त्यांचे चेहेरे क्रुद्ध आणि डोळे तारवटलेले दिसत होते. आपल्या टॉमी गन्स आणि बंदुका सावरीत ते संचलन करीत होते.

जंगलरक्षकांचा कमांडर लेफ्टनंट झॅम सर्वांच्या मागून जड पावल टाकीत येत होता. त्याचे डोळे खुनशी होते. डोळ्यांच्या बाहुल्या इतक्या लहान होत्या, की त्या सहजी दिसतच नसत. त्यामुळं तो अधिकच क्रूर दिसे. तो अंगानं जाडजूड आणि भक्कम होता. त्याचा पोशाख त्याला साजेसाच होता. त्याच्या डोक्यावरच्या हॅटला तिन्ही बाजूला ढापणं लावलेली होती. एक डोळ्यावर आणि दोन कानावर दोन. लोक त्याच्या टोपीला थट्टेनं त्रिशूळी टोपी म्हणत असत. कोल्ट १२ जातीचं भलं मोठं पिस्तुल त्यानं आपल्या कमरेवर पाठीमागच्या बाजूस लटकावलं होतं. त्याच्या केसाचा रंग त्याच्या कातडीच्या रंगासारखाच होता. त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर पिस्तुल धक्के खात होतं, शिवाय त्याच्या खांद्यावर रायफल आणि कमरेला अमेरिकन सुरा लटकत होता. त्याच्या तुकडीतल्या सैनिकांचा गणवेश जवळजवळ त्याच्यासारखाच होता. प्रत्येकापाशी एक रायफल, एक टॉमीगन आणि अमेरिकन सुरा होता. पाहणाऱ्याच्या उरात धडकी भरेल असंच ते वातावरण होतं.

चालता चालता झॅम एकदम थांबला आणि शेजारच्या दारूच्या दुकानात घुसला. दुकानाचा मालक चिनी होता. त्याला झॅमनं डोळा मारला आणि त्याच्या लक्षात येण्यापूर्वीच एक बाटली उचलली. कमरेच्या सुऱ्यानं तिचं झाकण झटक्यानं उडवलं आणि ती फेसाळलेली बाटली सरळ तोंडाला लावीत तो बाहेर पडला. जवळ जवळ दोन तृतीयांश बाटली रिकामी केल्यावर ती त्यानं शेजारून चाललेल्या एका सैनिकाच्या हवाली केली. झॅमच्या पावलावर पाऊल ठेवून उरलीसुरली दारू त्या सैनिकानं एका घोटात रिकामी केली. साहेबाकडून अशी बक्षिसी मिळवायची त्याला सवयच होती.

एवढ्यात कमांडरचा थांबण्याचा हुकूम आला.

गावात असलेल्या मिलिटरीच्या चौकीत दोनच फलटणी मावणं शक्य होतं. खड्या सैन्याच्या दोन पलटणींना ती जागा देण्यात आली. उरलेल्या पलटणींना आणि वनरक्षकांच्या तुकडीला तिथेच उघड्यावर, शेतात तंबू-राहुट्या ठोकायची आज्ञा झाली.

सैन्याच्या मुख्याधिकाऱ्यानं त्याच्या तुकड्यांना नियोजित जागी थांबवलं. झॅमची मात्र मनातल्या मनात चुळबुळ चालू होती. साला, स्वतःच्या गावात येऊन सुद्धा मला ह्या उघड्या माळावर झोपावं लागणार की काय ? पण मनातले विचार मनातच ठेवून त्यानं आपल्या तुकडीतल्या शिपायांनाही हाताच्या इशाऱ्यानं तिथेच, शेतात तंबू ठोकण्याचे आदेश दिले.

संध्याकाळ झाली होती. सूर्यास्त पूर्वीचं पिवळं पिवळं ऊन पडलं होतं. चौकीच्या आजूबाजूची जागा ओसाडच होती. सैनिकांची तंबू उभारायची धावपळ चालू होती. चटई मांडण्यासाठी सोइस्कर जागा शोधल्या जात होत्या. मधूनच एखादा सैनिक अमेरिकन थर्मासमधून पाणी किंवा दारू पिताना आढळत होता. काही शेतातच आडवारून सिगारेटी ओढीत होते. सर्वत्र त्यांचा घामाचा, कडक तंबाखूच्या दारूच्या आणि त्यांनी केसांना लावलेल्या उग्र तेलाच्या वासाचा एकच कालवा झाला होता. सैन्याचा तळ कुठेही असो, त्याच्या भोवती नेहमी असाच एक प्रकारचा उग्र, ओकारी आणणारा वास दरवळत असे.

एका झटक्यात झॅमनं आपला शर्ट काढून फेकून दिला. झॅमच्या अंगावर अनेक प्रकारचे ताईत होते. कुणाची दृष्ट लागू नये म्हणून एक तांब्याचा ताईत त्याने गळ्यात घातला होता. मनगटाला कसला तरी मंतरलेला दोरा बांधलेला होता. शिवाय त्याच्या गळ्यात सोन्याची एक सरी सुद्धा होती. तिच्या मध्यभागी एक हस्तिदंती कवटी लटकत होती. कवटीच्या जबड्यातून दोन सुळे बाहेर आलेले दिसत होते. एका कॅनव्हासच्या तुकड्यावर उताणा आडवारून तो सिगारेट ओढीत होता. स्वतःच्या विचारात तो इतका मग्न झाला होता की सिगारेट जळत जळत बोटापर्यंत आलीय हेही त्याच्या ध्यानात आलं नाही. बोटाला चटका बसताच त्यानं झटक्यात सिगारेटचा उरलेला तुकडा फेकून दिला आणि तो उठून बसला. त्याचे काही सैनिक अन्नाची पाकिटं सोडीत होते. तिकडे तो डोळे वासून पाहू लागला. सैनिकाच्या गराड्यातून एक नोकर त्याच्याकडे येऊन म्हणाला–' बडे भैय्या, जेवण तयार आहे. '

निरुत्साहीपणेच झॅम उठला, आणि नोकराच्या पाठोपाठ गेला. थोड्या अंतरावर दुसरा एक कॅनव्हासचा तुकडा अंथरलेला होता. त्यावर जुनी वर्तमानपत्रं पसरून ठेवलेली होती. त्यावर भाजलेली कोंबडी, पावाचे मोठमोठे तुकडे, आणि सारडाइन माशांनी भरलेले डबे ठेवलेले होते. झॅम उदास झाला होता. खिन्नपणे त्याने विचारले, –' प्यायची काय सोय आहे ? संपली की काय सगळी दारू ?'

' ये लीजिये, बडे भैय्या. ' दारूनं भरलेली एक मोठी शिशी झॅमपुढे करीत नोकर म्हणाला. झॅमनं बाटली उचलली, झाकण काढलं आणि सरळ तोंडाला लावली. अर्धी बाटली घशाखाली घातल्यावर त्यानं ती नोकराच्या स्वाधीन केली आणि कोंबडीकडे मोर्चा वळवला. एका झटक्यात त्यानं तंगडी धडापासून वेगळी केली. आणि ती तो मनस्वीपणे खाऊ लागला. खाताना त्याचे सोन्याचे दात चमकू लागले. कोंबडीच्या तंगडीचे स्नायू चघळताना, झॅमच्या तोंडाच्या कोपऱ्यातून लाळ गळत होती आणि मधून मधून ती तो उघड्या मनगटाला पुसत होता. त्यानं मग आपल्या नोकरालाही खुणेनं आपल्याबरोबर जेवायला बोलावलं. साहेबाबरोबर जेवायला मिळाल्यानं नोकराला धन्य धन्य झालं. तांदळापासून केलेल्या दारूचे घोटामागून घोट घेत झॅमनं उरलेल्या कोंबडीचाही फडशा पाडला.

त्याचं जेवण संपेपर्यंत पार संध्याकाळ झाली होती. सूर्य अस्ताला जात होता. सूर्याची चकाकती सोनेरी तबकडी क्षितिजाच्या कडेवर रेंगाळत होती.

झोकांड्या खात झॅम उभा राहिला. दोन्ही हातांनी मग त्याना

आपल्या बरगड्या कराकरा खाजवल्या. मावळत्या सूर्याकडे पहात त्यानं मग तोंडातल्या तोंडात कसली तरी प्रार्थना म्हटली. त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणालाच तिचा एकही शब्द ऐकू आला नाही. फक्त त्याचे सोन्याचे दात चमकलेले दिसले. त्याचे बरेचसे सैनिक आता पिऊन तर्रर्र झाले होते. सगळी दारू फस्त झाली होती. आणि उरल्यासुरल्या पावाच्या तुकड्यांची सैनिक आपापसात वाटणी करीत होते. त्यांच्यापैकी काहीजणांनी आपले शर्ट काढले होते. त्यांची उन्हानं रापलेली अंग उघडी पडली होती. काहींच्या अंगावर सापाच्या, राक्षसाच्या आकृती गोंदलेल्या दिसत होत्या. सापडतील तिथून चोरूनमारून काहीजण रात्रीच्या शेकोटीसाठी लाकडं गोळा करण्यात मग्न होते.

रात्र झाली. सर्वत्र दाटलेल्या मिट्ट काळोखात ठिकठिकाणी पेटलेल्या शेकोट्या प्रकाशाच्या पुंजक्यांसारख्या दिसू लागल्या. काठ्यांच्या टोकाना डबे बांधून पिण्याचं पाणी उकळण्याचं काम ठिकठिकाणी चालू होतं. वास्तविक कँप सोडून जायचं नाही अशी त्यांना आज्ञा होती, पण तरीही काहीजण गावात दारू, अन्न आणायला हळूच सटकले होते. ही आज्ञा खुद्द सायगावहून आलेली असली तरी तुकड्यांच्या छोट्या छोट्या अधिकाऱ्यांनी तिकडे दुर्लक्ष केलं होतं.

झॅम त्याच्या सैनिकांबरोबर दारू पिण्यात रंगला होता. सैनिक त्याची खुशामत करीत होते. आणि त्याला आणखी दारू पाजीत होते. ते त्याला बडे भैय्या आणि त्याच्या साहाय्यक अधिकाऱ्याला–सेकंड लेफ्टनंटला–छोटे भैय्या म्हणत होते. झॅमलाही त्यांनी सर म्हणण्यापेक्षा बडे भैय्या म्हटलेलं आवडत असे.

'बडे भैय्या ग्रेट आहेत. ते कितीही प्यायले तरी झिंगत नाहीत.' एकजण म्हणाला.

'घ्या' म्हणत दुसऱ्यानं आणखी एक ग्लास पुढे केला.

झॅम आता खुशीत आला होता. कुणीही घ्या म्हटलं की तो घेत होता. कितीही घेतली तरी त्याला चढत नाही हा त्याचा लौकिक खरा होता–माशाला पाण्यात राहिल्यानं कधी सर्दी झाल्याचं ऐकिवात आहे का कुणाच्या ?

आता त्याचे डोळे तारवटून लालभडक झाले होते. त्याच्या डोळ्यातून रक्त सांडावं किंवा आग बाहेर पडत असावी तसा भास होत होता. त्याच्या खुशमस्कऱ्यांनी त्याच्याभोवती कडं केलं होतं. ते त्याच्या अलौकिक 'पान' कौशल्याची आणि कलात्मकरीत्या माणसं ठार मारण्याच्या पद्धतीची स्तुती करीत होते.

'बडे भैय्या, आता गावी आलाच आहात तर घरी जाऊन येणार की नाही ?'

हातातली बाटली खाली ठेवून झॅम बराच वेळ गप्प बसला. शेवटी तो म्हणाला–'अलबत्, मी उद्याच माझ्या आईला आणि बहिणीला भेटायला गावात जाणार आहे.'

'बहीण कोण ? का माय् ना ? बडे भैय्या, आता ती मोठी झाली असेल नाही ?' एकानं विचारलं.

'साधारण अठराएकोणिशीची झाली असेल.' झॅमनं उत्तर दिलं.

'तुम्ही त्यांना शहरात राहायला बोलावलं होतं ना ? मग ते आले नाहीत ?'

'ते भले न येऊ दे शहरात, आपणच हॉन डॅट गावात आलो की नाही. शिवाय आता आपण ह्या गावातच तळ ठोकणार आहोत तेव्हा मी त्यांना आपल्या चौकीवरच राहायला यायला सांगणार आहे.' मग हलक्या आवाजात, खास माहिती सांगावी तसं तो म्हणाला, 'हॉन डॅट गाव राहायला फारच मजेशीर आहे. मी इथे कमांडर होतो, तेव्हा किती सुखी होतो ! खायची-प्यायची चंगळ होती. निरनिराळ्या प्रकारची फळं, मांस रोज ताजं मिळायचं आणि इथल्या पोरी ? च्यायला, एकापेक्षा एक सरस. एकेकीचे बॉल बघावे तर हे नारळाएवढे. च्यायला, तुमच्यासारख्यांच्या हातातसुद्धा मावायचे नाहीत !'

उद्यापासून मिळणाऱ्या सुखाच्या अपेक्षेनं सैनिकांच्यात हास्याची एकच लाट पसरली.

उद्यापासून आपण एका स्वर्गसुखात नांदणार आहोत याबद्दल प्रत्येकाची खात्री होती. कदाचित उद्यासुद्धा क्रांतिकारकांच्या गोळ्यांना आपण बळी पडू याची त्या क्षणी कोणालाच पर्वा वाटत नव्हती. उलट उद्या किती स्त्रियांना आवळायचं आणि त्यांचा उपभोग घ्यायचा याचीच स्वप्नं ते रचीत होते. त्यांच्यापैकी जे कोणी पूर्वी हॉन डॅटला आले होते ते आपल्या इथल्या अनुभवांच्या फुशारक्या मारीत होते. 'म्हशीचं मास खावंसं वाटलं की बस, बंदूक उचलायची, दिसेल त्या पहिल्या म्हशीला गोळी घालायची. बस, मामला खतम–गावकऱ्यांपैकी कुणाची हू की चू करायची छाती नाही.' ते रंगवून रंगवून सांगत होते. एकाने आपण केलेल्या अनेक बलात्कारांचं साग्रसंगीत वर्णन केलं आणि अभिमानानं सांगितलं–'मी स्वतः कमीत कमी तेरा पोरींच्या चड्ड्या फाडल्या होत्या !' एकानं एका व्हिएतकाँगला आपण कसं ठार मारलं याचा किस्सा सुनावला–'साल्याच्या डोक्यात बोटीच्या वल्ह्याचा एकच असा फटका मारला की त्याचं डोकं फुटून मेंदूच्या पार चिंध्याच झाल्या.

माणसाची पोटं फाडून त्यांची काळिजं बाहेर काढणाऱ्या बडे भैय्यांच्या कौशल्याचीही सगळ्यांनी मनापासून स्तुती केली. 'बडे भैय्या बेंबीच्या वरच्या भागात एकदाच सुरी खुपसतात आणि कुशलतेनं ती अशी फिरवतात की एकदम काळीज हातात येतं, आख्खंच्या आख्खं !'

झॅमनं आतापर्यंत अशी पोटं फाडून कित्येकांचा बळी घेतला होता. पोटं फाडण्याच्या त्याच्या झपाट्याबद्दल आणि काळीज व पित्ताची पिशवी न फाडता बाहेर काढण्याबद्दल त्याची कीर्ती होती. पण त्याचं कौशल्य एवढ्यापुरतं मर्यादित नव्हतं. माणसांना ठार मारण्याचे आणखी कितीतरी मार्ग त्याला माहीत होते. हॉन डॅटवर अविरोध राज्य करणाऱ्या मू नावाच्या जमीनदाराचा झॅम मुलगा होता. त्याच्या नसानसातून त्याच्या बापाचं रक्त खेळत होतं. झॅमची आई का झोई एक दुर्दैवी ख्मेर स्त्री होती. तिचं सारं आयुष्य मू च्या जनानखान्यात गेलं होतं. ती गरीब, सुस्वभावी होती. पण तिच्या रक्तातला एकही गुण झॅमच्या रक्तात उतरला नव्हता.

त्याची आई तारुण्यात सुंदर दिसायची. ती जातीनं कुंभार होती. काळी असली तरी तिची कांती तुकतुकीत होती. सगळ्याच ख्मेर स्त्रिया हॉन डॅटपासून ३० किलोमीटर दूर असलेल्या राच गिया ह्या जिल्ह्याच्या गावी आठवड्याच्या बाजाराला मडकी विकायला जात. डोक्यावर मडकी घेऊन जायच्या त्यांच्या सवयीमुळे त्यांच्या चालीत

एक प्रकारचा डौल असे. नदीवरून त्या पाणी घेऊन येतात ते दृश्यही पहाण्यासारखं असतं. एकावर एक अशी दोन तीन मडकी हातानं स्पर्शही न करता त्या मैलोन् मैल घेऊन जाऊ शकतात. मान हलत नाही की मडकं पडत नाही. हात आपले दुसरं काही उचलायला मोकळे.

जमीनदार मू ने का झोईला जबरदस्तीनं आपली रखेली बनविली होती. तिचा प्रियकर थाच खा त्यामुळं जीवनाला वैतागून गाव सोडून दूर कांबोडियात खलाशाचं काम करायला चालता झाला होता. का झोईला झॅम झाल्यावर मू तिच्याकडे दुर्लक्ष करू लागला व नव्या पोरींच्या शोधात फिरू लागला. तरीही तिला परत दिवस गेले होते. त्यावेळी तिच्या तशाही अवस्थेत झॅमला स्वतःकडे ठेवून घेऊन मूनं तिला घराबाहेर हाकलून दिलं होतं.

का झोई पुन्हा हॉन डॅटला आली आणि एका लहानशा झोपडीत राहू लागली. कुणाकुणाच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करू लागली. पूर्ण दिवस भरले तरीही ती शेतातच काम करीत होती. पोटात दुखू लागलं तेव्हा ती एकटीच शेताच्या एका बांधाच्या आडोशाला गेली. कळा न सोसवून किंचाळायची पाळी आली तेव्हा आपल्या किंकाळ्या इतरांना ऐकू जाऊ नयेत म्हणून तिनं पेंढ्याचा जुडगा आपल्या दातात घट्ट धरून ठेवला. सुदैवानं संध्याकाळच्या वेळी वाम रॅंगच्या बाजारातून परत येत असलेल्या साऊ आणि सूला ती शेताच्या बांधापाशी बेशुद्धावस्थेत आढळली. त्यांनी तिला आपल्या घरी आणली. अशा रीतीने का मायचा—झॅमच्या बहिणीचा जन्म साऊच्या घरी झाला.

नंतर आठवड्याभरातच थाच खा कंबोडियातून परत आला. तो साऊकडे आला. त्याने तिचे आभार मानले आणि का झोईला व मुलीला घेऊन यायची इच्छा प्रदर्शित केली. काही महिने लोटले. थाच खा जंगलात लाकडे तोडायचे काम करू लागला. एके दिवशी मूच्या भाडोत्री गुंडांनी तो जंगलात गेलेला असताना त्याच्यावर हल्ला केला. आपल्या कुऱ्हाडीनं त्यानं त्यातल्या एकाला लोळवलं. पण ते बरेच होते. त्यांच्यापुढे त्याचा एकट्याचा टिकाव लागला नाही. प्राणघातक जखमा झालेल्या स्थितीतही तो तसाच खुरडत खुरडत घरी येत होता. पण घराच्या अंगणातच रक्ताची गुळणी ओकून त्यानं प्राण सोडला. पोटाची आग जाळण्यासाठी का झोईनं पुन्हा आपलं कुंभारकाम सुरू केलं. का माय कलाकलानं वाढत राहिली आणि वयात आली तेव्हा थेट आपल्या आईसारखी दिसू लागली.

झॅम आपल्या बापाजवळच राहिला, वाढला. त्याच्या भक्कम दगडी वाड्यात, त्याला बापाच्या सगळ्या व्यसनांची, दुर्गुणांची यथायोग्य दीक्षा मिळाली. त्याच्या बापानं बऱ्यावाईट मार्गानं बरीच इस्टेट जमा केली होती. त्यात फळबागा होत्या तशीच शेतजमीनही होती. तो कुणबांना जबर पट्ट्यानं जमिनी देत असे. बंड झालं त्या वेळी मू राच गियाला पळून गेला होता. संतापलेल्या शेतकऱ्यांनी त्याचा वाडा जाळून, मोडून-तोडून नष्ट केला होता. क्रांतिकारकांनी त्याची जमीन जप्त करून शेतकऱ्यांमध्ये वाटून टाकली होती.

पण शांतता झाल्यावर मू पुन्हा झॅमला घेऊन गावी आला होता. आता झॅम गो दिन दिएमच्या सैन्यात सेकंड लेफ्टनंट झाला होता. मूनं पुन्हा साऱ्या जमिनी बळकावल्या, पुन्हा घर बांधलं. वर्षानुवर्षांचा त्याचा क्रांतिकारकांविरुद्धचा द्वेष आता उफाळून आला होता. झॅम तर त्याच्या बापाहूनही क्रूर बनला होता. त्याच्यापाशी अमेरिकन रायफल होती. हाताखाली रक्तपिपासू सैनिकांची तुकडी होती. त्याचे अरण्यरक्षक घोड्यासारखे चपळ होते. ते क्रांतिकारकांचा शेतांतून, जंगलांतून भरधाव पाठलाग करीत आणि रात्रंदिवस जंगलातल्या त्यांच्या अड्ड्यावर हल्ले करीत. त्या काळात मुसळधार पाऊस पडत असताना, मध्यरात्री, भल्या पहाटे, केव्हाही गोळीबाराच्या फैरी ऐकू येत. क्रांतिकारकांबरोबर असलेल्या गावातल्या कुणाचा तरी मुलगा, कुणाचा तरी नातेवाईक, कुणाचा तरी मित्र गोळीबाराला बळी पडल्याचं मग ऐकू येई.



घराच्या अंगणातच रक्ताची गुळणी ओकून त्यानं प्राण सोडला.

——पण गावकऱ्यांपेक्षाही ह्याचं सर्वांत जास्त दुःख जर कोणाला होत असेल तर ते का झोईला.

१९५९ साली पुन्हा बंड झालं तेव्हा लोकांनी मूला फाशी दिलं. झॅम मात्र त्यांच्या हातातून निसटला आणि तेव्हापासून झॅमचा ह्या गावावरचा राग आणखीनच बळावला.

हॉन डॅटमधल्याच काय, जगातल्या प्रत्येक मातेला कसलं ना कसलं तरी दुःख असतंच. पण का झोईचं दुःख इतर कोणत्याही मातेच्या दुःखाहून मोठं होतं. झॅम जेव्हा हॉन डॅटच्या चौकीचा कमांडर होता तेव्हा कुठून तरी लूटमार केलेल्या कितीतरी मौल्यवान वस्तू, रेशमी कपडे, सोननाणं त्यानं आपल्या आईला व बहिणीला देऊ केलं होतं. पण दोघींनीही त्या देणग्या नाकारल्या होत्या. त्याच्या आईनं त्या वस्तू अंगणात फेकून दिल्या होत्या. मग ओंजळीत तोंड लपवून बराच वेळ ती एकटीच रडली होती. ☐

का झोई गावच्या वेशीवरच्या बा ऊच्या दुकानावर जात होती. रात्रीच्या काळोखात, हातात एक बाटली घेऊन ती एकटीच गप्पपणे चालली होती. रात्रीच्या अंधारात दिवा न घेता एकटंच कोणी रस्त्यानं चालताना आढळलं की, हॉन डॅटच्या लोकांना ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून का झोईच आहे, हे माहीत असे. तिची ती सवय आता लोकांच्याही अंगवळणी पडली होती. ती थोडीशी वेडसर झाली आहे असं लोक म्हणत. असं असलं तरी भर काळोखातही दगडाधोंड्यांना न अडखळता आणि रस्त्याच्या बाजूला आडोशासाठी खोदलेल्या कुठल्याही चरात न पडता ती नीट जात असे ही आश्चर्यजनक बाब होती. काळोखात तिला जणू दिसत असे.

ती दुकानात आली तेव्हा दुकान रिकामंच होतं. उंबरठा ओलांडून

ती आत आली तेव्हा तिला कंदिलाच्या उजेडात पैसे मोजीत असलेली बा ऊ दिसली. पावलांची चाहूल लागताच बा ऊनं मान वर करून पाहिलं आणि विचारलं, 'कोण ? का झोई का ग ? अग एवढ्या रात्रीची कशाला आलीस ?'

का झोईनं तोंडानं उत्तर दिलं नाही. फक्त आपल्या हातातली रिकामी बाटली दाखवली. बा ऊ काय ते समजली. ती उठली. आपलं गलेलठ्ठ शरीर डुलवीत डुलवीत ती का झोईपाशी आली आणि तिनं बाटली घेतली. तसंच ती डुलत डुलत आत गेली. आतल्या बाजूला एक मोठा दारूनं भरलेला रांजण होता. फनेल न घेता मोठ्या कौशल्यानं बा ऊनं थोडीशी दारू जमिनीवर एक थेंबही न सांडता का झोईच्या बाटलीत ओतली.

बाटली परत का झोईच्या हवाली करता करता ती सहज म्हणाली, 'तुला बातमी कळली असेलच ना ?'

'कसली बातमी ?' मान हलवीत का झोईनं विचारलं.

बा ऊ तिच्या कानात पुटपुटली, 'झॅम परत आलाय्. ट्री टॉनमध्ये मिलिटरीच्या एका जीपमधून खाली उतरताना मी त्याला पाहिलं.'

'झॅम ट्री टॉनमध्ये परत आलाय् ? देवा-देवा' का झोई म्हणाली आणि एकदम तिची मान खाली गेली. पुन्हा काही तिनं मान वर करून पाहिलं नाही. एखाद्याला वाटावं की, ती जणू काही जमिनीवर काही तरी शोधत्येय् ! मग ती घाईघाईनं वळली. पण तिच्या पायातलं त्राणच आता नाहीसं झालं होतं. ती उंबरठ्याला अडखळली आणि पडली. तिच्या हातातली बाटली पडली, फुटली आणि सगळी दारू जमिनीवर सांडून गेली. पण काय झालं, हेही न समजून ती एकदम भ्रमिष्टासारखी चालू लागली !

बा ऊ तिच्या मागोमाग धावली. तिचा हात पकडीत तिला म्हणाली-'अग का झोई, मागं ये. मी तुला पुन्हा दारू देत्ये. मग तर झालं !' तिनं तिला हाताला धरून परत आणलं. दुसरी बाटली दारूनं नीट भरली. तिला घट्ट बूच लावलं आणि ती का झोईच्या हातात देत ती म्हणाली-'बाई ग, आता संभाळ, नीट जा, पडू नकोस.'

का झोईची स्थिती एखाद्या अजाण लहान मुलासारखी झाली होती. बा ऊनं सांगितल्याप्रमाणे तिन नवी बाटली दोन्ही हातात घट्ट धरली आणि एकही शब्द न बोलता ती पुन्हा दुकानाबाहेर पडली. तिची झोपडी दुकानापासून तशी बरीच दूर होती. ती अनेक वेळा धडपडली, पडली.

का माय झोपडीबाहेरच चटई अंथरून बसली होती. दिव्याच्या पिवळ्या मिणमिणत्या प्रकाशात ती तागाची पिशवी विणीत बसली होती. आई आलेली दिसताच तिनं एकदा मान वर करून पाहिलं पण लगेच परत मान खाली करून ती आपले काम करू लागली.

'का माय, झॅम परत आलाय्. आता तो ट्री टॉनमध्ये आहे.' शेवटी का झोईच बोलली.

'ट्री टॉनमध्ये ? कुणी सांगितलं तुला ?' मुलीनं विचारलं.

'बा ऊ म्हणाली.'

फळकुटांच्या पलंगावर मांडी घालून बसत का झोई हे वाक्य म्हणाली आणि एकदम गप्प झाली. ती बराच वेळ निस्तब्ध होती. मग तिनं एका छोट्या कपात थोडीशी दारू ओतून घेतली आणि एका घोटात पिऊन टाकली. भिंतीवरच्या आपल्या सावलीकडे पहात ती पुन्हा गप्प बसली.

रात्री दोन-तीन पिशव्या विणून झाल्या की घोटभर दारू प्यायची तिची रोजचीच संवय होती. त्या दारूच्या घोटानं तिला गरगरल्या सारखं तर वाटत नसेच पण उलट तिचा मेंदू अधिक तरतरीत होत असे.

आजही तिला एकदम आपल्या जुन्या आठवणी आठवल्या. का मायकडे बघता बघता तिला स्वतःचं बालपण दिसू लागलं. तिनं स्वत: चाकावर आकार दिलेल्या, विविध आकारांच्या मडक्यांची तिला आठवण झाली. भट्टीत टाकली की ती मडकी लाल लाल होऊन जात. तसंच तिला बालपणी केलेल्या झू के नाटकाची आठवण झाली. त्या नाटकात थाच खा राजपुत्राचं काम करायचा आणि ती एका गरीब मुलीचं काम करायची. मग ते बालपण सरलं. आता तिच्या डोळ्यासमोर जमीनदार मू चा चेहरा उभा राहिला. त्या प्रचंड दगडी वाड्यात घडलेले अनेक प्रसंग आठवले. थाच खा कांबोडियातून परत आल्यावर दारिद्र्यातही सुखात घालवलेले काही मोजकेच दिवस आठवले. आणि मग तो दुर्दैवी प्रसंग-थाच खा अंगणात पडला आहे. उपडा पडल्यामुळे त्याच्या नाकातोंडात माती गेलेली आहे. त्याच्या जिवाची तडफड चालू आहे. त्या अखेरच्या क्षणीही कशाला तरी घट्ट पकडून ठेवण्याचा प्रयत्न करणारी त्याच्या हातांची केविलवाणी धडपडही तिला स्पष्ट आठवली. आपल्या भिंतीवरच्या सावल्याकडे आणि पिशव्या विणणाऱ्या आपल्या मुलीकडे आलटून पालटून पाहताना ही सगळी दृश्ये का झोईच्या मनःचक्षूसमोर तरळून गेली.

-नंतर क्रांती झाली होती. तिचा एक परिणाम म्हणून तिला थोडीशी जमीन मिळाली होती. हे ती कधीच विसरू शकत नव्हती.

'झॅम परत येतोय्-' बा ऊ चे ते शब्द अजून तिच्या कानात घुमत होते. आता आणखी किती निरपराध माणसांचे झॅम मुडदे पाडणार आहे देव जाणे ! 'झॅम. तू येऊ नकोस, चालता हो-' तिला किंचाळावंसं वाटत होतं. झॅम अचानक मेला तरी बरं होईल असाही विचार तिच्या मनात येऊन गेला.

वास्तविक आपला पोटचा मुलगा मरावा अशी इच्छा कुणाही आईच्या मनात येणं शक्य आहे का ? पण झॅम मरावा अशी इच्छा का झोईच्या मनात वारंवार येत असे हे खोटं नव्हत. तो जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत असेच अश्राप जिवांचे खून करणार, आणि ती त्या दुःखान झुरत राहणार होती हा दैवदुर्विलास होता ! तिच्या दुःखाचा अंत केवळ तिच्या स्वतःच्या किंवा झॅमच्या मृत्यूनेच होणं शक्य होतं.

का मायनं एकदा उद्वेगानं आईला म्हटलं होतं-'असा मुलगा तुझ्या पोटी आलाच कसा ? मी तर त्याला माझा भाऊ मानायला बिलकुल तयार नाही.'

का झोईचं मन तरी त्याला मुलगा मानायला कुठे तयार होतं ? ती शेजाऱ्यापाजाऱ्यांपाशी म्हणतही असे-'झॅम माझा मुलगा नाही, तो राक्षस आहे.' ती लोकांना अजीजीनं सांगत असे-'माझा मुलगा

पृष्ठ ३६ वर

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा क्रमांक – १३

# खुनी बद्रोद्दीनच्या निकाल!

अशोक परळीकर, परभणी

मनमाड काचीगुडा गाडीत बसण्यासाठी दोघे कोवळे तरुण मनमाड स्थानकावर आले. एकाच्या पायाला भले मोठे बँडेज होते. तो लंगडत होता. दुसऱ्या मुलाच्या हातात असणाऱ्या एका पिशवीत मोसंबी आणि औषधाच्या बाटल्या दिसत होत्या. हाशहुश्श करीत त्यांनी गाडीत बैठक मारली. सहज शेजारी पाहिले. एक म्हातारा मुसलमान त्यांच्याकडेच पहात होता. त्याने विचारले, 'क्या हुआ है ?' 'भारी जख्म हुई है । डॉक्टरी इलाज करनेकी ताकद नहीं । गरीब है । गाँव जा रहे हैं ।' 'यह तुम्हारा कौन है ?' 'छोटा भाई.' बँडेजवाला कण्हत होता. तसे म्हाताऱ्याने विचारले, 'बहुत दर्द है ?' 'जी हाँ, पैर काटना पडेगा मालूम होता है ।' म्हाताऱ्याने 'फिक्र मत करो, जल्दही कम हो जाएगा ।' असे सहानुभूतीने म्हटले. प्रवाशांची गर्दी वाढली. पुढचे बोलणे खुंटले. ठरल्यावेळी गाडी सुरू झाली.

रोटेगाव स्थानक आले. गाडी थांबली. गाडीच्या प्रत्येक दाराशी मुसलमान रझाकारांनी गर्दी केली. 'नारे तकबीर अल्ला हो अकबर'च्या घोषणा उंच स्वरात दिल्या. हे तरुण बसलेल्या डब्यात दोन पोलीस आणि काही रझाकार घुसले. झडती सुरू झाली. 'काफिरोंको नीचे उतारो, उनका सामान नीचे उतारो' असा बाहेर ओरडा चालू होता. गाडीत असणाऱ्या त्या तरुणांचे चेहरे पडले. म्हाताऱ्याने त्यांच्याकडे पाहिले. 'क्या बात है बेटे ? यहाँ सबको क्यों उतार रहे हैं ?' बँडेज नसलेल्या तरुणाने विचारले आणि बँडेजवाल्याने कण्हण्यास प्रारंभ केला. 'उठो, उठो–' तो तरुण आज्ञाधारकासारखा उभा राहिला. एका रझाकाराने येऊन त्याला गचांडी दिली. 'सुना नही. नीचे उतर.' असे रागात म्हटले. शेजारचा म्हातारा मुसलमान त्या रझाकारावर रागात ओरडला, 'ठैरो, आँखे फुट गयी हैं ? यह हरगीज नही उतरेगा । वह बीमार के साथ का आदमी है । बिचारे गरीब है । इन्हे मत उतारो. जाओ ।' म्हाताऱ्याने त्या तरुणाला जखमी तरुणाशेजारी बसविले. रझाकाराने त्या मुसलमानाकडे पाहिले आणि तो गुपचूप दुसरीकडे वळला. त्या तरुणानें म्हाताऱ्याचे पुनः पुन्हा आभार मानले. अल्लाने त्याला लंबी उमर द्यावी म्हणून प्रार्थना केली. त्याने विचारले, 'कहाँ तक जा रहे हो ?' 'सेलू' 'ठीक है । तुम फिक्र मत करो, मैं वहाँ तक तुम्हारे साथ हूँ । तुम्हे कोई तकलीफ नही देगा ।' 'शुक्रिया, शुक्रिया' त्या तरुणाने पुनः पुन्हा म्हटले. गाडी हलली. तरुणाने सुटकेचा निश्वास सोडला. जखमी तरुण जखमेच्या वेदनेने अधुनमधून कण्हतच होता.

गाडी सेलू स्थानकावर थांबली. जखमी मुलाला खाली उतरण्यास मदत करण्यासाठी म्हातारा नको नको म्हणत असतानाही सरसावला. त्या मुलाला कसेबसे खाली उतरवण्यात आले. म्हाताऱ्याने 'दवापानी करलो' म्हणून आपुलकीने सांगितले आणि तो गाडीत जाऊन बसला. गाडी हलली तसे या दोघांनी त्या म्हाताऱ्याचा निरोप घेतला. म्हाताऱ्यामुळे आपण आज संकटातून वाचलो याचे त्या दोघांनाही भान होते. त्यांनी मनोमन त्या म्हाताऱ्यासाठी प्रार्थना केली.

स्थानकाबाहेर येताच करोडगिरी नाक्यावर नाममात्र झडती घेण्यात आली. जखमी तरुण कण्हत असल्यामुळे झडतीचे काम वरवर झाले. 'क्या है साथमें ?' 'कुछ नही, यह एक थैली है, बस्स.' 'थैलीमें क्या है ?' 'मोसंबी और दवा.'–'चलो, आगे चलो.' त्यांना बाहेर पाठविण्यात आले. त्या तरुणांनी नाक्यापासून दूर येताच एकमेकांकडे पाहिले. 'काय आनंद, कसा होता अभिनय ?' 'First Class, पण त्या म्हाताऱ्याची मदत झाली नसती तर– ?' 'कबूल, पण माझे कण्हणे नॅचरल वाटले की नाही ?' 'इतके नॅचरल की, मलाही तुला खरंच जखम झाली आहे की काय असे वाटत होते.' दोघेही मोकळेपणाने हसले. मनावर केवढे मोठे ओझे होते. आता ओझे पूर्ण उतरले होते. रोटेगावला त्या दोघांना खाली उतरवून (जबरदस्तीने) त्यांची झडती लक्षपूर्वक घेण्यात आली असती तर–? निदान सेलूला पिशवीतील सर्व सामान बाहेर काढून पाहिले असते तर–पण तसे घडले नाही म्हणूनच ते तरुण आनंदले. समाधानाने हसले आणि झपझप पावले टाकीत देवधर वकिलांच्या घराकडे वळले. ◻

हे तरुण कोण होते ? त्या तरुणाला कशाची जखम झाली होती ? पिशवीत काय काय होते ? कशासाठी ? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. ते दोघे तरुण (कोवळ्या वयाचे) होते स्वातंत्र्य सैनिक. हैदराबादच्या रझाकारांना आणि निझामी पोलिसांना त्या अमानुष अन्यायाबद्दल धडा शिकवावयास निघालेले दोघे कडवे तरुण.

हैदराबादचा निझाम आणि हैदराबादेतील जात्यंध मुसलमान हैदराबाद संस्थानाला स्वतंत्र ठेवू इच्छित होते. इत्तेहादूल मुसलमीन ही मुसलमानांची संघटना केवळ विषारी प्रचार आणि हिंदूंचा द्वेष करण्यासाठीच जन्मली होती. राज्यातील बहुसंख्य हिंदूंना धास्ती बसवावी, त्यांच्यावर रुबाब जमवावा, त्यांना असहाय्य बनवावे म्हणून राज्यात हे मुसलमीनचे कार्यकर्ते दिवसाढवळ्या हिंदूंच्या खोड्या काढीत आणि

'उलटा चोर कोतवालकोडांटे 'या न्यायाने हिंदूंनाच ठोकीत. परत दाद ना फिर्याद. निझामी पोलीस त्या रझाकारांना वश. सर्व राज्यभर या इत्तेहादूल मुसलमानांचा धुडगूस चाले. अन्याय वाढला तशी हिंदूंमध्ये संघटनेची इच्छा, स्वसंरक्षणाची इच्छा बळावली. गावोगाव लोकांना दिलासा देणारे, त्यांना सर्वतोपरी सहाय्य करणारे कार्यकर्ते तयार झाले. घरादारावर या कार्यकर्त्यांनी तुळशीपत्र ठेवले होते. अशा कर्तृत्ववान कार्यकर्त्यांपैकी एक होते श्री. गोविंदराव पानसरे. गोविंदराव पानसरे हे वृत्तीने अतिशय साहसी, निष्ठावान, सत्यप्रिय होते. महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानावर त्यांचा नितांत विश्वास. शांतताप्रिय आणि अहिंसक मार्गाने आंदोलन व्हावे असे यांचे निश्चित मत. गावोगाव जाऊन हे लोकांत कीर्तनाद्वारे जागृती निर्माण करीत. इत्तेहादूलच्या रझाकारांना यांचा हा शांततामय मार्ग पसंत पडला नाही. त्यांनी २१ ऑक्टोबर १९४६ रोजी तलवारीच्या सहाय्याने त्यांच्यावर निर्घृण हल्ला केला. पानसऱ्यांबरोबर असलेल्या पुंडलिक पाटलाने आपल्या शरिराची ढाल केली. परंतु तलवारीच्या घावांनी १९ वर्षांचे ते कोवळे पोर खाली कोसळले. ते मेले असे समजून त्या पोराचा आश्रय काढून गोविंदराव पानसऱ्यांवर निर्दय घाव घालण्यात आले. रस्त्यावर रक्ताचा सडा पडला. शांतीपूजकाचा काटा तलवारीचे घावाने काढण्यात आला. हिंदू लोकांना हे वृत्त कळले तेव्हा त्यांना अतिशय राग आला. त्यांनी या साऱ्या प्रकरणाचा सूड घ्यावयाचा ठरविला. गोविंदरावांबद्दल जनमानसात फार पूज्य भाव होता. अनेक लोक भाविकतेने त्यांचे कीर्तन ऐकत, त्यांना नमस्कारही करीत. गोविंदराव पानसऱ्यांना मारल्यास हिंदू लोकांना दहशत बसेल ही कल्पना फोल ठरली. हिंदू पेटून उठले. यापैकी दोघे म्हणजे हे तरुण, आनंद कौसडीकर आणि द. रा. मेढेकर. याशिवाय मधुकर औंढेकरही होता. गोविंदराव पानसरे यांना मारविण्यात बद्रोद्दीन नावाचा पोलीस इन्स्पेक्टर सक्रीय होता हे कळताच आधी त्याचा निकाल लावावयाचे ठरले. मनमाडला या मुलांना बोलावून त्यांना एकूण योजना समजावून सांगण्यात आली. या अत्याचारी इन्स्पेक्टरची बदली परभणी जिल्ह्यातील 'बोरी' पोलीस ठाण्यावर झाली होती. आल्या आल्या हिंदूंना मारझोड करणे, अकारण शिव्या देणे, उगाचच ठाण्यावर बोलावून धाक देणे आदी उद्योग या बद्रोद्दीन महाशयाने आरंभिला. आपले नाव निघाल्यास हिंदू लोक चळचळा कापतात असे तो मोठ्या गर्वाने सर्वांना सांगे.

त्याचा निकाल लावावयाचा हे नक्की झाले. अत्याचारी बद्रोद्दीनचा अन्याय बंद पाडण्याचा हा एकच मार्ग होता—अगदी हमखास मुलांकडून गुप्ततेची शपथ घेण्यात आली. त्यांना रिव्हॉल्व्हर्स आणि हँडग्रेनेडस् देण्यात आले. दिलेली शस्त्रास्त्रे गुप्तपणे न्यायची कशी? जागोजाग झडती घेतली जावयाची शक्यता. पकडले गेलो तर? त्यांना विषाच्या गोळ्याही देण्यात आल्या होत्या. तशीच काही परिस्थिती उद्भवली तर त्यांनी विषाच्या गोळ्या खाव्या; परंतु योजना कोणालाही सांगू नये असे बजावण्यात आले. गोळ्यांची पुडी मुलांनी व्यवस्थित बरोबर घेतली. कोणत्याही परिस्थितीत फितुरी होणार नाही—प्रसंग आलाच तर आनंदाने गोळ्या खाऊ, असे त्या मुलांनी निश्चयाने सांगितले. बद्रोद्दीनचा निकाल लावण्याची प्रतिज्ञा या मुलांनी केली आणि कार्यकर्त्यांना निश्चित राहाण्यास सांगितले. त्यांचा चेहरा, आपणास देशासाठी काहीतरी करण्यास मिळते आहे यामुळे या आनंदाने फुलला होता.

शस्त्रे न्यावयाची कशी? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सापडेना. शेवटी एक शक्कल निघाली. मेढेकरांच्या पायाला बँडेज बांधावयाचे आणि त्यात एक रिव्हॉल्व्हर लपवावयाचे, हँडग्रेनेडस् पिशवीत तळाशी ठेवून त्यावर मोसंबी आणि औषधाच्या बाटल्या (लोकांना दिसतील अशा) ठेवावयाच्या. कौसडीकरांनी एक रिव्हॉल्व्हर कमरेला बांधावयाचे—बस्स! ठरले. त्याप्रमाणे सर्व तयारी करून हे दोघे मनमाड स्थानकावर गाडीत चढले. त्यांचा संशय कोणालाही आला नाही. रोटेगाव संकटातून ते सहीसलामत वाचले. करोडगिरी नाक्यावर सहजासहजी सुटका झाली. आणि ते इच्छित स्थळी, सेलूला देवधरांकडे पोहोचले. ◻

कोंबडा आरवला. नुकतेच झुंजूमुंजू होत होत होते. सहस्ररश्मी आपले सुवर्णकिरण पृथ्वीवर हळुहळू वर्षवीत होता. मुलं कधीचीच उठली होती. प्रातर्विधी आटोपून, दूध पिऊन, ही मुले कौसडीकडे जाण्यासाठी बाहेर पडली. १४ मैलांचे अंतर पायी चालावयाचे होते. रस्त्यात अत्याचारी रझाकारांची भेट होण्याची शक्यता होती. पण मुले निश्चयी होती. ठरलेल्या मार्गाने ते निघाले. वाटेत कोणीही भेटले नाही. २ मैलांनंतर टाकळी-निपाणी हे गाव लागले. मुले थकल्यासारखी वाटत होती. चेहरा ओढल्यासारखा वाटत होता. परंतु दुर्दम्य इच्छाशक्ती आणि प्रखर ध्येयनिष्ठा यामुळे ही मुले उत्साही होती. टाकळी येथे पोचताच त्यांनी वासुदेवराव टाकळीकर यांचे घर गाठले. हातपाय, तोंड धुतले. थंड पाण्याच्या शिडकाव्याने तरतरी आली. मुलांसाठी ताबडतोब पाटपाणी घेण्यात आले. विश्रांती घेण्यास वेळ नव्हता. जेवण करून पुढचा पल्ला गाठावयाचा होता. मुले पानावर बसली. पानात वाढलेले शांतपणे खावयास सुरुवात केली. जेवण अर्धवट झाले तोच गावात दोन पोलीस आल्याची वार्ता एकाने सांगितली. दोन्ही मुलांनी एकमेकाकडे पाहिले. त्यांनी जेवण अर्धवट सोडले. हात धुऊन, लगबगीने ते कौसडीच्या मार्गाला लागले. ◻

कौसडीला आनंदचे घरच. अचानक आलेल्या आनंदाला पाहून त्याच्या घरच्या लोकांना फार आश्चर्य वाटले. चौकस आजोबांनी विचारणा केली तेव्हा 'लोणी जत्रेला या मेढेकराला घेऊन जातो आहे,' आनंदने थाप दिली. थोडा वेळ घरच्या लोकांशी गप्पा मारून, सर्वांची मूर्ती डोळ्यात साठवून, आनंद आपल्या मित्रासह घराबाहेर पडला. पुन्हा हे घर, ही प्रेमळ माणसे आपणास पाहावयास मिळतील का? या लोकांचा आणि आपला ऋणानुबंध इथेच संपणार का? आपली योजना असफल झाली तर? आनंदाने आपले खिसे चाचपले. खिशात विषाच्या गोळ्यांची पुडी आहे याची खात्री करून घेतली. घराबाहेर पडल्यानंतर डोळे भरून घरही पाहून घेतले. क्षणभर त्याचे मन घर, आपली माणसे यासाठी रेंगाळले—पण क्षणभरच. पाणावलेले डोळे पुसून निश्चयाने आनंद मेढेकरासह आनंदाने मार्गस्थ झाला.

चांदज गाव दिसावयास लागले. मुलांची झपझप पडणारी पावले अजून वेगात पडू लागली. गावात ही मुले आली ती सरळ शंकरराव चांदजकरांकडे गेली. आता अंधारून आले होते. सूर्यनारायण आपले प्रकाशकिरण आवरून विश्रांतीसाठी डोंगराआड गेला होता. शंकरराव चांदजकर या मुलांची वाटच पहात होते. श्री. चांदजकर हे म्हातारे, परंतु अत्यंत स्वाभिमानी. त्यांनी बोरी येथे भर बाजारात एका पठाणाला नुकताच बेदम ठोक दिला होता. त्या दिवसात पठाणाला ठोकणे हे काम वाटते तितके सोपे नव्हते. श्री. चांदजकर याच मुलांची वाट पहात होते. त्यांना सर्व 'सामानासह' ही मुले आली याचा आनंद वाटला. ठरल्याप्रमाणे यांच्या तिसऱ्या साथीदाराला–मधुकर औढेकराला घेऊन श्री. शाळीग्रामपंत जोशीही आले होते. एकूण सर्वजण नियोजित कार्यक्रमाप्रमाणे एकत्र आले.

रात्री जेवणानंतर सर्व योजना नीट आखली गेली. मुलांनी बद्रोद्दीनवर केव्हा हल्ला करावयाचा आणि कोणत्या दिशेने निसटावयाचे इत्यादी सर्व ठरले. या मुलांच्या वयाच्या मानाने टाकण्यात आलेली जबाबदारी अवघड होती. मुलांच्या सोबत जावे असे त्या प्रौढांना वाटत होते. परंतु जबाबदारी फक्त मुलांचीच होती. पाय बोलावयास लागले, डोळे मिटावयास लागले, तेव्हा मुले अंथरुणाकडे वळली.

¤

दुसऱ्या दिवशी मुले आपल्या कार्यासाठी तयार झाली. तिघांनीही वेषांतर केले. वेषांतर योजनापूर्वक केलेले होते. बद्रोद्दीन घरी किंवा ठाण्यात न सापडल्यास मधुकरने जाऊन 'पाटील आले आहेत' असा त्याला निरोप द्यावयाचा. तो जवळ येताच पाटलाने (आनंद) हल्ला करावयाचा. आरडाओरड आणि पळापळ सुरू झाली की खाकी पोषाखातील पोलिसाने (मेढेकर) त्यांचा जोशात (!) आणि जोरात पाठलाग करावयाचा आणि अन्य पोलिसांची दिशाभूल करून साथीदारांना सुरक्षित स्थळी पोचवायचे, अशी दुहेरी योजना होती. सांकेतिक नावांचीही जुळणी केली गेली होती. कोणत्याही परिस्थितीत घरी, दारी किंवा भेटेल तिथे बद्रोद्दीनचा निकाल लावावयाचाच या जिद्दीने मुले वेषांतर करून तयार झाली. आनंद कौसडीकरांनी धोतर नेसून पटका बांधला. मेढेकरांनी खाकी पोषाख घातला आणि मधुकर आखूड धोतर, खांद्यावर घोंगडी आणि हातात घुंगुराची काठी अशा अवतारात तयार झाला. आनंदजवळ एक रिव्हॉल्व्हर, मेढेकरजवळ एक रिव्हॉल्व्हर आणि तीन हँडग्रेनेडस् तर मधुकरजवळ चार हँडग्रेनेडस् अशी शस्त्रांची वाटणी झाली. त्यांनी एकदा 'सब कुछ ठीक' आहे हे पाहिले आणि ते बोरीच्या दिशेने उत्साहाने निघाले. छाती धडधडत होती. आपल्या कार्यात यश यावे म्हणून ते देवाला प्रार्थित होते. पुढचे पाऊल पुढेच पडत होते.

¤

उन्हं चांगलीच कलली होती. झाडांच्या सावल्या लांब लांब पसरल्या होत्या. आकाशाच्या कागदावर लालपिवळ्या रंगांनी चितारलेल्या छटा नापसंत पडून की काय निसर्ग चित्रकाराने हळूवार हाताने काळ्या रंगाच्या फराट्या त्या रंगावर मारावयास प्रारंभ केला होता. गावाच्या बाहेरून गोधन नुकतेच परतले होते. पक्षीगण घरट्याकडे परतत होते. रस्त्यावरून उडालेला धुरळा अजून जागी विसावला नव्हता. अंधारत आलेल्या गावात धुरळ्यामुळे जास्त अंधारून आल्यासारखे वाटत होते. घराझोपड्यांतून चुली पेटल्या होत्या. पेटल्या लाकडाचा धूर गावात सर्वत्र भरून राहिला होता. अंधार, धुरळा आणि धूर यांचा अजब मिलाफ अंधुक प्रकाशात दाटला होता. मुले–माणसे चुलीभोवती एकत्र झाली होती. त्या दिवशी १४ डिसेंबर १९४७ ची अमावास्या होती. हवेत चांगलाच गारवा जाणवत होता. ही मुले 'बोरी'जवळ आली तेव्हा संध्याकाळचे सहा–साडेसहा झाले होते. हिवाळ्यामुळे दिवस लवकर मालवला होता. गाव चांगलेच अंधारात असल्यासारखे दिसत होते. मुले



मेढेकरांनी दोन हँडग्रेनेडस् बद्रुद्दीनच्या दिशेने फेकले

आपले साहित्य नीट सांभाळीत इच्छित स्थळाकडे निघालो.

परभणी–जितूर शेवटची बस बोरीला साधारणत: आठ वाजता येत असे. त्या गाडीने टपाल व वर्तमानपत्रे येत. या मोटारीची वाट पहात बद्रोद्दीन आपल्या घराच्या व्हरांड्यात बसून राही. नित्याप्रमाणे तो आजही व्हरांड्यात आला. मुले त्याच्या घराजवळ येत होती. तोच एक मोटार अचानक आली. मोटारीतून 'फौजी' लोक खाली उतरले. मुलांच्या मनात चर्र झाले. योजना बारगळणार? अयशस्वी परत जावे लागणार? प्रतिज्ञा वाया जाणार? इतके श्रम फुकट जाणार?– बिचारी मुले–अस्वस्थ होऊन त्या फौजींकडे पहात बसली. फौजी उतरले ते सरळ जवळच्या 'हॉटलात' गेले. चहापाणी करून हसत खिदळत परतले. आणि धुरळा उडवीत त्यांची गाडी परभणीकडे गेली. मुलांना हायसे वाटले. त्यांनी घड्याळांत पाहिले. आठ वाजत होते. बस येण्याची वेळ झाली होती. दुरून बसचे दिवे जवळ येत होते. ठीक ८–१५ ला आलेली गाडी ८–२० ला सुटली. बसमधून उतरलेले प्रवासी घराकडे वळले. सर्वत्र शांतता होती. मुले समोर झाली.

बद्रोद्दीन बाहेर ओट्यावर खुर्ची टाकून बसला होता. बाजूला नम्रपणे मोहरीर उभा होता. व दारात एक साधा पोलीस उभा होता. बद्रोद्दीनच्या घरापासून ९०–१०० फुटावर पोलीस ठाणा. पोलीस ठाण्यात एक हत्यारी पोलीस पहाऱ्यावर होता. अन्य ४-५ पोलीस नुसतेच बसले होते.

बद्रोद्दीनच्या घराजवळ येताच मुले पांगली. मधुकर पोलीस ठाण्याकडे वळला. आणि अंधाराचा फायदा घेत आनंद व मेढेकर बद्रोद्दीन बसलेल्या ओट्याकडे सरकले. त्यांना आता बद्रोद्दीन व्यवस्थित दिसत होता. बद्रोद्दीन चांगला उंच, धिप्पाड, गोरापान होता. बद्रोद्दीनला पाहाताच मुलांच्या मनासमोर गोविंदराव पानसऱ्यांची मूर्ती क्षणभर आली. त्यांची झालेली क्रूर हत्या!–आणि हा मस्तवाल प्राणी इथे मजेत आहे. मुलांचा राग अनावर झाला. त्यांनी शस्त्राला हात घातला. हात थरथरले. क्षणभर भीतीही वाटली. दोघांनी एकमेकांकडे पाहिले. डोळ्यांनी एकमेकांना धीर दिला. कार्य अयशस्वी झाले तर! छे:! साडे आठ झाले होते. दोघांनी उभे राहून 'पानसरे के खून का बदला ले रहे हैं' असे म्हणून गोळ्या झाडल्या. बद्रोद्दीन उभा राहिला. त्याने एकबारी पिस्तुल झाडले. आणि तो टेबलाआड गेला. मुलांनी पुन्हा गोळ्या झाडल्या. मेढेकरांनी दोन हँडग्रेनेडस् बद्रुद्दीनच्या दिशेने फेकले. प्रचंड आवाज झाला. पाठोपाठ अजून एक प्रचंड आवाज झाला. कानठळ्या बसल्या. मधुकरने ठाण्यावर हँडग्रेननेडस् फेकले होते. आता आरडाओरड सुरू झाली. पकडो, मारो, काटोचे आवाज कानावर पडले. मुले ठरल्या दिशेला पळाली. परंतु समोरून कांही लोक दिसताच त्यांनी दिशा बदलली. मेढेकर आणि मधुकरने पळता पळता मागे पाहिले. कांही पोलीस आणि मुसलमान जवळ जवळ येत होते. त्यांनी त्या लोकावर हँडग्रेनेडस् फेकले. प्रचंड आवाज झाला. रस्त्यावरचा धुरळा भिंतीसारखा उभा राहिला. कांहीच दिसेना. मुले पळत होती. वाट दिसेल तिकडे पळत होती. बरेच पुढे गेल्यानंतर आनंदने पाहिले तर मेढेकर व औंढेकर मागे नाहीत. त्याचे मन कचरले. पकडले गेले की काय! मनात नाना विचार येऊ लागले. काळजीने मन काळवंडले. तो पुढे पुढे जात होता. करपरेचे पात्र लागले. पाणी थोडेच होते. आपल्याला तहान लागली आहे याची त्याला जाणीव झाली पाणी पाहिल्यानंतर. तो प्रथम थंडगार पाणी प्याला. मागे वळून पाहू लागला. कोणाचीही हालचाल नाही. काय करावे? वाट पहावी का पुढे जावे? कांही समजेचना शेवटी वाट पहावयाची असे ठरवून तो जवळच्या शेतातील बाभळीच्या झाडाखाली लपून बसला. बराच वेळ गेला. हवेत भलताच गारठा होता. हात आखडून गेले होते. मोकळ्या रानातील चावऱ्या वाऱ्याने आनंदला बेजार केले होते. काळजीने एकेक क्षण एकेक युगाप्रमाणे भासत होता. दुरून दोन व्यक्तिची हालचाल दिसली. आनंदाने डोळे ताणून पाहिले. अंधारामुळे व्यक्ति कोण हे ओळखू येत नव्हते. खास पोलीसच असावेत. शोध चालू असेल. येणाऱ्या व्यक्ति दबकत दबकत इकडे तिकडे पहात, कानोसा घेत येत होत्या. आनंदाने रिव्हॉल्व्हर सज्ज ठेवले. टप्प्यात येताच गोळीबार करावयाचा हे त्याने निश्चित केले. बाभळीजवळ पोलीस आले. 'टाक बॉम्ब' असा ओळखीचा स्वर कानावर पडला. तेव्हा वेळ न गमवता 'मी तात्या आहे नाना' असे त्याने ओरडून सांगितले. मेढेकर आणि औंढेकर समोर आले. तिघाचाही आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. म्हणजे सर्वजण सुरक्षित होते तर. तिघेहीजण थोडा वेळ शांत बसले. आजूबाजूचा अंदाज घेऊ लागले. कोणी आवाज तर ऐकला नसेल ना? परंतु कांहीच हालचाल दिसली नाही. मग घटनेसबंधी बोलणे निघाले. बद्रोद्दीनचे काय झाले असेल? तो मेला नसला तर? मनाला उगाचच रुखरुख लागली.

शेवटी तिघेजण उठले. अंदाजाने पुढे निघाले थोडे अंतर गेल्यानंतर जितूर रस्ता दिसला. ते रस्त्याला लागणार तोच मोटारीचा आवाज ऐकू आला. मुले दबा धरून बसली. भरवेगात मोटार समोरून गेली. मोटार कोणाची होती? बहुधा पोलिसांची.



का रझाकारांची ? मोठ्या रस्त्यावरून जाण्यास मन तयार होईना. पायवाटेने जावयाचे नक्की करून मुले मुख्य रस्ता सोडून पायवाटेला लागली. आता थकवा चांगलाच जाणवत होता. त्यात बद्रोद्दीनचे नेमके काय झाले हे न कळल्यामुळे मन उदास झाले होते. पाय वेगात उचलले जात नव्हते. बद्रोद्दीनसंबंधी कांहीतरी कळावे असे पुनः पुन्हा वाटत होते. परतून जाऊन पहावे काय ? छे ! वेडेपणा ठरेल. मुले पुढे निघाली. बरेच चालल्यानंतर त्यांना एक गाव दिसले. त्यांनी विश्रांती घ्यावयाची असे ठरविले. पायातले काटे बोलत होते, जाणीव देत होते. गावाबाहेरच्या मारुतीच्या देवळात ते विसावले. हातपाय लांब करून थोडा वेळ ते पसरले. परंतु वेळ घालविणे धोक्याचे ठरेल याची त्यांना जाणीव होती. त्यांनी 'चांदज'संबंधी चौकशी केली तेव्हा त्यांना 'चांदज' केवळ दोन फर्लांगावरच आहे असे कळले. त्यांनी आळस झटकला. मनावरचे ओझे उतरविले आणि ते 'चांदज' मार्गाला लागले.

'चांदज'ला मुले पोंचली तेव्हा सकाळ होत आली होती. घरा-घरातून दळण्याचा आवाज ऐकू येत होता. कांही घरातून गायिलेल्या ओव्याही कानावर पडत होत्या. मुले आली ती सरळ शंकररावांच्या घरासमोर उभी राहिली. बाहेरचे दार बंद होतें. त्यांनी दरवाजा ठोठावला. घर जागंच होतं. शंकररावांना हाक दिली. ताबडतोब म्हातरा बाहेर आला. त्याने दार उघडून मुलांना आत घेतले. दार ओढून घेतले. सर्व मुलांवरून एकदा नजर फिरवली. म्हातारा जणू त्यांची दृष्ट काढीत होता. त्यांच्या पाठीवरून म्हाताऱ्याने हात फिरवला—मायेचा हात. मुलांना कृतकृत्य वाटले. शंकरराव रात्रभर या मुलांच्या येण्याकडे डोळे लावून बसले होते. मुलांना सुखरूप आलेले पाहून म्हाताऱ्याला खूप आनंद झाला. त्याने मुलांना माडीवर नेले. तेथे शाळीग्रामपंत जोशी मुलांची वाटच बघत होते. त्यांच्याही डोळ्याला डोळा लागला नव्हता. त्यांनी मुलांचे सानंद स्वागत केले. त्यांना गरम गरम चहा दिला. गरम चहा घशाखाली उतरला तशी मुलांना तरतरी आली. त्यांनी सर्व वृत्तांत कथन केला. म्हातारा तल्लीनतेने मुलांची कथा—पराक्रम आणि साहस कथा—ऐकत होता. खरे म्हणजे म्हाताऱ्यालाच मोहिमेत भाग घ्यावयाचा होता. त्याने मुलांना एकीकडे नेऊन 'तुम्ही इथेच थांबा, शस्त्रे माझ्याजवळ द्या. तुम्हाला शस्त्र चालविण्याचा नीट सरावही नाही. बद्रोद्दीन भयंकर आहे. थोडीही चूक झाल्यास गहजब होईल. तेव्हा—मीच जाऊन बद्रोद्दीनचा निकाल लावतो आणि पोलीस ठाणेही उडवितो. सर्वांना तुम्हीच हल्ला केला असे सांगू. तुम्ही तरुण आहा. मी पिकले पान. तेव्हा मीच ही जोखीम पत्करणे योग्य राहील.' असे सांगितले. परोपरीने समजाविले. परंतु मुलांनी नम्रपणे नकार दिला. प्रतिज्ञेप्रमाणे आणि योजनेप्रमाणे तेच हल्ला करू इच्छित होते. शंकरराव दूरवर त्यांना सोडावयास गेले होते—मुलांचा पराक्रम ऐकून त्यांना धन्यता वाटली. त्यांनी मुलांना मनःपूर्वक शाबासकी दिली. मुलांचे काम झाले होते. यश मिळाले किंवा काय हे अज्ञात होते. पूर्वी ठरल्याप्रमाणे त्यांना मनमाडमार्गे मुंबईला परतणे अत्यावश्यक होते.

परतीचा प्रवास सुरू झाला. आनंद, मधुकर आणि मेढेकर मनमाडला जाण्यासाठी निघाले. त्यांना रस्त्यात अटकाव झाला नाही. मुले निष्पाप, निरुपद्रवी दिसत होती. चेहरा शांत दिसत होता. परतु अंतःकरणात केवढी खळबळ माजली होती. मुले मनमाडला पोचली. मनमाडला येताच मुलांनी सर्व हकीकत नेत्यांना—प्रमुखांना—सांगितली. तेथून मुलांना मुंबईला पाठविण्यात आले. तिथेही अत्यंत अस्वस्थ होते. बद्रोद्दीनचे काय झाले असावे ? मेला ? जखमी झाला ? वाचला ? नेमके काय झाले ? इकडील वर्तमान त्यांना कळत नसल्यामुळे बिचारे फारच नाराज झाले होते. काही दिवसानतर त्यांना कळले ते निराशाजनक खासच नव्हते. बद्रोद्दीन भयंकर जखमी झाला होता. त्याचा उजवा पाय आणि हात हँडग्रेनेडस्मुळे कामातून गेला होता. बद्रोद्दीनच्या शेजारी उभा होता तो मोहरीर मात्र जागच्या जागी ठार झाला होता. दारात उभा होता तो पोलीसही जखमी झाला होता. मुलांना हळहळ वाटली. बद्रोद्दीन वाचणार की काय ? ज्यासाठी जिवाचा इतका आटापिटा केला, इतका प्रयत्न केला तो वाया जाणार की काय ? बद्रोद्दीनसह सर्व जखमींना (ठाण्यातीलही) परभणी येथील इस्पितळात आणलेले होते. मुले मुंबईहून मनमाडला परतली. त्यांना बद्रोद्दीन वाचल्यामुळे अपराध्यासारखे वाटत होते. परंतु वडीलधाऱ्यांनी मुलांची समजूत घातली. त्यांचे सांत्वन केले. परंतु पदरी अपयश आले म्हणून मुले निराश झाली होती. बद्रोद्दीन वाचला परंतु मरणाच्या पंथाला आहे असे सांगून नेत्यांनी त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. पण मुले स्वतःवर रागावलेलीच होती. त्यांचा चेहरा उतरलेला, पडलेलाच होता.

—शेवटी सुमारे एक-दीड महिन्यानंतर 'झालेल्या जखमांनी बद्रोद्दीन दवाखान्यात मेला' असे वर्तमान त्यांना कळले. त्यांचे मन तेव्हा उजळले. नैराश्याची काजळी पुसली गेली. चेहरा उजळला. गोविंदराव पानसऱ्यांच्या खुन्याला आपण शासन केले याचे अतीव समाधान दोन्ही मुलांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या या धाडसी मुलांनी बद्रोद्दीनसारख्या महाकाय राक्षसाचा निकाल लावून, हैदराबाद मुक्तिलढ्यात, मुलेही आपला वाटा कसा उचलू शकतात हेच दाखविले.

पराक्रमाची बाळे आम्ही
पराक्रमाला आम्ही घडवू
पराक्रमाच्या तेजे आम्ही
क्रूर शत्रुला धडा शिकवू

□

# पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

‘ब्यूलियू’ मधील सीन नावाच्या तुरुंगात पॅपिलॉन दाखल झाला. बंडखोरीबद्दल त्याला अंधार कोठडीत टाकण्यात आलं. मुख्य वॉर्डरच्या चांगुलपणामुळेच केवळ तो जिवंत राहू शकला. त्यानंतर, थोड्या दिवसातच सर्व गुन्हेगारांना ‘मार्टिनियर’ जहाजावरून फ्रेंच गियानाकडे पाठवण्याचा दिवस उगवला.



# प्रकरण तीन : पहिले यशस्वी पलायन

सुहा वाजले आणि सर्व गोष्टींना गतो येऊ लागली. कैद्यांना कॉफी देण्यात आली. तेवढयात चार वॉर्डर्स तिथे दाखल झाले. आज ते पांढऱ्या पोशाखात होते; आणि अद्याप त्यांच्या कमरेला पिस्तुलं लटकलेली होती. शुभ्र गणवेश आणि त्यावर सोन्यासारखी दिसणारी बटनं. एकाच्या डाव्या बाहीवर तीन सोन्याची पदकं होती; पण खांद्यावर काहीच नव्हतं.

'सर्व कैदी लोकांनो, या व्हरांडयात दोघं दोघं जण बाहेर पडा. प्रत्येकाला आपापलं नाव असलेली पिशवी येथे दिसेल. त्या पिशव्या उचला आणि भिंतीकडे मागे फिरा.'

या कार्यक्रमाला वीस मिनिटे तरी लागली. पुढच्या आज्ञा भराभर सुटत गेल्या–'सर्व कपडे काढा, छोटया वस्तू जाकिटात घाला, सर्वांच्या जुन्या कपडयाचा ढीग एकत्र करा, तो कोठडीत फेका' वगैरे वगैरे. नंतर आम्ही नवे कपडे अंगावर चढवले.

'सर्वांचं सगळं आटोपलं ?'

'होय महाराज.' सामुदायिक उत्तर.

'ठीक, पिशवीतला लोकरीचा कपडा बाहेर काढून ठेवा. पाऊस सुरू झाला किंवा अचानक खूप थंडी पडली तर तो उपयोगी पडेल. दोन दोन जणांनी माझ्या मागोमाग या.'

तो सार्जंट पुढे, दोन वॉर्डर्स बाजूला आणि उरलेला मागे अशा थाटात आमची छोटी तुकडी बाहेर पटांगणात आली. दोन तासांच्या आत आठशे दहा कैदी तिथे गोळा झाले आणि ओळीत उभे राहिले. त्यातील चाळीसजणांना वेगळं काढण्यात आलं. त्यात मी आणि देगा होतो, शिवाय पूर्वी सुटकेचा प्रयत्न केलेले तिघेजण–ज्यूलट, गाल्गानी व सँटिनी. दहा दहाच्या ओळीत आम्ही चाळीसजण उभे होतो. हातकडया नाहीत की साखळया नाहीत. आमच्यापासून दहा फुटांवर दहाच पहारेकरी होते, बंदुका हातात धरून ते आमच्याकडे तोंड करून उभे होते.

त्या किल्ल्याच्या बाहेर जाण्याचा मोठा दरवाजा उघडला आणि हळूहळू आमचा जथा बाहेर पडण्यास सुरुवात झाली. सैनिक पहारा अत्यंत कडक होता. बंदुका किंवा मशिनगन हातात धरून ते आमच्या बाजूने पुढे सरकत होते. आम्हाला बघण्यासाठी बाहेर जमा झालेल्या प्रचंड जमावाला रोखण्यात काही पहारेकरी गुंतले होते. अर्धाअधिक रस्ता संपल्यावर एका घराच्या खिडकीमधून एक परिचयाची शीळ ऐकू आली. मी चमकून वर पाहिलं आणि निनेट–माझी बायको दृष्टीस पडली. बाजूला माझा प्रिय मित्र अँन्टोनी उभा होता. बाजूच्या खिडकीत पॉला–देगाची बायको आणि त्याचाही एक मित्र उभा होता. देगानं त्यांनाही पाहिलं. त्या खिडक्यांकडे दृष्टी स्थिर ठेवून आम्ही पुढे पुढे चालत होतो; जोपर्यंत शक्य होतं तोपर्यंत. माझ्या पत्नीला त्यावेळी मी जे पाहिले ते अखेरचं; माझ्या मित्राचंही तसंच अखेरचं दर्शन. तो बिचारा दोन वर्षांनंतर मार्सेलिसवरील हवाई हल्ल्यात ठार झाला.

कोणीच बोलत नव्हतं. संपूर्ण स्तब्धता. तो हृदय हेलावून सोडणारा प्रसंग अवर्णनीय होता. कैदी, वॉर्डर, पहारेकरी किंवा गर्दीतील कोणतीही व्यक्ती आम्हाला दिसत नव्हती–जाणवत नव्हती. प्रत्येकाला हे माहीत होतं की हे अठराशे लोक सामान्य जीवनातून कायमचे दूर होणार होते.

आमचा जहाजावरून प्रवास सुरू झाला. खास निवडून काढलेल्या आम्हा चाळीसजणांना तळाशी असलेल्या एका मोठया खोलीत नेण्यात आलं. जाड गज असलेली ती खोली प्रशस्त होती. त्यावर एक चिठ्ठी अडकवण्यात आली होती, 'खोली क्र. १, चार्लस कैदी, वेगळी व्यवस्था, सतत काळजीपूर्वक देखरेख.' प्रत्येकाला एक एक बिछाना देण्यात आला. तो भिंतीवर अडकवून ठेवण्याची सोय होता. त्यासाठी भिंतीत पुरेशा कडया ठोकण्यात आलेल्या होत्या.

एकानं माझा दंड पकडला. तो ज्यूलट होता. हा प्रवास त्याला नवीन नव्हता. दहा वर्षांपूर्वी अशीच सफर त्यानं केलेली होती. परिस्थितीला कसं तोंड द्यायचं याबाबतीत तो माहीतगार होता. एका जागेकडे निर्देश करून तो म्हणाला, 'तिथे तुझी बॅग अडकवून ठेव. त्याच्याजवळच तोफेसाठी उपयुक्त अशी दोन भोकं आहेत. तूर्त ती बंद असली तरी जहाज समुद्राच्या बरंच आत गेल्यावर ती उघडण्यात येतील. त्यामुळे या खोलीतील इतर भागापेक्षा आपल्याला त्यातल्या त्यात शुद्ध हवा मिळेल.'

मी त्याची देगाशी ओळख करून दिली. आम्ही बोलत असताना एकजण आमच्या वाटेत आला. ज्यूलटने एक हात आडवा करून त्याचा मार्ग रोखला. तो त्याला म्हणाला, 'मुक्कामाला जिवंत पोचायचं असेल तर या बाजूला येण्याचा कधीही प्रयत्न करू नकोस, समजलं ?' 'हो.' तो दुसरा इसम म्हणाला. 'का ते तुला कळलंच असेल.' 'हो.' पुन्हा दुसरा इसम उद्गारला. 'मग इथून चालता हो.' ज्यूलट. तो माणूस निमूटपणे गेला. ज्यूलटच्या या सामर्थ्यामुळे देगाला हर्षवायू झाला आणि तो त्याला मुळीच लपवता आला नाही. 'तुम्ही दोघं जर बरोबर असाल तर मला खात्रीनं सुखाची झोप मिळेल.' त्यावर ज्यूलट म्हणाला, 'या इथे किनाऱ्यावरच्या एखाद्या बंगल्यापेक्षाही तू अधिक सुरक्षित आहेस, ज्या बंगल्याची फक्त एकच खिडकी उघडी आहे.

ती सफर अठरा दिवस चालू होती. त्यात सांगण्याजोगा प्रसंग फक्त एकच घडला. एका रात्रीत जहाजावरचे सर्वजण मोठया किंचाळीमुळे झोपेतून खडबडून उठले. एक व्यक्ती आपल्या बिछान्यात ठार झालेली आढळली. गळयापाशी चाकूच्या खोलवर जखमेची निशाणी दिसत होती. चांगला आठ इंच पातं असलेला चाकू बिछान्यातून वर खुपसण्यात आला होता. ताबडतोब पंचवीस-तीस वॉर्डर्स धावून आले. हातात पिस्तुल किंवा बंदुका.

'सर्वजण कपडे काढा, अगदी क्षणाचाही विलंब न लावता !'

पुढचं नाटक नेहमीप्रमाणेच पार पडलं. प्रत्येकाच्या बुटात आणि



रोमियोच्या पाठीवर चाबूक ओढण्यास सुरवात

कपड्यात शस्त्रांचा शोध सुरू झाला. मी माझ्या डाव्या पावला-खाली माझा चाकू लपवला आणि उजव्या पायावर भार देऊन उभा राहिलो; त्याचं पातं माझ्या पायात घुसत होत. संपूर्ण तपासणीत, तीन चाकू, दोन घरं शाकारताना वापरतात तसे चांगले टोकदार खिळे, एक लांब स्क्रू आणि आणि एक सोन्याचा चार्जर अशा वस्तू सापडल्या. आमच्यातील सहाजणांना त्याबद्दल बाहेर डेकवर नेण्यात आलं. मेजर बॅरट, दोन कर्नल, एक डॉक्टर आणि जहाजाचा कॅप्टन तिथे हजर झाले. आमच्या खोलीतून पहारेकरी बाहेर पडताच आम्ही सर्वांनी कोणाच्याही परवानगीची वाट न पाहता आपले कपडे चढवले. माझा चाकू मी उचलून घेतला.

एक सोडून सर्व जणांनी शस्त्रे बाळगल्याची कबुली दिली. त्यांना शिक्षा म्हणून इंजिनच्या वर असलेल्या खोलीत नेण्यात आलं. तसंच नग्न. तिथे बॉयलरमुळे हवा अत्यंत गरम असायची.

आता जमिनीवर फक्त एक चाकू आणि सोन्याची चार्जर राहिली. दोन्हीचा मालक एकच होता–म्हणजे वॉर्डरच्या मताप्रमाणे. तो सुमारे पंचवीस वर्षांचा, पाच फूट आठ इंच, निळ्या डोळ्यांचा असा बळकट खेळाडू दिसत होता.

'ही तुझीच आहे ना?' चार्जर हातात घेऊन पहारेकरी उद्गारला.

'होय, महाराज. ती माझीच आहे.'

'त्यात काय आहे?' ती आपल्या हातात घेत मेजर बॅरटनं विचारलं.

'तीनशे पौंड आणि दोनशे डॉलर्सच्या नोटा. शिवाय पाच कॅरटचे दोन हिरे.'

बॅरटनं चार्जर उघडली त्याबरोबर इतर लोक त्याच्याभोवती गोळा झाले. शेवटी तो म्हणाला, 'राहू देत, तुझं नाव काय?'

'सॅल्व्हिदिया रोमियो.'

'तू इटालियन आहेस?'

'होय, सर.'

'तुला चार्जरबद्दल शिक्षा होणार नाही, पण चाकूबद्दल मात्र होईल.'

'माफ करा, पण तो चाकू माझा नाही.'

'खोटं बोलू नकोस,' एक पहारेकरी म्हणाला, 'मला तो तुझ्याच बूटात सापडला.'

'मी पुन्हा सांगतो, तो चाकू माझा नाही.'

'म्हणजे मी खोटं बोलतोय असंच ना?'

'नाही. तुमचा फक्त गैरसमज झाला आहे.'

'मग तो कोणाचा आहे?' मेजरनं विचारलं, 'तो तुझा नसेल तर दुसऱ्या कोणाचा तरी असलाच पाहिजे.'

'तो माझा नाही इतकंच मला माहीत आहे.'

'तुझी शिक्षेतून सुटका व्हावी असं वाटत असेल–आणि तिथे बॉयलरमुळे तू भाजून निघशील–तर फक्त मला सांग की चाकू कुणाचा आहे?'

'मला माहीत नाही.'

'याला बेड्या ठोका. बेशिस्त वर्तनाबद्दल तुला शिक्षा घडायलाच हवी, मित्रा.'

दोन अधिकाऱ्यांनी कानगोष्ट केली. कॅप्टननं आज्ञा दिली आणि एकजण डेकवर गेला. काही क्षणानंतर ब्रेटन नावाचा खलाशी खाली आला. अवाढव्य शरीर. एका हातात समुद्राच्या खाऱ्या पाण्यानं भरलेली लाकडी बादली. दुसऱ्या हातात मनगटाच्या जाडीएवढं दोरखंड. डेकवर चढण्यासाठी एक शिडी होती. तिच्या सर्वांत खालच्या पायरीशी गुन्हेगाराला जखडण्यात आलं. त्या खलाशानं दोर बादलीच्या पाण्यात ओला करून आणि जाणूनबुजून आपल्या सर्व शक्तीनिशी गरीब बिचाऱ्या रोमियोच्या पाठीवर व ढुंगणावर तो चाबकासारखा ओढण्यास सुरुवात केली. गुन्हेगारानं हूं की चूं केलं नाही. त्याच्या ढुंगणातून आणि बाजूनं रक्त ओघळू लागलं होतं. आमच्या खोलीतील एकाच्या आरोळीनं त्यावेळच्या स्मशान-शांततेचा भंग केला. 'हलकट, बदमाश.'

दंगा उसळण्यासाठी तेवढ्याच गोष्टीची आवश्यकता होती. 'खुनी! डुक्कर! पाजी! रानटी!' इत्यादी शेलक्या शिव्यांची लाखोली सुरू झाली. ते गोळीबार करण्याची धमकी देऊ लागले आणि आमचा आवाज जास्तच वाढला. तेव्हा कॅप्टन एकदम ओरडला, 'वाफ इकडे सोडा.'

खलाशांनी वेगवेगळी चाकं फिरवली आणि आमच्या अंगावर नळ्यांनी वाफेचे फवारे सोडण्यास सुरुवात केली. उकळत्या पाण्या-पेक्षाही वाफेचा चटका जास्त बसतो. त्याचा जोर इतका होता की क्षणार्धात सर्वजण पोटावर आडवे पडले. आमच्या छातीपर्यंत फवारे उडत होते. सर्वांची पार दाणादाण उडाली. ज्यांच्या अंगाची कातडी सोलून निघाली होती त्यांना धड ओरडताही येईना. ही सर्व घटना फार तर एक मिनिटभर चालली असेल पण त्यामुळे प्रत्येकाची भयानं बोबडी वळली.

'मला वाटतं, माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हा हट्टी जनावरांच्या एव्हाना लक्षात आला असेल. तुम्ही थोडीही गडबड कराल तर मी वाफेच्या नळ्या पुन्हा इकडे वळवीन, समजलं? आता उभे राहा.' सर्वजण आज्ञाधारकपणे उभे राहिले. सुदैवानं फक्त तीनच जणांना गंभीर जखमा झाल्या होत्या. त्यांना दवाखान्यात हलविण्यात आलं. ज्याला नुकतेच फटके मारण्यात आले होते त्याला पुन्हा आमच्यातच

ठेवण्यात आलं. सहा वर्षांनंतर माझ्याबरोबर सुटकेच्या प्रयत्नात तो मरण पावला.

पुढचा प्रवास अर्थातच शांतपणे पार पडला.

त्या अठरा दिवसांत जन्मठेपेविषयी जास्तीत जास्त माहिती गोळा करण्यास किंवा पुढच्या अपेक्षित गोष्टींवर विचार करण्यास भरपूर अवधी होता. परंतु आम्ही जेव्हा प्रत्यक्ष तिथे गेलो तेव्हा त्या अपेक्षेप्रमाणे फारच थोड्या गोष्टी घडल्या. तरीही अनुभवी ज्यूलटनं आम्हाला जास्तीत जास्त माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला.

आम्हाला समजलं की सेंट-लॉरेंट-ड्यू-मारोनी हे समुद्रापासून पंचाहत्तर मैलावर असलेलं मारोनी नदीच्या काठावरचं एक खेडं आहे. ज्यूलटनं ते आम्हाला सांगितलं. 'बेटाचे मध्यभागी असलेल्या त्या खेड्यात तुरुंग आहे. तिथे तुमची 'लायकी'नुसार विभागणी करण्यात येते. केवळ दक्षता म्हणून पकडलेल्या लोकांना सेंट-जीन नावाच्या बेटावर रवाना करण्यात येतं, मारोनीहून अंदाजे नव्वद मैल दूर. इतर गुन्हेगारांची तीन प्रकारे विभागणी होते. पहिला वर्ग 'फारच धोकेबाज' असणारांचा—अर्थात त्यांच्या मते असे गुन्हेगार ताबडतोब खास शिक्षेच्या कोठडीत पाठविण्यात येतात. त्यांची वागणूक सुधारली आहे असं कधी त्यांना वाटलं तर त्यांना 'सेलट' नावाच्या बेटसमूहावर पाठविण्यात येतं. मग तिथे ते ठरलेली वर्षे किंवा जन्मभर राहतात. सेंट लॉरेंटहून ती बेटं तीनशेहून जास्त मैल लांब आहेत, आणि केयेनहून साठ मैल. तिथे मुख्य तीन बेटं आहेत; सर्वांत मोठं रॉयल, एकांतवासासाठी तुरुंग असलेलं 'सेंट जोसेफ' आणि सर्वांत लहान असलेलं 'डेव्हिल बेट.' तिथले लोक राजकारणी आहेत.

'त्यानंतर दुसऱ्या प्रतीचे गुन्हेगार : ते 'सेंट लॉरेंट कॅम्प'मध्ये राहतात. त्यांच्याकडून बागकाम आणि जमिनीची मशागत करून घेण्यात येते. जरूरीप्रमाणे त्यांना इतर भयानक कॅम्पवरही पाठविण्यात येतं. त्या कॅम्पना 'मृत्यूच्या छावण्या' म्हणतात शेवटी उरतो सामान्य गुन्हेगारांचा वर्ग. अशा निरुपद्रवी लोकांना कार्यालय किंवा भटारखान्यात काम देण्यात येतं, किंवा गाव आणि कॅम्प स्वच्छ करण्याचं काम. याखेरीज त्यांना रंगकाम, सुतारकाम, लोहारकाम, धुलाई, शिंपीकाम, वीजकाम अशा प्रकारच्या कामातही गुंतवण्यात येतं. त्यातून तुम्हाला बाहेर काढण्यात आलं आणि कोठडीत ठेवण्यात आलं तर त्याचा अर्थ असा समजा की लवकरच कोणत्या तरी बेटावर रवानगी होणार. मग सगळंच संपलं. सुटकेची आशाच करायला नको. मग पळून जाण्याचा एकच मार्ग—रुग्णालय. पोट बिघडल्याच्या किंवा गुडघा मोडल्याच्या सबबीवर रुग्णालयात दाखल होणे आणि तेथून सुटकेचा प्रयत्न करणे. कोणत्याही परिस्थितीत बेटावर जाणं टाळायलाच हवं. यदाकदाचित तिथे जाण्याचा प्रसंग उद्भवलाच तर तत्पूर्वी वैद्यकीय सेवकाला पैसा चारून ताप येणारी लस टोचून घ्यावी किंवा अन्य कोणत्याही उपायानं हमखास आजारी पडण्याची व्यवस्था करावी. कितीही त्रास सोसावा लागला तरी रुग्णालयात राहण्याशिवाय तरणोपाय नाही.

'तुम्हाला जर इतर कैद्यांबरोबर झोपडीमध्ये ठेवण्यात आलं तर कॅम्पच्या आत चालू असलेल्या कोणत्याही कामावर अडकून पडू नका. कारकुनाचा हात ओला करून रस्ते झाडणं, दूरवर असलेल्या लाकडाच्या गिरण्यात किंवा तसल्याच प्रकारची कामं मिळवा. त्यामुळे तुम्हाला विचार करायला भरपूर वेळ मिळेल. तेथील शिक्षा भोगून त्याच खेड्यात स्थायिक झालेल्या अनुभवी गुन्हेगारांकडूनही विनासायास मार्गदर्शन मिळेल. तुमचा सुटकेचा कार्यक्रम अशा पद्धतीने सहजपणे आखता येईल. खेड्याबाहेरील कॅम्प मात्र टाळा. तिथे प्रत्येकजण फार लवकर मरून जातो—काही कॅम्प तर असे आहेत की तीन महिन्यांच्यावर तिथे कोणी टिकाव धरू शकत नाही. शिवाय दाट झाडीमध्ये प्रत्येकाकडून रोज सक्तीनं पंचवीस ते तीस घनफूट लाकूड तोडून घेतात.'

सर्व जलप्रवासात ज्यूलट आम्हाला ही बहुमोल माहिती पुरवीत होता. त्याच्या बाजूनं त्याची पूर्ण तयारी होती. त्याला शिक्षा-कोठडीत लगेच पाठवण्यात येणार हे तो ओळखून होता, कारण त्यानं एकदा आपली सुटका करून घेतली होती आणि त्याला पुन्हा पकडण्यात आलं होतं. म्हणूनच त्यानं दक्षता घेऊन आपल्या चार्जरमध्ये एक छोटं ब्लेड ठेवून दिलं होतंना. त्याचा वापर करून, तिथे पोचल्यावर तो आपला गुडघा जखमी करून घेणार होता. जहाज बंदराला लागताच तो सर्वांच्या देखत खाली कोसळणार होता. त्याच्या अंदाजाप्रमाणे त्याला परस्पर रुग्णालयातच दाखल केलं जाणार होतं. आणि अक्षरशः तसंच घडलं.

## सेंट-लॉरेंट-ड्यू-मारोनी

वॉर्डर्स पाळीपाळीने कपडे बदलण्यासाठी आत जाऊन येत होते. पांढरा पोशाख आणि डोक्यावर शिरस्त्राण घालून आता ते तयार झाले. ज्यूलट म्हणाला, 'आपण जवळ जवळ पोचलोच आहोत.' हवेत जाणवण्याइतका उकाडा होता. काचेतून झाडी दिसू लागली. अखेर 'मारोनी' आलं तर. पाण्यात चिखल दिसत होता. घनदाट जंगल—हिरवंगार आणि आकर्षक. जहाजाच्या भोंग्यामुळे घाबरून काही पक्षी आकाशात उडाले. आम्ही अगदी सावकाश जात असल्यामुळे बेटावरच्या वनस्पतींचं सूक्ष्म निरीक्षण करता येत होतं. आता लोखंडी छताची काही लाकडी घरही दिसू लागली. त्यांच्या दारात काळी माणसं उभी होती. ती आमच्या जहाजाकडेच लक्ष देत होती. अशा प्रकारची माणसांची देवाण घेवाण ते नेहमीच पाहत असल्यामुळे, त्यांनी हात हलवण्याचे कष्ट घेतले नाहीत. तीन वेळा इशाऱ्याचे सायरन वाजून जहाज थांबलं. एकदम स्तब्ध. अगदी माशीचं गुणगुणणं ऐकू येईल इतकी शांतता.

कोणीच बोलत नव्हतं. ज्यूलटनं आपला चाकू काढला आणि गुडघ्यापाशी विजार फाडण्यास सुरुवात केली. आमच्या खोलीत रक्ताचे डाग दिसू नयेत म्हणून तो डेकवरच गुडघा जायबंद करणार होता. दार उघडलं आणि आम्हाला बाहेर तीन तीनच्या ओळीत

**'Papillon !'-An incredible story. An astonishing, fantastic odyssey.**

*—Evening News, London.*

उभं केलं. चौथ्या रांगेत आम्ही होतो. मी आणि देगा, आमच्यामध्ये ज्यूलट. सर्वजण डेकवर आले. त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते; डोक्याला आणि डोळ्यांना रणरणतं उन एकदम जाणवू लागलं. डेकवर पुन्हा ओळी व्यवस्थित करून आम्ही जहाजावरून उतरण्यास सुरुवात केली. पहिल्या माणसानं दारातून जिन्यात पाऊल टाकल्यावर रांग क्षणभर थांबली तेवढ्यात चपळाई करून मी ज्यूलटची पिशवी ताब्यात घेतली. त्यानं दोन्ही हातांचा वापर करून एका झपाट्यात चाकू गुडघ्यामध्ये तीन चार इंच खोल रुतवला. तो आत पार मांसात रुतला. नंतर खस्‌दिशी उपसून तो चाकू त्यानं माझ्या ताब्यात दिला आणि आपली पिशवी पुन्हा खांद्यावर अडकवली. दहा सेकंदाच्या आत तो प्रकार आटोपला. पायरीवर पाहिलं पाऊल टाकताक्षणीच तो तळापर्यंत गडगडत खाली जाऊन पडला. खालच्या पहारेकऱ्यांनी त्याला उचलून धरलं आणि तो जखमी झाल्याचं लक्षात येताच स्ट्रेचर बोलावून घेतलं. अपेक्षेप्रमाणे सर्व घडलं आणि दोन जणांनी स्ट्रेचरवरून त्याला तेथून हलवलं. लवकरच तो अदृश्य झाला.


चित्रविचित्र पोशाख असलेला जमाव आमच्याकडे जरा उत्सुकतेनं पाहत होता. निग्रो, रेड इंडियन, चिनी आणि काही गोरे लोक ( ते निश्चितपणे सुटका झालेले गुन्हेगार असणार. ) आमच्यातील प्रत्येकाकडे निरखून पाहात होते. दुसऱ्या बाजूला वॉर्डर्स, काही सुशिक्षित लोक आणि उन्हाळ्यातील पोशाखात स्त्रिया व मुले—प्रत्येकाच्या डोक्यावर काहीतरी शिरस्त्राण होतंच. दोनशे लोक खाली उतरल्यावर तेवढाच संच पुढे चालू लागला. सुमारे दहा मिनिटं चालल्यावर एका भल्या मोठ्या दरवाज्यापाशी येऊन आम्ही थांबलो. त्यावर लिहिलं होतं, 'सेंट—लॉरेंट—ड्यू—मारोनी येथील पापक्षालन—गृह, क्षमता ३००० लोक.' दरवाजा उघडला आणि आम्ही दहा दहाच्या रांगेत आत प्रवेश केला.

'डावा, उजवा. डावा, उजवा...' आत येताना जुने गुन्हेगार आमच्याकडे पाहत होते. नीट दिसावं म्हणून ते खिडक्यांवर किंवा मोठ्या दगडांवर चढून उभे होते. काही अंतर चालून गेल्यावर 'थांबा' असा हुकूम मिळाला. 'तुमच्या पिशव्या खाली ठेवा. अरे त्या हॅट्स इकडे आणा पाहू.' आम्हाला गवताच्या हॅट्स देण्यात आल्या. त्यांची नितांत जरूरी होतीच—आधीच दोन तीन कैदी ऊष्माघातामुळे कोसळले होते.

हजेरीला सुरुवात झाली. ज्यूलटचं नाव आलं. एका पहारेकऱ्यानं 'तो जखमी झाल्यामुळे दवाखान्यात हलवला आहे' असं सांगितले. येथपर्यंत बेटांवर पाठविण्यात येणाऱ्यांची यादी संपली. मी आणि देगाने एकमेकांकडे पाहिलं. ज्यूलटनं सांगितलेल्या गोष्टी आम्हाला एकदम आठवल्या.

'इकडे लक्ष द्या. आता ज्यांची नावं मी घेईन त्यांनी आपली पिशवी खांद्यावर घेऊन त्या पिवळ्या झोपडीसमोर जावं, तिथे रांगेत उभं राहावं, क्रमांक एक...दोन...'

यादी चालू राहिली. मी, कॅरियर आणि देगा इतर लोकांबरोबर



त्या झोपडीपाशी जाऊन रांगेत उभे राहिलो. तिचा दरवाजा उघडला गेला आणि आम्ही त्या सुमारे साठ फूट लांबीच्या आयताकृती जागेत प्रवेश केला. ती चांगलीच प्रशस्त खोली होती. मधोमध सहा फूट रुंदी असलेला खोलीच्या लांबीइतका लोखंडी गजांचा पट्टा होता. कॅनव्हसचे बिछाने आणि प्रत्येकी एकेक रग तिथे होते. प्रत्येकानं आपापली जागा निवडली. मी, देगा, पायरट ली, सॅन्टोरी आणि ग्रॅन्डेट यांनी शेजार शेजारच्या जागा घेतल्या. तिथे तावडतोब छोटे छोटे गट पडले. मी खोलीच्या कडेपर्यंत चालत गेलो. डावीकडे स्वच्छतागृहे होती. पाणी मात्र सतत चालू नव्हतं.

जहाजातून आमच्या मागोमाग उतरलेले लोक तिथे येण्यास सुरुवात झाली. खिडकीच्या गजांमधून आम्ही त्यांच्याकडे पाहत होतो. आम्हा तिघांना फारच आनंद झाला होता—कारण असं की आम्हाला बेटांवर पाठविण्यात येणार नव्हतं; सामान्य खोलीतच ठेवण्यात आलं होतं. सर्व कार्यक्रम पाच वाजेपर्यंत चालला आणि तोवर सर्वचजण खुशीत होते. पण नंतर ग्रॅन्डेट एकदम म्हणाला, 'आश्चर्य आहे, त्यांनी अद्यापि एकाही कैद्याला बेटावर रवाना करण्यासाठी बाहेर काढलेलं नाही. काहीतरी घोटाळा आहे, पण ठीक आहे. माझं तरी बरं आहे.' झालं. पुन्हा भीतीला जागा राहिली. ग्रॅन्डेट हा पॅरिसमधील मुख्य तुरुंगातील तिजोरीच चक्क फोडणारा सद्गृहस्थ होता, ज्या कृत्यामुळे सर्व देश हसला होता.

या कटिबंधातील प्रदेशात दिवस आणि रात्र एकदम सुरू होते. उष:काल किंवा संधिप्रकाश असला प्रकार नसतो. सर्वत्र वर्षभर हीच स्थिती असते. साडेसहा वाजता अचानक अंधार पडला. एक म्हातारा कैदी आमच्या खोलीत आला आणि तेलाचे दोन लहान दिवे छतावरील हुकमध्ये अडकवून निघून गेला. त्यांचा प्रकाश इतका अपुरा होता की जवळजवळ तीनचतुर्थांश खोली अंधारातच होती. नऊच्या सुमारास सर्वजण गाढ झोपी गेले. एकतर या नव्या ठिकाणी येण्याबद्दलची उत्सुकता आता संपली होती आणि उन्हामुळे सर्वजण पार थकून गेले होते. हवेचा पत्ताच नव्हता, त्यामुळे गुदमरून जीव जातो की काय असं वाटत होतं. सर्वजण कपडे काढून आडवे झाले होते. माझा बिछाना देगा आणि पायरट ली च्या मध्ये होता. थोडा वेळ आम्ही कुजबुजत राहिलो आणि झोपेच्या पूर्णपणें आधीन झालो.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाहेर अंधार असतानाच, बिगुल वाजलं. प्रत्येकजण उठला आणि स्नान उरकून कपडे चढवले. त्यांनी आम्हाला कॉफी आणि ब्रेडचे तुकडे दिले. भिंतीवर तुमच्या सर्व चीजवस्तू ठेवण्यासाठी लाकडी फळी ठोकली होती.

नऊ वाजता दोन वॉर्डर्स आत आले, बरोबर एक पांढऱ्या कपड्यातला तरुण कैदी आणला होता. ते दोघं कॉर्सिकन होते आणि तिथल्या कॉर्सिकन कैद्यांबरोबर आपल्या भाषेत बोलू लागले. मध्यंतरीच्या काळात एक वैद्यकीय सेवक खोलीत हिंडून कोणाला तरी शोधीत होता. माझ्याजवळ आल्यावर तो म्हणाला, 'पॅपिलॉन? कसं काय वाटतंय? मला ओळखलं नाहीस?'

'नाही,'

'मी सिएरा अल्जेरॉस. आपली पॅरिसमध्ये ओळख झाली होती.'

'खरंच की, आता मी तुला ओळखलं. पण तुला इथे २९ साली पाठवलं होतं, हे ३३ साल चालू आहे. अजूनही तू इथे कसा?'

'हे बघ! इथून लवकर सुटका होत नसते. ते असो. तू आता आजारी असल्याचं जाहीर कर. काय करशील ना? हा दुसरा कोण आहे?'

'तो देगा आहे, माझा मित्र.'

'मग तुलाही मी डॉक्टरकडे घेऊन जाईन, देगा. पपी, तुला आव झाली आहे आणि डॅडी, तुम्हाला दम्याचा विकार उद्भवला आहे. मी तुमची दवाखान्यात ११ वाजता गाठ घेईन. तिथे मला तुला काही सांगायचं आहे.' तो निघून गेला. तत्पूर्वी कोणी आजारी आहे का याची चौकशी त्यानं केली. ज्यांनी हात वर केले त्यांची नावं त्यानं टिपून घेतली. पुन्हा तो परत आला. यावेळी त्याच्याबरोबर एक वॉर्डर होता; वयस्कर, उन्हानं चेहरा रापलेला. 'पॅपिलॉन, हे माझे साहेब आहेत, मि. बार्टिलोनी. मी तुम्हाला ज्यांच्याबद्दल सांगितलं होतं तेच हे माझे दोन मित्र, साहेब.'

'ठीक आहे. सिएरा, आपण त्या गोष्टीकडे दवाखान्यात लक्ष देऊ. माझ्याकडे ते काम लागलं.'

अकरा वाजता ते आम्हाला नेण्यासाठी आले. एकूण नऊजण आजारी पडले होते. झोपड्यांच्या बाजूनं कॅम्पमधून आम्ही चालत होतो. एका त्यातल्यात्यात नव्या इमारतीपाशी आम्ही आलो; तिला पांढरा रंग देण्यात आला होता आणि भिंतीवर रेडक्रॉसचं चिन्ह दिसत होतं. रंग दिलेली ती एकमेव इमारत. आम्ही त्यात प्रवेश केला तेव्हा तिथे आधीच सुमारे साठ माणसं प्रतीक्षा करत बसलेली दिसली. प्रत्येक कोपऱ्यात दोन वॉर्डर्स होते. सिएरा तिथे हजर झाला. नखशिखांत पांढरा वैद्यकीय पेहेराव. 'तू, तू, आणि तू, आत या पाहू.' आम्ही आत गेलो. ती अर्थातच डॉक्टरची खोली होती. डॉक्टर हजर नव्हतेच. सिएरा मला म्हणाला, 'पपी, मला प्रथम तुला मिठी मारू दे. तू आणि तुझ्या मित्रासाठी मी काही मदत करू शकतो आहे म्हणून मला फार आनंद झाला आहे. खरं म्हणजे तुम्हाला बेटावर रवाना करणार आहेत... थांब, आधी माझं बोलणं पुरं होऊ दे. तुला जन्मठेप झाली आहे आणि देगा, तुला पंधरा वर्षं. तुमच्याजवळ काही रक्कम आहे?'

'होय, आहे.'

'मग प्रत्येकी पाचशे फ्रँक्स् माझ्याजवळ द्या म्हणजे उद्या सकाळी तुम्हाला रुग्णालयात दाखल करून घेण्यात येईल. तुला आव झाल्यामुळे आणि तुला देगा, तू रात्रभर दम्याच्या त्रासामुळे खूप गोंधळ कर, थोड्याच वेळात मरतोस की काय असं वाटलं पाहिजे. बाकीचं मग मी पाहून घेतो. आणखी एक गोष्ट पॅपिलॉन, तू जर तिथून सुटका करून घेणार असशील तर मला पुरेशी आधी कल्पना दे म्हणजे मी योग्य ती मदत करू शकेन. ते तुला इथे जास्तीत जास्त

---

**'Papillon!'–One closes this book drunk with adventure, overcome with compassion.**

*–London Express*

---

महिनाभर ठेवू शकतील. आठवड्याला प्रत्येकी शंभर फ्रँक्स् या दरानं ! तुला जलद हालचाल करावी लागणार आहे.'

मी आत गेलो आणि परत येऊन सिएराला हजाराच्या ऐवजी पंधराशे फ्रँक्स् दिले. जादा पाचशे स्वीकारण्यास त्यानं नकार दिला मी सुद्धा त्याला फार आग्रह करू शकलो नाही. तो म्हणाला, 'हे पैसे पहारेकऱ्यासाठी आहेत. मला स्वतःसाठी काहीही नको. आपण मित्र आहोत, आहोत ना?'

दुसऱ्या दिवशी मी आणि फर्नांडिस असे रुग्णालयात दाखल झालो. आमचा वॉर्ड बराच मोठा होता. देगाला तर रात्रीच तातडीनं तिथे हलवण्यात आलं होतं. त्या वॉर्डचा मुख्य परिचारक सुमारे पस्तीस वर्षांचा होता. त्याचं नाव होतं 'चेतल.' सिएराकडून त्याला आम्हा तिघांविषयी सर्व समजलं होतं. डॉक्टर आल्यावर आमच्या आजारपणाचं वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. माझ्या शौच्यातून अमिबा पडत आहेत हे दाखवणं आणि देगाला थोडं सल्फर जाळून हुंगायला लावणं ही महत्त्वाची कामगिरी तो पार पाडणार होता. तो वॉर्ड पहिल्या मजल्यावर होता. आणि तिथे अंदाजे सत्तर रुग्ण दाखल झाले होते. त्यापैकी खूपजणांना आव आणि हगवणच झाली होती. मी चेतलला विचारलं की ज्यूलट कोठे आहे. तो म्हणाला, 'त्या रस्त्यातल्या इमारतीतच आहे. तुझं त्याच्याकडे काही काम आहे का?'

'हो, त्याला सांग की पॅपिलॉन आणि देगा इथे आलेले आहेत. खिडकीतून त्याला तोंड दाखव म्हणून सांग.'

चेतलला त्याच्या मनाप्रमाणे ये-जा करण्याची मुभा होती. त्याला फक्त एवढंच करावं लागे की आल्यावर दारावर थाप मारायची, म्हणजे एक अरब दार उघडत असे. तो अरब तुर्की होता आणि वॉर्डसचा मदतनीस म्हणून काम करत होता. दाराच्या उजव्या व डाव्या बाजूस तीन खुर्च्या होत्या. आणि तीन वॉर्डर्स आपल्या गुडघ्यावर बंदुका टाकून तिथे बसलेले असत. तेथील खिडक्यांचे गज आगगाडीच्या रुळाएवढे जाड होते; म्हणजे येथून निसटता येणं अशक्यच ! मी एका खिडकीपाशी बसलो.

आमच्या आणि ज्यूलटच्या इमारतींमध्ये एक सुंदर फुलांची बाग होती. ज्यूलट खिडकीशी आला. त्याच्या हातात पाटी होती आणि त्यावर खडूनं त्यानं लिहिलं होतं, 'शाब्बास.' एक तासानंतर चेतलनं मला त्याचं एक पत्र आणून दिलं. त्यात होतं, 'मी तुझ्या वॉर्डमध्ये येण्याचा प्रयत्न करणार आहे. जर ते जमलं नाही तर तुम्ही माझ्या इथे येण्याचा प्रयत्न करा. कारण असं आहे की, तुझ्या वॉर्डमध्ये तुझे बरेच शत्रू आहेत. तुझीही बेटावर रवानगी होणार आहे तर ! तू मुळीच काळजी करू नकोस; आपण त्यांच्या डोळ्यात सहज धूळ फेकू.'

ज्यूलट आणि मी ब्युलियूच्या त्या प्रकरणानंतर एकमेकांच्या अगदी जवळ आलो होतो. कारण आम्ही एकत्र दुःख भोगलं होतं.

त्याला दहा लाखाचे हिरे चोरल्याबद्दल वीस वर्षांची शिक्षा मिळाली होती आणि चार वर्षं होताच त्याने सुटका करून घेतली होती. पॅरिसला परत जाताना त्याला पुन्हा अटक करण्यात आली. नंतर तो आमच्याबरोबर परत 'गियाना'ला हजर झाला.

रुग्णालयात येऊन आता एक आठवडा लोटला होता. काल मी चेतलजवळ दोनशे फ्रँक्स् दिले. ती आम्हा दोघांना तिथे ठेवण्याची आठवड्याची बक्षिसी होती. लोकप्रिय होण्यासाठी आम्ही तेथील लोकांना तंबाखू पुरवीत असू. देगाची 'करोरा' नावाच्या एका साठ वर्षांच्या माणसाशी ओळख झाली. तो देगाचा सल्लागारच बनला. 'जवळ बरेच पैसे असतील तर पळून जाण्याचा मूर्खपणा करू नकोस' असा अनाहूत सल्ला त्यानं देगाला दिला. तुरुंगातल्या बातम्या बाहेरच्या खेड्यात ताबडतोब पसरतात आणि सुटका करून घेतलेल्या लोकांचा तिथले खेडूत चार्जरसाठी खूनही करण्यास पुढे मागे पाहत नाहीत, असं करोराचं थोडक्यात म्हणणं होतं. म्हाताऱ्या देगानं त्यांचं सर्व बोलणं मला ऐकवलं. मी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला की, 'तो इथे वीस वर्षं काढलेला साठ वर्षांचा थेरडा आहे, त्याच्या नादाला लागण्यात अर्थ नाही.' पण छे ! देगाच्या मनावर त्या गोष्टींचा चांगलाच परिणाम झाला होता. मी त्याचं धैर्य टिकवण्याचा खूप प्रयत्न केला. पण ते काम फारच कठीण जात होतं.

मी सिएराला निरोप पाठवला की, माझी गालगानीला भेटण्याची इच्छा आहे. त्याला काही फार वेळ लागला नाही. दुसऱ्याच दिवशी गालगानी रुग्णालयात दाखल झाला—पण बिनगजांच्या वॉर्डमध्ये. मग मी त्याची चार्जर कशी त्याला परत करावी? पुन्हा मी चेतलला सांगितलं की, गालगानीशी मला महत्त्वाचं काही बोलायचं आहे. मी चेतलचा असा समज होऊ दिला की, आम्ही सुटकेची योजना आखणार आहोत. त्यानं असं आश्वासन दिलं की, 'पहारेकरी बदलण्याच्या वेळेला तशी खिडकीतून भेट मी घडवून देईन.' त्यासाठी काही पैसेही घेणार नाही असं त्यानं आवर्जून सांगितलं. दुपारी बाराच्या सुमारास गालगानीला खिडकीशी आणण्यात आलं. मी त्याची चार्जर सरळ त्याच्या हातावर ठेवली. तो माझ्यासमोर उभा होता आणि ढसढसा रडत होता.

दोन दिवसानंतर त्याच्याकडून मला एक मासिक आलं—त्यात पाचशे फ्रँक्सच्या नोटा होत्या आणि 'आभार' हा एकच शब्द ! चेतलनंच ते मासिक मला आणून दिलं. त्यातील पैसे त्यानं पाहिले होते. पण त्याचा उल्लेख त्यानं केला नाही. त्याला काही रक्कम द्यावी अशी माझी इच्छा होती. पण त्यानं घेण्यास नकार दिला. मी त्याला म्हणालो, 'आम्ही येथून पळ काढणार आहोत. तुला आमच्याबरोबर यायला आवडेल?'

'नाही, पॅपिलॉन; मी दुसरीकडे बांधलेला आहे. अजून पाच महिने तरी मला तसा प्रयत्न करायचा नाही. त्यानंतर माझ्या एका मित्राची सुटका होणार आहे. त्यावेळी चांगल्या पूर्वतयारीनिशी मी हालचाल करणार आहे—आणि निश्चितपणे यशस्वी. तुला बेटावर पाठविण्याची भीती असल्यामुळे तुला आताच घाई करणं आवश्यक आहे, योग्य आहे; पण या जाड गजांमधून ते काम थोडं कठीणच आहे. माझ्याकडून मदतीची अपेक्षा करू नकोस. कारण माझ्या नोकरीवर गदा यावी असं मला वाटत नाही. माझा मित्र बाहेर पडेपर्यंत इथे मी सुखात राहू शकतो.'

'ठीक आहे, चेतल. स्पष्ट बोलणं केव्हाही अधिक चांगलं. मी हा विषय पुन्हा तुझ्यापाशी काढणार नाही.'

'पण तरीही मी केवळ तुझ्यासाठी निरोप किंवा पैशांची देवाण-

घेवाण करीन.' तो म्हणाला.

'धन्यवाद, चेतल.'

त्या रात्री आम्हाला मशिनगन उडवल्याचे आवाज ऐकू आले. दुसऱ्या दिवशी आम्हाला कळलं की, माझा प्रिय 'दणकेबाज' मित्र ज्यूलट तेथून पसार झाला होता. देव त्याला साहाय्य करो. तो खरोखरच एक चांगला मित्र होता. त्याला योग्य संधी मिळाली असेल किंवा त्यानं तशी निर्माण केली असेल. त्याचं भलं झालं.

पंधरा वर्षांनंतरची गोष्ट. सन १९४८ मध्ये मी 'हाइती' येथे असताना एक दिवस एकाशी वाटाघाटी करीत होतो. एका लक्षाधीशाच्या मदतीनं त्या भागात 'कॅसिनो' उघडण्याचा विचार आला. तिथे शँपेन पीत असताना एका निग्रो मुलीची गाठ पडली. तिला एका फ्रेंच कुटुंबानं मुलीसारखं वाढवलं होतं. ती मला म्हणाली, 'माझी आजी 'वू दू' नृत्यशिक्षिका आहे, ती एका म्हाताऱ्या फ्रेंच माणसाबरोबर राहते. तो केयेन येथून पळाला असं सांगतो.आमच्याबरोबर तो जवळजवळ पंधरा वर्षं आहे. कायम प्यायलेलाच असतो. ज्यूलट त्याचं नाव.'

मी एकदम उभा राहिलो. 'मुली, आत्ताच्या आत्ता मला तुझ्या आजीकडे घेऊन चल.' आम्ही तेथून निघालो.

वाटेत मी दोन रमच्या आणि दोन शँपेनच्या बाटल्या विकत घेतल्या. टॅक्सीनं किनाऱ्यावरच्या एका सुरेख घराजवळ आलो. भिंतींना पांढरा रंग आणि फरशी लाल. घराच्या पायऱ्यांजवळ समुद्राचं पाणी पोचत होतं. त्या मुलीनं बराच वेळ दार ठोठावलं. शेवटी एक काळी आणि संपूर्ण पांढऱ्या केसांची स्त्री प्रथम दारात अवतीर्ण झाली. स्थानिक भाषेत दोघीजणी काहीतरी बोलल्या आणि नंतर ती बाई म्हणाली, 'आत या, महाराज. हे घर आपलंच आहे.'

ॲसिटिलीनच्या दिव्यामुळे ती स्वच्छ, नीटनेटकी खोली दिसू लागली. खोलीत पक्षी आणि मासे ठेवले होते. 'तुम्हाला ज्यूलटला भेटायची इच्छा आहे ना? तो येतोच आहे. ज्यूल्स! ए ज्यूल्स! तुला भेटायला कोणीतरी आलं आहे.'

एक म्हातारा माणूस तिथे हजर झाला. उघडे पाय आणि निळ्या पट्ट्यांचा पायजमा. मला तुरुंगातल्या गणवेशाची आठवण झाली.

'काय बाईसाहेब, या रात्रीच्या वेळी मला भेटायला कोण येऊ शकेल? कोण? पॅपिलॉन? छे! हे कसं काय शक्य आहे!' त्यानं आपल्या हातानं मला पकडलं. तो म्हणाला, 'स्नोबॉल, दिवा जवळ आण पाहू. म्हणजे माझ्या जुन्या मित्राचा चेहरा मला स्पष्ट दिसेल. तो तूच, मित्रा! नक्की तोच तू आहेस! सुस्वातगम्, सुस्वागतम्, सुस्वागतम्! ही छोकरी माझ्या म्हाताऱ्या बाईची नात आहे–इथलं सगळं तुझंच आहे. आता फक्त तुझ्या शब्दाचीच खोटी आहे.'

त्या रात्री आम्ही भरपूर प्यायलो. ज्यूलट एकसारखा गात होता. 'अखेर आपण दोघांनीही त्यांच्या हातावर तुरी दिलीच. दिली का नाही पपी? त्या धाडसाला तोड नाही. माझंच पाहा ना. मी कोलंबिया, पनामा, कोस्टारिका आणि जमेका ओलांडून आलो आणि पंधरा वर्षांपूर्वी इथे पोचलो. मी या 'स्नोबॉल' बरोबर पूर्ण सुखी आहे–माणसानं मुद्दाम मागून घ्यावी अशी ही चांगली स्त्री आहे. तू येथून केव्हा जाणार आहेस? मुक्काम बराच आहे?'

'नाही, फक्त एक आठवडा.'

'इथे कशासाठी आला होतास?'

'एका व्यवहारासाठी.'

'प्रिय दोस्ता, माझ्याबरोबर जर तू आपलं उरलेलं आयुष्य इथेच घालवशील तर मला फार आवडेल, पण इथल्या कुठल्याही माणसाबरोबर तू कसलाही व्यवहार करू नकोस. त्यात ठार होण्याची शक्यता जास्त असते.'

'उपदेशाबद्दल आभार.'

'असो. अगं ए! स्नोबॉल! तुझ्या खास नाचासाठी तयार हो. माझ्या मित्राच्या आगमनासाठी तोच एक आणि एकमेव गोष्ट आवश्यक आहे.'

पुन्हा केव्हातरी मी त्या 'खास' भयकर 'वू दू' नाचाविषयी सांगेन.

तर, ज्यूलटनं सुटका करून घेतली होती. आणि आम्ही मात्र अद्याप अडकून पडलो होतो; मी, देगा आणि फर्नांडिस. मी त्या खिडकीच्या जाड गजांकडे वारंवार पण सहजपणे पाहात होतो. तिथे काहीच करणं शक्य नव्हतं. फक्त दरवाज्यातूनच शक्यता होती. तिथे दिवसरात्र तीन सशस्त्र वॉर्डर्सचा पहारा होता. ज्यूलट पळून गेल्यामुळे तो अधिकच कडक झाला होता. नियमित गस्त चालू होती. शिवाय डॉक्टरशीही फारसे मैत्रीचे संबंध निर्माण झाले नव्हते. चेतल दिवसातून फक्त दोनदा इंजेक्शन देण्यासाठी आणि ताप पाहण्यासाठी येत असे.

दुसरा आठवडा तसाच गेला आणि मी पुन्हा दोनशे फ्रँक्स दिले. देगा आता सुटकेखेरीज इतर सर्व विषयांवर बोलत असे. काल त्यानं माझा चाकू पाहिला आणि त्यानं विचारलं, 'म्हणजे तो तुझ्याजवळ अजूनही आहे? कशाकरता बुवा?'

रागात मी उत्तर दिलं, 'माझी काळजी घेण्याकरता, आणि जरूर पडली तर तुझी सुद्धा.'

फर्नांडिसचा उपयोग होणंही कठीणं दिसत होतं. 'करोरा'च्या वक्तव्याचा त्याच्याही मनावर परिणाम झाला होता.

इथे आमच्या सत्तर लोकांच्या वॉर्डमध्ये रोज एक दोन तरी लोक आवेमुळे मरत होते. पण ते सर्वजण दुपारच्या किंवा संध्याकाळच्या वेळात मेले. एकही आजारी माणूस सकाळच्या वेळी गेला नाही. असं का व्हावं? निसर्गाच्या रहस्यांमधील हे सुद्धा एक!

आज रात्री मी देगाबरोबर बराच विचारविनिमय केला. मी त्याला सांगितलं की 'काही काही वेळा तो अरब एक मूर्खपणा करतो. जे लोक तोंडावर पांघरुण घेऊन झोपले असतील अशा खूप आजारी लोकांची पांघरुणं तो रात्रीच्या वेळी अचानक येऊन खसकन् ओढतो. अशा वेळी आपण त्याला आडवा करू शकू. म्हणजे नंतर

'Papillon'!–The greatest adventure story of all the time.

*–Anguste Le Breton, Paris*

एकाला त्याचे कपडे घालून बाहेर जाता येईल. ( आमच्या अंगात फक्त सदरा होता आणि पायात सँडल. ) बाहेर गेल्यावर कोणत्याही एका पहारेकऱ्याची बंदूक हिसकावून घेता येईल. त्या तिघांना धाक दाखवून वॉर्डमध्ये कोंडून ठेवून आपण रुग्णालयाच्या भिंतीवरून पलीकडे ' मारोनी ' नदीत उडी टाकू. प्रवाहाला लागून जिकडे जमेल तिकडे प्रथम जाऊ. पुढे काय करायचं ते विचार करून ठरवता येईल. आपल्याजवळ पुरेसे पैसे असल्यामुळे एक होडी आणि जरूरीच्या वस्तूंचा पुरेसा साठा खरेदी करता येईल. नंतर आपण समुद्रमार्गानं दूर निघून जाऊ शकू. '

त्या दोघांनीही माझी ही योजना हाणून पाडली. इतकंच नव्हे तर त्यावर भरपूर टीकाही केली. माझ्या लक्षात आलं की आता ते आपल्यातून बाद झाले आहेत. मी अत्यंत निराश झालो.

दिवस भराभर जात होते.

इथे येऊन आता परवा तीन आठवडे होतील. मला फक्त दहा जणांविषयी आशा शिल्लक राहिली होती, फारतर पंधरा. त्यापैकी कोणी जोडीला मिळाले तर ठीकच. आज २१ नोव्हेंबर १९३३, त्या दिवसाचं विस्मरण कदापि शक्य नाही. जोन्स क्लाऊझट माझ्या वॉर्डमध्ये आला. सेंट मार्टिन येथे एकदा दाढी चालू असताना ज्याच्या खुनाचा प्रयत्न झाला होता तोच हा माणूस. त्याला आत्ता आपले डोळे धड उघडताही येत नव्हते आणि दृष्टी जवळ जवळ नाहीशी झाली होती. त्यात पू भरला होता. चेतल गेल्याबरोबर लगेच मी त्याच्याजवळ गेलो. ताबडतोब त्यानं मला सांगितलं की ज्यांना बेटावर रवाना करणार होते त्यांना तिकडे पाठवून आता पंधरा दिवस होत आले आहेत. सुदैवानं त्याच्याकडे दुर्लक्ष झालं होतं. तीन दिवसांपूर्वी एका कारकुनानं त्याला सल्ला दिला होता की प्रत्येक डोळ्यात एक एक एरंडाचं बी टाक; म्हणजे डोळ्यात पू होऊन रुग्णालयात जाता येईल. त्याप्रमाणे तो येथे हजर झाला.

जोन्स पळून जाण्यासाठी फारच आतुर झाला होता. त्यानं मला सांगितलं की त्यासाठी काहीही करायची त्याची तयारी आहे–वेळ पडली तर खून सुद्धा. कोणत्याही मार्गानं एकदा बाहेर पडायचं, मग कितीही संकटे येवोत. त्याच्याजवळ तीन हजार फ्रँक्स होते. गरम पाण्यानं डोळे धुताच त्याला पुन्हा पहिल्यासारखं दिसू लागणार होतं. मी त्याला सुटकेची माझी योजना ऐकवली. त्याला ती एकदम पटली. फक्त त्याचं म्हणणं असं पडलं की ' वॉर्डर्सना चकित करून धरायचं असेल तर त्यासाठी दोन किंवा तीन जणांची जरूरी आहे. आपण पलंगांचे पाय सोडवून घेऊ शकू आणि प्रत्येकाजवळ त्या लोखंडी सळ्या असल्यावर त्यांना सहज लोळवता येईल. '

आमच्याजवळ जरी बंदूक असली तरी, त्याच्या मते, आम्ही गोळीबार करू यावर पहारेकऱ्यांचा विश्वास बसणार नाही आणि ते इतरांना सहज हाका मारू शकतील. ज्यूलट ज्या इमारतीमधून पळाला ती आमच्यापासून पन्नास फूटही दूर नव्हती. ¤

## रुग्णालयातून पलायन

शेवटी त्या संध्याकाळी मी देगाशी आणि फर्नांडिसशी स्पष्ट बोललो. देगाचा माझ्या योजनेवर बिलकुल विश्वास नव्हता आणि त्यानं असं ठरवलं होतं की जरूर तर भरपूर पैसा चारून त्याला बेटावर पाठवायचा निर्णय फिरवायचा. तो मला म्हणाला, ' सिएराला चिठ्ठी पाठव आणि माझ्या या नवीन विचारात कितपत तथ्य आहे हे त्याला विचारून घे. ' चेतलनं त्याच दिवशी चिठ्ठी नेली आणि उत्तर आणलं, ' बेटावरची रवानगी टाळण्यासाठी कोणालाही एक पैसासुद्धा देऊ नका. ती गोष्ट फ्रान्समध्ये ठरवलेली असते आणि इथल्या कोणाही व्यक्तीला, अगदी गव्हर्नरलाही, त्या निर्णयात फेरबदल करण्याचा अधिकार नाही. रुग्णालयात जर परिस्थिती अगदीच वाईट झाली तर ज्या दिवशी बेटावर जाणारी बोट येथून रवाना होईल, त्याच्या दुसऱ्या दिवशी तिथून बाहेर पडा. '

त्याच चिठ्ठीमध्ये सिएरानं मला लिहिलं होतं की माझी जर इच्छा असेल तर रुग्णालयाच्या मागच्या बाजूस पळून जाण्यासाठी होडीची व्यवस्था करता येईल. शिक्षा भोगून सुटलेला एकजण या कामात मदत करील. त्या व्यक्तीचं नाव जीझस होतं. त्याला भेटण्यासाठी मला क्ष-किरण विभागात जाऊन फोटो काढणं आवश्यक होतं. ती खोली रुग्णालयाच्या भिंतीच्या आतच होती. पण तुरुंगाबाहेरच्या एखाद्या माणसाला तिथे बाहेरून प्रवेश मिळवणं तितकसं कठीण नव्हतं. मात्र तिथे जाण्यापूर्वी माझी चार्जर काढून ठेवण्याचा बहुमोल सल्ला त्यानं आठवणीनं दिला. न जाणो तपासणीमध्ये ती दिसून यायची. मी सिएराला निरोप पाठवला की ' जीझसला बोलावून घे आणि चेतलला सांगून मलाही क्ष–किरण विभागात पाठवण्याची व्यवस्था कर. ' त्याच संध्याकाळी सिएरानं कळवलं की, अशी भेट दोन दिवसांनी सकाळी नऊ वाजता ठरलेली आहे.

दुसऱ्या दिवशी दुपारी देगानं रुग्णालय सोडण्याची परवानगी मागितली. फर्नांडिसनं त्याचं अनुकरण केलं. बेटांकडे जाणारी बोट त्याच सकाळी तेथून हलली होती. कॅम्पमधल्या खोल्यांमधून पळ काढता येईल अशी त्यांची कल्पना होती. मी त्यांना सुयश चिंतलं, पण माझ्या कार्यक्रमात मात्र यत्किंचितही बदल केला नाही.

एकदाची जीझसची गाठ पडली. तो अगदी म्हातारा होता. उन्हानं काळवंडलेल्या त्याच्या तोंडावर मोठ्या जखमेच्या खुणा दिसत होत्या. त्याच्या बोलण्यात विशेष आस्था दिसत नव्हती. त्याचा चेहरा आणि डोळे मला फारसे आवडले नाहीत. या माणसावर कित-



पत विसंबून राहता येईल कोणास ठाऊक ? माझा अंदाज पुढे बरोबर ठरला. आम्ही भराभर बोलत होतो. 'मी तुझ्यासाठी एक होडी मिळवू शकेन. त्यात तुम्ही चारजण बसू शकाल— फार तर पाच. एक पाण्याचं पीप, काही आवश्यक खाद्यपदार्थ, कॉफी, तंबाखू, तीन वल्ही, होडीसाठी शीड तयार करता यावं म्हणून सुई–दोरा आणि कापड, एक होकायंत्र, एक कुऱ्हाड, एक चाकू आणि पाच स्थानिक रमच्या बाटल्या. होडीसकट या सर्व वस्तूंसाठी अडीच हजार फ्रँक्स् पडतील. तीन दिवसांनी आमावस्या आहे. हा सौदा जर ठरला तर आजपासून चार दिवसानंतर, मी होडी घेऊन नदीमध्ये आठवडाभर रोज रात्री अकरा ते पहाटे तीनपर्यंत तुमची वाट पाहीन. त्यानंतर पुढे मात्र मी येणार नाही. होडी रुग्णालयाच्या भिंतीच्या बरोबर समोर असेल. भिंतीच्या आधाराने तुम्ही शोध घ्या. होडीच्या अगदी समोर येईपर्यंत ती तुम्हाला दिसणार नाही— अगदी सहा फुटांवरून सुद्धा.'

मला त्याचा विश्वास वाटत नव्हता, पण मी 'ठीक आहे' म्हणालो.

'मग पैसे ?' जोझरनं विचारलं.

'मी ते सिएरामार्फत पाठवतो.' आम्ही हस्तांदोलन न करताच आपापल्या दिशांना निघून गेलो. यात फारसं तथ्य दिसत नाही.

दुपारी तीन वाजता मी चेतलमार्फत सिएराकडे पैसे पाठवले— अडीच हजार फ्रँक्स. मी विचार केला, 'गाल्गानीच्या सौजन्यामुळे हे मला फारसे जड नाहीत, पण आता ही नशिबाची परीक्षाच आहे; ठीक आहे. देव काही अगदीच झोपलेला नसणार अशी आशा करावी.'

जोन्स क्लाऊझियट आनंदानं बेभान झाला होता. त्याचा स्वतःवर पूर्ण विश्वास होता, माझ्यावर होता आणि तितकाच माझ्या योजनेवरही होता. त्याला फक्त एकाच गोष्टीची काळजी वाटत होती. तो अरबी जरी बऱ्याच वेळा रात्री येत असला तरी रोज रात्री काही येत नव्हता. आणि जेव्हा येतो ते फार उशिरा येईल याचीही खात्री नाही. आणखी एक प्रश्न असा— आपण तिसरा साथी कोणाला निवडावा ? आम्ही बरोबर घ्यायच्या दृष्टीने इतर काही लोकांचा विचार करू लागलो. त्या विषयावर हळू आवाजात बोलत असतानाच एक अठरा वर्षांचा सुंदर युवक आमच्या दिशेने येताना दिसला. तो एखाद्या मुलीसारखा नाजूक होता. त्याचं नाव होतं मॅच्युरेट. त्याला एका टॅक्सी ड्रायव्हरचा खून केल्याच्या आरोपावरून देहांताची शिक्षा मिळाली होती, पण त्याच्या लहान वयाकडे पाहून त्याची जन्मठेप झाली. तो खून केल्याचा संशय दोघांवर होता. हा आणि एक सोळा वर्षांचा तरुण. गुन्हा एकमेकावर ढकलण्याऐवजी प्रत्येकजण खून आपणच केला असल्याची कबुली देत होता. पण टॅक्सी ड्रायव्हरला तर फक्त एकच गोळी लागलेली होती. त्यावेळची दोन्ही मुलांची वागणूक पाहून त्यांची खूपच प्रशंसा झाली होती.

तो तरुणीप्रमाणे दिसणारा मॅच्युरेट आमच्याजवळ आला आणि त्यानं बायकी आवाजात लायटर मागितला. आम्ही तो दिला आणि शिवाय वरती मी त्याला चार सिगारेट्स आणि एक काड्याची पेटी अशा गोष्टी देऊन टाकल्या. त्यानं एक आभारदर्शक गोड स्मित केलं आणि आम्ही त्याला जाऊ दिलं. एकदम जोन्स उठला आणि म्हणाला, 'पपी, आपली काळजी मिटली. तो अरब आता आपण म्हणू त्या वेळी आणि म्हणू तितक्या वेळा इथे यायलाच पाहिजे, अगदी पैज लावून सांगतो.'

'ते कसं काय ?'


'अगदी सोपं आहे. आपण या आत्ताच्या छोट्या मॅच्युरेटला त्या अरबाच्या खाली झोपायला सांगू. अरबांना अशी मुलं आवडतात, हे अगदी जगजाहीर आहे. एकदा तसं झालं की पुढे त्याला या मुलासाठी इकडे यायला लावण्यात काहीच अडचण पडणार नाही. मॅच्युरेटनं फक्त इतकंच सोंग घ्यायचं की त्याला इतर कोणी बघेल याची धास्ती वाटते आणि म्हणून आपल्याला हवं असेल तेव्हा अरबाला इथे येण्यास भाग पाडता येईल.'

'मग ते माझ्याकडे लागलं.

मी लगेच मॅच्युरेटकडे गेलो. त्यानं माझ्याकडे एक विजयी हास्य टाकलं. त्याला वाटलं की त्यानं माझ्यावर पहिल्याच भेटीत भुरळ पाडली. मी त्याला स्पष्ट सांगितलं, 'तुझा गैरसमज झालेला आहे. आधी मुतारीत चल.' तो तिकडे गेला. तिथे जाऊन मी त्याला म्हणालो, 'मी आता जे काही सांगणार आहे त्याचा जर बाहेर कुठे गवगवा केलास तर मी तुला ठार मारीन. नीट ऐक, तू पैशासाठी अमुक-अमुक आणि अमक अमुक करशील काय ? आणि किती पैसे ? तुला कामगिरीचा मोबदला हवा आहे का आमच्याबरोबर पळून जायची तयारी आहे ?'

'मला तुमच्याबरोबर यायला आवडेल, ठीक आहे ?' उत्तम. आम्ही हस्तांदोलन केलं.

तो निघून गेला. जोन्सबरोबर थोडी चर्चा करून मीही बिछान्यावर आडवा पडलो. त्या रात्री आठ वाजता मॅच्युरेट आला आणि खिडकीपाशी जाऊन बसला. त्या अरबाला बोलवावं लागलंच नाही. तो आपण होऊन आला, आणि त्यांच्यात कुजबुजत संभाषण सुरू झालं. दहा वाजता मॅच्युरेट जाऊन झोपला. आम्हीसुद्धा बिछान्यावर पडलोच होतो, पण नऊपासून एक डोळा उघडा ठेवून वाट पाहत होतो. अरब आत आला आणि सगळ्या वॉर्डमध्ये त्यानं चक्कर टाकली. त्याला एक माणूस मेल्याचं लक्षात आलं. त्यानं दरवाजा ठोठावला आणि थोड्या वेळातच स्ट्रेचरवरून त्या माणसाचा मुडदा तिथून हलविण्यात आला. त्या मृत माणसामुळे आम्हाला फायदाच होणार होता. कारण त्याच्या मृत्यूमुळे अरबाला वॉर्डमध्ये येऊन रात्री–अपरात्री केव्हाही तपासणी करायला एक चांगलं निमित्त मिळालं होतं.. दुसऱ्या दिवशी, आमच्या सांगण्या-


नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी

उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०



त्याच क्षणी मी त्याच्या मानेवर फटका मारला.

प्रमाणे मॅच्युरेटनं अरबाबरोबर रात्री अकराची वेळ ठरवली.

ती वेळ आली आणि अरब उगवला; मॅच्युरेटच्या बिछान्या-जवळ जाऊन त्याला उठवण्यासाठी त्याचा पाय हलवला, आणि मुतारीच्या दिशेनं निघून गेला. मॅच्युरेटही त्याच्या मागोमाग गेला. सुमारे पंधरा मिनिटांनंतर तो अरब आधी बाहेर आला, दरवाजा-कडे जाऊन बाहेर पडला. त्यानंतर मॅच्युरेट परतला आणि आम-च्याशी एक शब्दही न बोलता आपल्या बिछान्याकडे चालू लागला. थोडक्यात सांगायचं झालं तर दुसऱ्या दिवशीसुद्धा तोच प्रकार घडला, फक्त मध्यरात्री सगळं काही ठरल्याप्रमाणे घडत होतं. तो अरब आमचा पोरगा सांगेल त्यावेळी न चुकता येत असे.

दिनांक २७ नोव्हेंबर १९३३. हा दिवस आम्ही पक्का केला. या दिवशी कॉटचे दोन पाय काढून सळईसारखा वापर करायचं ठरलं. दुपारी चारपासून मी सिएराच्या चिठ्ठीची वाट पाहू लागलो. चेतल, तो प्रामाणिक परिचारक हजर झाला. त्याच्या-जवळ लेखी निरोप नव्हता. पण तो मला म्हणाला, 'सिएरानं मला निरोप दिला आहे की जीझस तुमच्या ठरलेल्या ठिकाणी वाट पाहील. शुभेच्छा.'

त्या रात्री अकरा वाजता मॅच्युरेट अरबाला म्हणाला, 'मध्य-रात्रीनंतर ये, म्हणजे आपल्याला जरा जास्त वेळ काढता येईल.' अरबानं ते मान्य केलं.

मध्यरात्री आम्ही जय्यत तयार होतो. अरब साधारण साडे-बाराच्या सुमारास आत आला. सरळ मॅच्युरेटच्या बिछान्याजवळ गेला, नेहमीप्रमाणे त्याचा पाय हलवला आणि मुतारीत जाऊन शिरला. मॅच्युरेटही लगेच तिकडे रवाना झाला. मी माझ्या कॉटचा एक पाय हळूच ओढून काढला. त्याचा थोडासा आवाज झालाच. जोन्सनं मात्र आवाज केला नाही. मी दरवाजाच्या मागे उभं राहायचं आणि जोन्सन त्या दाराकडे चालत जाऊन अरबाचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायचं, असा बेत ठरला होता. वीस मिनिटं वाट पाहावी लागली. नंतर मात्र जलद हालचाल झाली. अरब मुतारीतून बाहेर पडला आणि जोन्स दृष्टीला पडताच तो चकित होऊन म्हणाला, 'अशा या अपरात्री तू वॉर्डच्यामध्ये काय करतो आहेस? जा, जाऊन झोप.'

त्याच क्षणी मी त्याच्या मानेवर फटका मारला. तो अजीबात आवाज न करता खाली कोसळला. अगदी त्वरित मी त्याचे कपडे अंगावर चढवले आणि नंतर बूट. नंतर आम्ही त्याला एका कॉटखाली ओढीत नेऊन टाकला. तत्पूर्वी एकदा त्याच्या मानेवर पुन्हा एकदा दणका ठेवून दिला. आता कित्येक तासांची निश्चिती होती.

वॉर्डमधील ऐंशी लोकांपैकी एकहीजण जागचा हलला नव्हता. मी लगेच बाहेरच्या दाराकडे गेलो, मागोमाग जोन्स आणि मॅच्युरेट आले. दोघंही त्यांच्याच कपड्यात होते. मी दरवाजा ठोठावला. वॉर्डरनं तो उघडला. मी हातातली लोखंडी पट्टी त्याच्या डोक्यावर मारली. त्याच्यासमोर असलेल्या दुसऱ्या वॉर्डरची बंदूक खाली गळून पडली. तो निश्चित झोपेत होता. त्यानं काहीही हालचाल करण्यापूर्वी मी त्यालाही आडवा पाडला. बिचारे दोघंजण निमूटपणे बेशुद्ध पडले. पण जोन्सनं ज्याला मारलं तो मात्र विव्हळला आणि खाली जमिनीवर पसरला. आम्ही श्वास रोखून धरला. आम्हाला खात्री होती की तिसऱ्याचा आवाज सगळ्यांना नक्की ऐकू गेला असणार. तो खरंच जोरात ओरडला होता; पण तरीही काहीच हालचाल झाली नाही.

आम्ही त्या तिघांना तिथेच टाकलं. त्यांच्या तीन बंदुका घेऊन तेथून सटकलो. प्रथम जोन्स, मग तो पोरगा आणि नंतर मी. पायऱ्या उतरलो. मेणबत्तीचा मंद प्रकाश तिथे होता. जोन्सनं त्याच्याजवळची लोखंडी पट्टी खाली टाकली; माझी मात्र डाव्या हातात अजूनही होती, आणि उजव्या हातात बंदुक. पायऱ्यांच्या खाली कोणीही नव्हतं. सर्वत्र काळाकुट्ट अंधार होता. नदीच्या बाजूची भिंत शोधून काढण्यासाठी आम्हाला डोळे फाडफाडून बघावं लागत होतं. आम्ही अंदाजानं घाईघाईत पळालो. भिंतीपाशी पोचताच मी खाली वाकलो. जोन्स वर चढला. भिंतीच्या वरून त्यानं आधी मॅच्युरेटला आणि मग मला हात देऊन वर खेचून घेतलं. काय होईल ते होवो या विचारानं आम्ही पलीकडच्या अंधारात लांबवर उड्या टाकल्या. जोन्स एका खड्ड्यात वाईट प्रकारे आदळला आणि त्याचा पाय दुखावला. मॅच्युरेट आणि मी व्यवस्थित उतरलो. आम्ही उठलो. निघण्यापूर्वी आम्ही आमच्या बंदुका टाकून दिल्या. जोन्सनं उभं राहण्याचा प्रयत्न केला पण

त्याला ते जमेना. त्याचा पाय मोडला होता. मी मॅच्युरेटला त्याच्याजवळ ठेवलं आणि भिंतीच्या बाजूने पळू लागलो, फक्त हातानं मधूनमधून भिंतीला स्पर्श करीत होतो. तिथे अंधार इतका होता की मी भिंतीच्या कडेला पोचल्यावर माझ्या हातानं मोकळ्या जागेतच चाचपडल्यामुळे एकदम तोंडावर आपटलो. नदीच्या बाजूनं आवाज आला,

'कोण तुम्हीच ना?'

'हो, तू जीझस का?'

'होय.' त्यानं एक सेकंदभर काडी पेटवली आणि त्या अंदाजानं मी पाण्यात उडी टाकली. पोहत पोहत त्याच्यापाशी गेलो. होडीत दोघंजण होते.

'तू पाहिला आलास का! तू कोण आहेस?'

'पॅपिलॉन.'

'उत्तम.'

'जीझस, आपल्याला तिकडच्या बाजूला जायला पाहिजे. भिंतीवरून उडी टाकताना माझ्या एका मित्राचा पाय मोडला आहे.'

'मग हे वल्हं घे आणि मारायला लाग.'

तीन वल्ही पाणी कापू लागली आणि त्या हलक्या, छोट्या होडीनं सुमारे तीनशे फुटांचं अंतर कापलं. ते दोघं होते त्या दिशेला अंदाजानंच आम्ही जात होतो–दिसत तर काहीच नव्हतं. मी हाका मारली, 'जोन्स!'

'बाबा रे! गप्प बैस! तू तुझा लायटर क्षणभर पेटव पाहू.' जीझसनं बरोबरच्या माणसाला सांगितलं. ठिणगी पेटली. त्यांनी ते पाहिलं. जोन्सनं त्याच्या दातामधून हळूच अशी शीळ वाजवली की ज्यामुळे मोठा आवाज तर होणार नाही पण ऐकू तर यावं! ती सापाची 'फुसफुस'च वाटावी. तो तशी शीळ वाजवत राहिला, त्यामुळे आम्ही त्यांच्या दिशेनं सहज जाऊ शकलो. होडीतला दुसरा माणूस उतरला. त्यानं जोन्सला आपल्या हातानं उचललं आणि होडीत ठेवलं. नंतर मॅच्युरेट चढला आणि मग तो माणूस. आता होडीत आम्ही पाचजण झालो आणि पाणी होडीच्या काठाच्या जवळ जवळ दोन इंचावर आलं.

'कोणीही हालचाल करू नका आणि बोलू नका.' जीझस म्हणाला, 'पॅपिलॉन तू आता हात थांबव; आम्ही दोघंच फक्त ते काम करतो. फक्त तुझं वल्हं गुडघ्यावर आडवं ठेव.' नंतर प्रवाहाला लागून ती आमची होडी लगेच अंधारात मिसळून गेली.

सुमारे अर्धा मैल गेल्यावर आम्ही नदीच्या मध्यावर आलो होतो. भरतीच्या लाटा कल्पनेपेक्षाही जोरात होडीवर आदळत होत्या. अगदी अंधुक दिव्यामुळे अस्पष्ट दिसणारा आमचा तुरुंग केव्हाच मागे पडला होता. आता वल्ही फक्त जीझसच मारू लागला; तीही होडी स्थिर राहाण्याइतपत.

तो म्हणाला, 'आता आपण निर्धास्तपणे बोलू शकतो. धूम्रपानही करू शकतो. मला वाटतं, आता आपण पुरेसे दूर आलो आहोत. तुम्ही कोणाला ठार तर केलं नाही ना?'

'मला बहुधा तसं वाटत नाही.'

'मग ठीक आहे. बरं मित्रा, तुला फार तर लागलेलं नाही ना?' जीझसनं जोन्सला विचारलं.

'आता काय सांगू?' जोन्स म्हणाला, 'पॅपिलॉन, माझा पाय तर मोडलेला आहे. मग आता आपण कसं करायचं?'

'आपण ते मग पाहू; पण जीझस, सध्या आपण कुणीकडे चाललो आहोत?'

'मी तुम्हाला एका छोट्या बेटावर नेऊन लपवणार आहे. ते ठिकाण नदीच्या मुखापासून वीस मैलांवर आहे. तिथे तुम्ही एक आठवडा सहज काढू शकाल, म्हणजे तोपर्यंत वॉर्डर्स आणि माग काढणाऱ्या इतर लोकांचा तुम्हाला पकडण्याचा प्रयत्न थंड पडलेला असेल. त्यांचा असा समज होणं इष्ट आहे की तुम्ही आजच्या रात्रीतच मारोनी नदीमधून समुद्रापर्यंत मजल मारली असावी. माग काढणारे लोक मोटार नसलेल्या होडीतून शोध घेतात आणि तीच गोष्ट फार धोकादायक आहे. ते जवळपास आले आणि तुमच्या बोलण्याचा किंवा खोकण्याचा आवाज त्यांनी ऐकला तर मग तुमची गच्छंतीच! विस्तवही पेटवणं कठीण! पहारेकरी मात्र तुमच्यापर्यंत पोचू शकणार नाहीत. कारण त्यांच्या मोठ्या मोटारबोटी असतात आणि तिथे नदीचं पात्र अगदी अरुंद आहे.'

[क्रमशः]

---

'चांगली होडी पैदा करायची असेल तर तुम्हाला पिजन बेटावर जावं लागेल. तिथे सुमारे दोनशे महारोगी राहत आहेत. वॉर्डर एकही नाही आणि कोणीही सुदृढ माणूस तिथे जाण्याचं धाडस करत नाही; अगदी डॉक्टर सुद्धा. इतर बेटांवर गुपचुप जाऊन ते धोकादायक महारोगी होड्या किंवा इतर गोष्टी पळवून आणतात.'

**पॅपिलॉन अणि त्याच्या दोन साथीदारांना महारोग्यांकडून अनपेक्षित मदत.**

**माणूस पुढील अंकी.**

---

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ८-२-७५ ते १४-२-७५

**बिहारच्या राजकारणाला कलाटणी मिळणार**

पंतप्रधान इंदिराजींना बिहारच्या डोकेदुखीची समस्या अजूनही सतावत आहे. त्यांच्या मनात निरनिराळे पर्याय घोळत असतीलही. एवढ्यात मुख्यमंत्री गफूर यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीहून जी मुलाखत दिली त्याचा परिणाम खुद्द श्री. गफूर यांच्या सत्तेलाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे. मध्यवर्ती सरकारात याच प्रश्नामुळे अंतर्गत घुसफूस सुरू होईल. शेवटी इंदिराजींचा कौल गफूर यांच्या विरोधी जाऊ शकेल. बिहारमध्ये राष्ट्रपतींच्या राजवटीचा विचारही चालू होईल. जयप्रकाश यांना अटक होईल असे वाटत नाही. त्याचप्रमाणे एखाद्या संघटनेवर बंदी येईल असेही वाटत नाही. बारावा मंगळ सत्तारूढ सरकारच्या मनात मात्र अविचाराचे विचार मात्र निर्माण करणार आहे. महाराष्ट्र मुंबई काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू होईल.

---

**मेष : नोकरीत दक्षता घ्या**

या आठवड्याच्या शेवटी गुरूची बारावी व्ययस्थदृष्टी तुमच्या एकंदर कर्तृत्वावर पडणार आहे. आता तुमच्या उन्नतीची सारी सूत्रे रवी-मंगळ यांच्याच हाती आहेत. समाधानाची गोष्ट एवढीच की हे दोन्ही ग्रह तुमच्यासाठी काही तरी चांगले करू इच्छितात. शनिवारी नोकरीच्या बाबतीत दक्ष राहण्याची गरज आहे. भलत्या स्वप्नाच्या आहारी जाऊ नका. मंगळवार ते गुरुवार आर्थिक उन्नती होईल. चार पैसे श्रमाचे व चार पैसे अकल्पित मिळू शकतील. कर्जाचे तगादे एवढेसे जाणवणार नाहीत. मनासारखी एखादी वस्तू घेऊ शकाल. करमणुकीची इच्छा पुरी होईल. तरुणतरुणी आपापल्या मित्रमैत्रिणींसह 'सुखात' मन रमवू शकतील. स्वतंत्र उद्योगाची एखाद्याची इच्छा कार्यान्वित होईल. महिलांच्या बाबतीत काही अकल्पित घडेल. शुभांक २-४-५

**वृषभ : लेखनाचा गौरव**

साहित्य, संगीत आणि कला हे तुमच्या मनोधर्माचे अलंकार आहेत. याच अलंकारांनी तुमचे सौंदर्य आणि कर्तृत्व या आठवड्यात वाढणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या ग्रंथाला बक्षीस मिळण्याचा योग आहे. एखादी नवी कल्पना-प्रामुख्याने नाटकाचा धागा-सापडेल व तुमच्या हातून परिणामकारक असे लेखन होऊ शकेल. रविवारी सौंदर्याची स्पर्धा तुमच्यापैकी एखादी तरुणी जिंकू शकेल. नुकतीच प्रसिद्धीस येत असलेली गायिका वा गायक सोमवार ते बुधवार या दरम्यान प्रचंड लोकप्रियता मिळवतील. नोकरीच्या दृष्टीने बढती-बदलीचा योग आहे. सोने-चांदी व कापड-व्यापार भरपूर नफा मिळवून देईल. महिलांनी, कापडांशी संबधित उद्योग सुरू करावा. शुभांक ७-८-११

**मिथून : नोकरीत अनुकूलता**

तुमच्या अवतीभवती, तुमच्या उद्योगधंद्यात व मनाच्या अवस्थेत निर्माण झालेली कोंडी आता फुटणार आहे. विशेष करून नोकरीत यावेळी चांगले योग संभवतात. पुष्कळ दिवस रेंगाळलेले बढतीचे काम या वेळी अकस्मात गती घेईल. एखाद्या खास कामासाठी तुमची नियुक्तीही होऊ शकेल. तुम्ही खाजगी नोकरीत असा वा सरकारी नोकरीत असा, तुमचे मालक तुम्हाला परदेश दौऱ्यावर पाठवण्याचा विचार करू लागतील. विज्ञान व कृषी पदवीधर यांनी प्रयत्न केल्यास प्रतिष्ठित अशी नोकरी किंवा उद्योगासाठी साहाय्य त्यांना मिळू शकेल. रविवार बुधवार व गुरुवार हे विशेष महत्त्वाचे दिवस आहेत. विद्यार्थी व तरुण वर्गाने मोहाचे क्षण टाळावेत. महिलांना वाङ्मयात व कलागुणात प्रसिद्धी मिळेल. शुभांक २-७-१०

**कर्क : प्रगतीला वेग येईल.**

खरे तर तुम्ही सतत काळजीत असण्याचे मुळीच कारण नाही. बारावा शनी असला म्हणून काय झाले ? त्याची उग्रताही आता कमी झाली आहे. या उलट या आठवड्याच्या अखेरी गुरू भाग्यस्थानी येत असून तुमच्या भावी आशाआकांक्षा तो बहरून टाकणार आहे. तुमच्या भाग्यचक्राला आगळाच वेग आणणार आहे. तुमच्या प्रगतीचा वेग वाऱ्याप्रमाणे पुढे सरकणार आहे. नोकरीधंद्याची परिस्थिती सुधारणार आहे. नोकरीत तुम्हाला आता कोणताच त्रास नाही. आजवर जो त्रास झाला तो विसरून जावा. आर्थिक परिस्थिती मात्र सुधारायला थोडी वाट पाहायला हवी. सोमवार, गुरुवार व शुक्रवार हे दिवस विशेष महत्त्वाचे आहेत. औद्योगिक क्षेत्रात काही नवे करू शकाल. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. महिलांनी नोकरीत स्वतःचे गुण दाखवावेत. शुभांक ३-६-७

**सिंह : स्थावराचा लाभ**

एकटा मंगळ तुमच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या करणार आहे. रवी रिपुस्थानातून पुढे सरकणार असला तरी तो या आठवड्यापुरता तेथे आहे. विरोधकांचे बेत उधळून लावण्यात यावेळी तुम्ही यशस्वी व्हाल. प्रामुख्याने तुम्हाला स्थावराचा लाभ या आठवड्यात होईल. कोर्टात काही वाद चालू असेल तर त्यात तडजोड होऊन तुमचा फायदा होईल. चालू नोकरीत सोमवार ते गुरुवारच्या दरम्यान एखादी महत्त्वाची घटना घडेल. ही घटना तुमच्या सार्वजनिक प्रतिष्ठेला उपकारक ठरेल. पदवीधर व्यक्तीला नोकरी मिळण्यात अडचणी येणार नाहीत. चालू नोकरीत प्रमोशनचा योग आहे. महिलांच्या कामावर त्यांचे पतिराज खूश असतील. त्यांना प्रोत्साहन मिळेल. शुभांक २-४-११

**कन्या : थोडी कळ सोसा**

कन्या राशीच्या मित्रांनो तुम्हाला संघर्षाशिवाय काहीच मिळू शकत नाही याची मला कल्पना आहे, पण त्याला इलाज नाही. भोग असतात ते भोगलेच पाहिजेत. या आठवड्यापुरती कळ सोसा. एकदा गुरू बदलला की आपले सारे व्यवस्थित होईल. पाचवा रवी लवकरच सहावा होऊन तुमच्या विरोधकांची कंबक्ती भरणार आहे. चौथा मंगळ मात्र तुमचे मानसिक स्थान हिरावून घेत आहे व राहत्या घरातही काही ना काही अडचणी निर्माण होत आहेत. पण आता थोडी कळ सोसा. जमवून घ्या. नोकरीत आपले काम की आपण अशी वृत्ती ठेवा. व्यवसायात आहे त्याचा सांभाळ करा.

व्यापारात धाडस करू नका. प्रवासाचा बेत सध्या लांबणीवर टाका. नवे वाहन खरेदी करताना काळजी घ्या. महिलांनी मनःस्वास्थ्यासाठी शुक्रवारचा उपास करावा. शुभांक ४–७–९

**तूळ : यश मिळेल**

हा आठवडा काही बाबतीत तुम्हाला भलताच यशाचा ठरणार आहे. मात्र सूर्य चौथा आहे, तो पुढील आठवड्याच्या सुरुवातीस बदलेल. तोपर्यंत मनःस्वास्थ्य मिळणे कठीण आहे. तुम्ही भाडेकरू असाल तर तुम्हाला घरमालकाकडून त्रास होईल व तुम्ही घरमालक असाल तर सरकारी कायद्याचा त्रास होईल. तुमच्या मागची जागेची वणवण अजून तरी काही काळ संपणार नाही. तिसरा मंगळ हे तुमचे बल आहे. उद्योग-व्यवसायात नवे नवे प्रयोग करायला हरकत नाही. नव्या उत्पादनाच्या क्षेत्रात लक्ष घालावे. चांगले मित्र भेटतील. कुणी विवाहाचे असेल तर त्याने यावेळी उरकून घ्यावे. अनुरूप जोडीदार गवसेल. शुभांक ४–६–१०

**वृश्चिक : नोकरीत स्वास्थ्य**

हर्शलच्या प्रतिकूलतेमुळे तुमचा खिसा अगदी मोकळा होत आहे. रेस, लॉटरी, मटका असे काही तरी खेळून तुम्ही पैसा उडवीत आहात. पण आता ही स्थिती फार काळ तुम्हाला सोसावी लागणार नाही. या आठवड्यात अनेक प्रकारच्या मोहापासून तुम्ही दूर राहू शकाल. प्रामुख्याने नोकरीत विशेष काही घडवणारा हा आठवडा आहे. स्वास्थ्य मिळावे अशा ठिकाणी तुमची बदली होऊ शकेल. प्रयत्न करावा. तुमचा इंटरव्ह्यू होऊन अजून तुम्हाला नोकरी मिळाली नसेल तर ते तुमचे काम या आठवड्यात होईल. सोमवार, बुधवार व्यवसायात धांदली-गडबडीचा जाईल. तुमचा प्रेसचा व्यवसाय असेल तर त्यात आर्थिक सुधारणा होईल. आरोग्यात सुधारणा होईल. महिलांना वरच्या दर्जाची नोकरी मिळेल. शुभांक २–५–९

**धनू : काळजी टळली आहे**

अजून मंगळाचे राशीवर प्रभुत्व आहेच. तुमचे उच्च स्थान कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही. प्रतिष्ठा, मान यांना धक्का लागणार नाही. बारावा राहू अंतःकरणात अकारण भीती निर्माण करील. पण तुमचे काहीही नुकसान होणार नाही. नोकरीतील अस्थिरपणा आता नाहीसा होईल. मालकांकडून अगर वरिष्ठांकडून निश्चित असे आश्वासन तुम्हाला मिळू शकेल. रवी तिसरा झाला की तुम्हाला तुमचे सुप्त गुण दाखवायला, तुमचे कर्तृत्व दाखवायला तुम्हाला वाव मिळेल. देवस्थानासंबंधीचा वाद तुम्हाला फायदेशीर असा मिटेल. यावेळी परदेशी प्रवासाचे जमून जावे. इंजिनियर व प्रोफेसर यांना चांगली नोकरी मिळेल. रविवार, मंगळवार व बुधवार हे दिवस व्यावसायिक प्रगतीचे, व्यापारात चार पैसे मिळतील. महिलांना यात्रा-सहलीचा योग आहे. शुभांक ५–६–१२.

**मकर : तोल सोडू नका**

सध्या तुमचे मन तापट बनले आहे. वृत्ती अस्थिर व चंचल बनली आहे. मंगळाचे प्रस्थान व्ययस्थानी असेपर्यंत अशीच परिस्थिती राहील. याच परिस्थितीतून तुम्हाला मार्ग काढावा लागणार आहे. विशेषतः मंगळवारपर्यंत तरी सर्वच बाबतीत जपायला हवे. यावेळी मालक अगर वरिष्ठ यांच्यासंबंधीच्या टीकेत तुम्ही मुळीच भाग घेऊ नका. नोकरीत तुम्हाला न आवडणारे काम करावे लागेल. पण ते मुकाट्याने करा. भांडण करू नका. ग्रह अनुकूल नसतात तेव्हा प्रतिकार करून काही उपयोग नसतो. बेकारांना नोकरीचे नुसते आश्वासन मिळेल. यावेळी खरेदी-विक्रीचा कोणताच व्यवहार करू नका. तोटा होईल. तसेच उसने पैसे देऊ नका. प्रेम व प्रणय यापासून तरुण–तरुणींनी सावध राहावे. महिलांच्या अनेक महत्त्वाकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. शुभांक ५–६–११.

**कुंभ : प्रतिष्ठा मिळेल**

तुमच्या राजकीय जीवनात काहीतरी अभूतपूर्व, आगामी शुभ घटनांची चाहूल देणारे घडावे असा हा आठवडा आहे. रवी प्रतिकूल होता तो अनुकूल होत आहे. तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक बनवणारा, राजकारणात तुम्हाला एकदम नेत्रदीपक असे स्थान प्राप्त करून देणारा हा आठवडा तुमच्या कायम लक्षात राहील. तुम्ही आमदार, खासदार असाल तर, तुम्ही राज्य वा उपमंत्री असाल तर तुम्हाला बढती मिळणार आहे. तुम्हाला प्रसिद्धी व यश मिळणार आहे. मंगळवारी एखादे अपुरे राहिलेले काम पुरे होईल. बुधवारी वाङ्मयात पैसा मिळेल. तुमच्यापैकी अनेक भाग्यवंत विवाहात बांधले जातील. लांबणीवर पडलेले विवाह चटकन जुळून येतील. नोकरीत तसे प्रतिकूल काही नाही. बेकारांना तात्पुरती नोकरी अगर व्यवसाय मिळेल. चालू नोकरीत अनुकूल बदल. महिलांना लघुउद्योगांसाठी पैसा मिळेल. शुभांक ७–८–१०.

**मीन : धर्मकार्य घडेल**

लौकरच तुमच्या राशीचा उद्गाता गुरू तुमच्या चंद्रावर प्रवेश करणार आहे व त्याची प्रसादचिन्हे याच आठवड्यापासून दिसू लागणार आहेत. गेले तेरा महिने तुमच्या बुद्धीवर आलेला अंधार आता नाहीसा होणार असून, बुद्धी प्रकाशमान होऊ लागेल. तुम्हाला छान छान कल्पना सुचणार आहेत. नव्या लेखनाची मुहूर्तमेढ यावेळी घालू शकाल. 'धर्मलंड' म्हणून तुमची टवाळी होत होती, तीही आता थांबेल. हातून धर्मकार्य घडेल. मंगळवार ते शुक्रवार जवळपासच्या तीर्थक्षेत्री प्रयाण घडेल. व्यवसायातून उठलेले तुमचे मन आता त्यात पुन्हा रस घेऊ लागेल. नोकरीत कष्ट घेऊन काम करण्याची इच्छा होईल. वरिष्ठांची मर्जी संपादन होईल. महिलांना मंगलकार्यात महत्त्वाचे स्थान मिळेल. शुभांक ३–४–८. □

बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत खरेदी करा !
मिलच्या दुकानांत खरेदी करा !!
सुपर ऑफर

## हॉन डॅट : पृष्ठ १६ वरून

म्हणून त्याचा उल्लेखदेखील करू नका.'

पण हे सगळं असलं तरी तिच्या हृदयाला कुठे तरी पीळ पडतच असे. एका स्त्रीला आपल्या पोटच्या गोळ्याला नाकारावंसं वाटावं याहून दुर्दैव ते कोणतं ? कितीही नाकारायच म्हटलं तरी तो तिचा मुलगा होता हे सत्य होतं. आणि त्याच्या ह्या साऱ्या पापकृत्यांचे आपणही दुरान्वयाने का होईना थोडेसे वाटेकरी आहोत या विचारानं तिचं डोकं भडकून उठे. आणि ती भ्रमिष्टासारखी वागू लागे. ह्या असल्या भ्रमिष्टावस्थेतच तिनं गेली सात वर्षे काढली होती. दिवसा घराबाहेर न पडता रात्री भुतासारखं एकटंच भटकण्याची तिची सवयही ह्या भ्रमिष्टपणाचाच एक भाग होता. कदाचित लोकांची नजर चुकविण्याचाही त्याच्यामागे हेतू असावा.

प्रथम प्रथम तिनं झॅमशी यावरून वाद घातला होता, त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. अशावेळी झॅम फारशी उत्तरच देत नसे. कधी कधी रागानं जोरजोरानं मान हलवीत तो तिच्या अंगावर खेकसत असे–'आई, तू मला ह्या कम्युनिस्टांच्या बाजूला वळवण्याचा कशाला सारखा प्रयत्न करत्येस ?' पण एवढं वैतागला तरी मग तो हसत असे. ते हास्य पाहून एखाद्याला वाटावं बाहेर जरी तो कितीही क्रूर नरराक्षस असला तरी आईच्यासमोर तो फक्त तिचा मुलगाच होता. पहिले काही दिवस आपला मुलगा लोकांची पोटं फाडून काळीज बाहेर काढतो ह्या तिला अफवा वाटत. तो क्रूर असेल पण इतका नरपशूसारखा वागत असेल यावर तिचा विश्वास बसत नव्हता. ती तिला अतिशयोक्ती वाटे. पण एके दिवशी तिचा भ्रमनिरास झाला.

त्या दिवशी झॅम तिला भेटायला घरी आला तेव्हा त्याच्या ओठांच्या कडेला रक्त लागलेलं पाहून ती एकदम भीतीनं ओरडली– 'झॅम, तू कुठे पडलास का ? तुझ्या तोंडाला लागलंय आणि रक्त येतंय त्यातून.' एक शब्दही न बोलता झॅमनं हात आडवा करून उपड्या मनगटाला आपलं तोंड पुसलं आणि तो घराबाहेर पडला. त्याच वेळी का माय गावातून धावत किंचाळत आली. तिचा चेहरा पांढराफटक पडला होता; तिला धाप लागली होती. तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. मोठमोठ्यानं हुंदके देत तिनं अखेरीस स्वतःच्या डोळ्यानं पाहिलेली घटना आईला सांगितली. झॅमनं समुद्रकिनाऱ्यावर एका माणसाच्या पोटात सुरा खुपसून त्याचं काळीज बाहेर काढलं होतं आणि शेजारच्या एका झोपडीत जाऊन तव्यावर भाजून खाल्लं होतं. का झोईला हे ऐकून मूर्च्छाच आली. ती भानावर आली तेव्हा तिला झॅमचा रक्त लागलेला चेहरा आठवला. आणि तिला परत मूर्च्छा आली.

आणखी एके दिवशी वाम रँग गावावर हल्ला करून झॅमनं काही लोकांना अटक करून आणलं होतं. ते क्रांतिकारक होते की सामान्य नागरिक होते हे नक्की ठरायचं होतं. झॅम त्यांची पोटं फाडणार आहे असं कळताच का झोई धावत त्या ठिकाणी गेली. पण तिला त्या ठिकाणी जायला उशीर झाला होता. ती तिथं पोचण्यापूर्वीच झॅमनं त्या कैद्यांच्या गुदद्वाराची भोकं सुरीनं एवढी मोठी केली होती की त्यानं जेव्हा त्यांना सक्तीनं उभं केलं तेव्हा त्यांची आतडी त्या भोकातून खाली लोंबू लागली होती ! ते दृश्य पाहून एक जोराची किंकाळी मारून का झोई रस्त्यातच खाली कोसळली होती. झॅमच्या सैनिकांनी तिला उचलून घरी आणलं होतं. जेव्हा ती परत शुद्धीवर आली तेव्हा शेजारी उभ्या असलेल्या का मायकडे बघत, हातवारे करीत, भिंतीवर डोके आपटीत ती किंचाळ लागली होती–'झॅम, तुझं तळपट होवो; तुझा शेवटही असाच होईल. देव तुला शिक्षा करील.'

गावातले लोक असं म्हणतात की त्या दिवसापासून का झोईला वेड लागलं होतं.

वास्तविक तिला वेड लागलं होतं असं म्हणणं बरोबर ठरणार नाही. कारण वेडाच्या लहरीत ती कसलाच त्रास देत नसे, दंगा मस्ती, आरडा ओरडा करीत नसे. उलटपक्षी लोकांना टाळण्याचाच प्रयत्न करायची. तिला लोकांची भीती वाटायची. तिचा मेंदूही तल्लख होता. बा ऊ कडून उधारीनं आणलेली एकही वस्तू ती विसरत नसे. ती स्वतः पिशव्या, मडकी विकायला बाजारात जाई तेव्हा विक्रीची रक्कम बरोबर आणून का मायच्या हवाली करीत असे. पिशव्या बनवण्यातही कधी तिची चूक होत नसे. उलटपक्षी घरी येणाऱ्या प्रत्येक माणसाचा, रस्त्यात दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आपण काहीतरी अपराध केला आहे अशा भावनेनं ती त्यांचे पाय धरीत असे. हाई थेप, नाम टान, बा रेन, साऊ, सू, कुएन यांना कितीतरी वेळा तिची पायाची मिठी सोडवावी लागत असे. पूर्वीच्या काळी झॅमला कसं समजवावं हे सुचवायला किंवा झॅमच्या बाबतीत पूर्ण निराशा झाल्यावर तिची समजूत घालायला हीच माणसं नेहमी तिच्या घरी येत असत.

एकदा हाई थेपनं तिला सांगितलं होतं– 'का झोई, काकी, तुम्ही अशा काळजी करीत बसू नका. तुम्हाला आणि का मायला आम्ही ओळखतो. तुम्ही दोघीही आम्हाला आवडता. आम्ही तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत अंतरणार नाही, यावर विश्वास ठेवा. मग काळजी कसली करता ?' का झोईला हे ऐकून भडभडून आलं होतं.

जेव्हा गावात पहिलं राजकीय निदर्शन आखण्यात आलं होतं तेव्हा तिच्या मनाची चुळबुळ चालली होती. एका मनानं तिला त्यात भाग घ्यायचा होता, तर दुसरं मन सांगत होतं, तुझाच मुलगा तर सरकारचा प्रतिनिधी आहे. त्याच्या विरुद्ध तर निदर्शन चाललंय. तू स्वतःच्या मुलाला आवरू शकत नाहीस तर निदर्शनात भाग घ्यायचा ढोंगी मानभावीपणा कशाला करत्येस ? अशी तिची ओढाताण चालली होती.

पण निदर्शनाच्या आदल्या दिवशी साऊ आणि इतर स्त्रिया तिच्या घरी आल्या होत्या. त्यांनी तिची समजूत काढली होती व निदर्शनात भाग घ्यायची खास विनंती केली होती. सगळे गावकरी आपल्याला त्यांच्यातीलच एक मानतात हे पाहून का झोईला अत्यानंद झाला होता.

–त्यानंतर तिनं एकही निदर्शन सोडलं नव्हतं.

अशाच एका निदर्शनात ती झॅमच्या बंदुकीपुढे उभी राहिली होती आणि आपला आईचा अधिकार गाजवत तिनं झॅमची बंदुक बाजूला करून निदर्शकांना मार्ग मोकळा करून दिला होता.



झामनं एका माणसाच्या पोटात सुरा खुपसून त्याचं काळीज बाहेर काढलं

का झोईच्या अर्धवटपणापाठीमागे अशा असंख्य घटना होत्या. हॉन डॅटमधलं कुणीच तिचा राग करीत नसे. उलट झॅम आणि त्याचा बाप मू यांच्या पिळवणुकीला बळी पडलेली एक दुर्दैवी स्त्री म्हणूनच ते तिच्याकडे बघत. ते तिला आपल्यापैकीच एक मानीत– आणि तरीही आपण झॅमची आई आहोत, त्याच्या नसानसात आपलं रक्त वाहत आहे ह्या जाणिवेनं ती अस्वस्थ होई आणि मनात कुढत बसे.

का मायची गोष्ट थोडी निराळी होती. तिच्या मनात असा गोंधळ नव्हता. ती झॅमला आपला भाऊ मानायला कधीच तयार नव्हती. चारचौघात ती तसं स्पष्टपणे बोलूनही दाखवीत असे. ती त्याला परका मानीत असे. त्याचा द्वेष करीत असे. तो कधी त्यांच्या घरी आलाच तर त्याच्यापाशी एक शब्दही बोलत नसे. उलट तिच्यासमोर कोणी त्याचं नाव जरी उच्चारलं तरी ती खवळून उठत असे.

का मायही क्रांतिकार्यात जुटली होती. क्रांतीचं वारं तिच्या अंगाअंगात खेळत होतं. ती तरुणांच्या संघटनेची सदस्य होती. पक्षाच्या दोन तीन बैठकांना तिला निमंत्रण देण्यात आलं होतं. आणि त्या बैठकीत भाग घेऊन तिची क्रांतिकार्य करण्याची इच्छा अधिकच उग्र आणि बळकट झाली होती. क्रांतीसाठी कोणतंही काम करायला तिची ना नसे. मग काम रस्त्यावर सुरुंग पेरायचं असो की रस्त्याच्या कडेनं आडोसे खणण्याचं असो. ती ते सारख्याच उत्साहानं करीत असे. तिचा आवाजही गोड होता. ह्यू के नाटकातील जुनी गाणी ती गाऊ लागली की मोठ्या माणसांच्या जुन्या स्मृती जाग्या होत. त्यांना थाच खा आणि का झोईनी रंगवलेली नाटकं आठवू लागत. का झोईच्या डोळ्यात तर अश्रूच उभे राहत.

झॅमनं लष्करात नोकरी पत्करल्याचं कळलं तेव्हापासून का झोई पिऊ लागली होती ती आजतागायत.

रोज सर्वसाधारणपणे ती एखादा ग्लास पीत असे. आज तिनं पुन्हा बाटली उघडलेली पाहताच का मायनं कुरकुरत म्हटलं–' आई, पुरे हं. एक ग्लास चिकार झाला. तुला आणखी झेपायची नाही. '

इतक्यात बाहेर कुत्री भुंकल्याचा आवाज ऐकू आला. त्यापाठोपाठ कुणाची तरी हाकही ऐकू आली– ' का माय, आहेस का घरी ?'

आवाज कुएनचा होता. का मायनं आपलं काम थांबवलं, ' आले ह ' म्हणत ती उठली. दार उघडून ती अंगणात आली तेव्हा कुएननं हात धरून तिला बाजूला नेलं. आणि हलक्या आवाजात विचारलं– ' तुला कळली ना बातमी ?'

' झॅम आलाय हीच ना ?'

' नाही एवढेच नाही. लवकरच आपल्या गावावर हल्ला होणाराय. आपल्याला गावकऱ्यांना सावध करायचंय. ट्री टॉनमध्ये बरेच सैनिक जमले आहेत. आपल्या क्रांतिकारकांची अर्थातच तयारी आहे. नुकतेच आम्ही रस्त्यात सुरुंग, काचा पेरून ठेवल्या आहेत. खड्डे खणले आहेत. '

' मग मला का नाहीस बोलवलंस ?' का मायचा स्वर निराशेनं भरला होता.

' ते जाऊ दे. तुला दुसरी खूप कामं करायचीत. तू सनदशीर चळवळीत भाग घ्यावास असं ठरलंय. तुला माहीतच आहे, वनरक्षकांचं नेतृत्व झॅम करतोय. '

' ते माहीत आहे मला. '

' मग हे बघ. सैनिक इकडे आले की दोन प्रकारे लढयाला सुरुवात होईल. क्रांतिकारकांचे सुरुंग आणि हातबॉम्ब त्यांचा घ्यायचा तो समाचार घेतीलच. पण त्याचबरोबर सनदशीर असहकाराची चळवळही चालू राहील. शत्रू तुला अद्याप क्रांतिकारकांपैकी एक म्हणून ओळखत नाही. किंबहुना झॅमची बहीण म्हणूनच ओळखतो. म्हणूनच क्रांतिकारक आणि सनदशीर चळवळीतला दुवा म्हणून तुला काम करायचंय. शिवाय क्रांतिकारकांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याच्या कामावरही तुला लक्ष ठेवावे लागेल. '

' ह्यापेक्षा सुरुंग पेरायचं काम मला अधिक आवडेल. '

' हे बघ. कामाची वाटणी झालेली आहे. ते काम दुसऱ्यांना देण्यात आलं आहे. '

का मायनं थोडासा विचार केला आणि समजुतीच्या स्वरात म्हटलं– ' ठीक आहे, मला दिलंय ते काम मी करीन. पण खरं सांगू, ह्या सैनिकांचं तोंड सुद्धा पाहू नये असं मला वाटते. तुला माहीतच आहे म्हणा ते. '

कुएननं तिच्या गळयात हात टाकीत म्हटलं– ' सैनिकांशी संबंध ठेवायला इथे कुणाला आवडतंय ? पण तरीही आपल्या जबाबदारीचा एक भाग म्हणून तेही करावं लागतंच. आता पार्टीनं ही जबाबदारी तुझ्यावर सोपवली आहे. कधीही डोकं भडकू न देता तुला हे काम पार पाडायचंय. सैनिकांशी अदबीनं वागायचं. जरूर पडलीच तर त्यांच्यासाठी प्रेमगीतंसुद्धा म्हणायची, समजलं ना ? ह्या कामाच्या बाबतीत सगळा भार तुझ्यावर आहे. '

का मायनं आपले ओठ दाताखाली घट्ट दाबून धरले आणि मानेनंच हो म्हटलं. मग चेहरा हसरा करून तिनं कुएनला ' टाटा ' केला, तिचा हलकासा पापा घेतला आणि ती घरात वळली.

[ क्रमशः ]

# कुरुक्षेत्र मुंबई : पृष्ठ ९ वरून

विश्वा परतला. तर ब्रिजेश पटेलकडून ज्या वेळी जास्तीत जास्त अपेक्षा होत्या त्या वेळीही पटेलने निराशा केली. अपयशी पटेल आपल्या दुर्दैवाला बोल लावीत परतला.

क्रिकेटच्या प्रेक्षकांची स्मृती फार उथळ असते. एक डोळे दिपवणारा पराक्रम त्यांच्या समोर पेश केला की संबंधितांची हजार पापे ते विसरून जातात आणि डोळ्यासमोर दिसणाऱ्या पराक्रमाला दिलखुलास दाद देतात. पराभवाच्या दिशेने जाणाऱ्या या सामन्यातही याच पटेलने सहाव्या दिवशी जान भरली तेव्हा त्याचे मागील सर्व अपयश चुटकीसरशी विसरले गेले. नाबाद राहाण्याचे श्रेय घेऊन सत्तरी ओलांडलेल्या ब्रिजेशने भारतीय संघाला पराभवापासून वाचवले नाही. तशी अपेक्षाही नव्हती. पण पराभवातही शान सांभाळता येते याची प्रचिती त्याच्या आक्रमक फलंदाजीने खचित आणून दिली. काही आशावादी प्रेक्षकांच्या मनामध्ये गायकवाड टिकला असता तर असे मोठे आशावादी प्रश्न चिन्ह होते. गिब्जच्या ऑफ ब्रेक पुढे गायकवाड उभा राहाता तर... अर्थात जर ... तर करायचे तर तसे पहिल्या दिवसापर्यंत मागे जाता येईल. पण अखेरच्या दिवशी–अनेक रसिकांच्या मनामध्ये ही ' जर...तर 'ची जी वावटळ उमटली त्या मागे हा बावीस वर्षाचा खंदा ब्रिजेश उभा होता ! ! सहाव्या दिवशीचा ब्रिजेशचा खेळ ज्यांनी पाहिला त्यांना हा तडफदार फलंदाज सातत्याने नऊ सामन्यात अपयशी ठरला असेल हे सांगून खरे वाटले नसते. अर्थात सतत अपयश पदरी येऊनही ब्रिजेश पुनः पुन्हा मैदानात दिसला त्याची मेख त्याच्या क्षेत्ररक्षणामध्ये आहे. अन्यथा कानिटकर, पार्थसारथी यांना एक-दोन चुकांबरोबरच बाहेरचा रस्ता दाखवणारी निवड समिती ब्रिजेशच्या बाबतीत इतकी दिलदार खचित राहती ना. वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावात मैदानाला रणधुमाळीचे स्वरूप आले होते. धावांचा पाऊस पडत होता. हतबल होऊन वेस्ट इंडिजची धावसंख्या मन मानेल तशी फुगु देणाऱ्या क्षेत्ररक्षकामध्ये नेक कामगिरी बजावणारा एकटा ब्रिजेश होता हे विसरता येणार नाही. ग्रिनिज आणि लॉईड यांचे दोन सुंदर झेल ब्रिजेशने घेतले. त्याचे मोल कमी लेखून चालणार नाही. तात्पर्य काय तर ब्रिजेश पटेल हे भारतीय क्रिकेटमध्ये दीर्घकाळ गाजणारे नाव आहे याची पोच घ्यायला मालिकेतल्या शेवटच्या सामन्यातल्या शेवटच्या दिवसापर्यंत थांबावे लागावे हा एक मोठा विचित्र योग मानावा लागेल.

आता पुन्हा सामन्याकडे. सामन्याचें नेतृत्व मन्सूर अली पतौडी नामे बहाद्दराकडे होते. मधल्या फळीतला हा एकेकाळचा भरवंशाचा फलंदाज हाती बॅट धरायलाही घाबरत असावा असे वाटले. अन्यथा आणीबाणीच्या वेळी विश्वनाथ माघारी आल्यावर हा स्वतः मैदानात उतरता. प्रसन्ना आणि बेदी यांची बॅटिंग ऑर्डर बदलल्यासारखी झाली आहे. निसटत्या क्षणी खंदा फलंदाज धोक्यात येऊ नये म्हणून सरत्या दिवसाची उरली घडी काढण्यासाठी अलबत्या–गलबत्यांना पाठवण्यात येते. ही साधारणतः अपवादात्मक मानावी अशी बाब इथे हा नियम होऊ पहात आहे. बरे बळीच्या बकऱ्याने वेळ काढून त्याच्यावर सोपवलेली कामगिरी बजावली तरी ज्याच्यासाठी हा बळी वेदीवर चढवण्यात आला त्याचा थोडा फार कस तरी त्याच्या फलंदाजीमध्ये दिसू नये काय ? या मन्सूर अलीला त्याच्या वाटचाला आलेले चोवीस चेंडू खेळताना ज्यांनी पाहिले आहे ती मंडळी अवाक न होती तरच आश्चर्य. नऊ धावा जमवणारा हा कर्णधार, दुसऱ्या डावात पहिल्या डावापेक्षाही केविलवाणे दर्शन देऊन गेला. त्याचा संघ, त्याचे चाहते, भारतीय क्रिकेटचे भले पाहणारे त्याचे दुष्मन, सर्वांची एकच अपेक्षा होती, मन्सूरने आता तरी खेळावे. कर्णधारपदाची शान राखावी. विजयी मालिका देणाऱ्या अजित वाडेकरच्या अपयशी दौऱ्यानंतर त्याच्या तोंडात माती घालणाऱ्या कलमबहाद्दरांना आता काय म्हणायचे आहे ? अगदी नाइलाज झाल्यावर हा मैदानात आला. तो इतका ' फेबल ' होत होता की त्याच्याकडे पहाण्यापेक्षा शर्मिलाच्या चेहऱ्यावरील भाव निरखणे मजेशीर वाटत होते. दुसऱ्या डावातही मन्सूर दशक ओलांडू शकला नाही आणि या दशकातही त्याला ०, ६, ७ अशी तीन जिवदाने !

वेस्ट इंडिजचे क्षेत्ररक्षण विशेषतः धावा वाचवण्याच्या दृष्टीने सरस होते. पण झेल सोडण्याची उदंड पापे त्यांच्या हातूनही घडली. भारतीय फलंदाज वेगवान माऱ्याला तोंड देऊ शकत नाहीत ही बाब शरमेची असली तरी समजण्या सारखी आहे. गिब्ज–बॅरेटच्या ' ऑफ स्पिन–लेग स्पिन ' विरुद्ध आपल्या फलंदाजीचा कणा कोलमडून पडावा ही खेदजनक बाब आहे. गिब्ज हा तर फिरकी गोलंदाजांचा राजाच ! पण जगत्मान्यता पावलेली फिरकीची त्रयी ज्या देशात आहे त्या देशातील फलंदाज गिब्ज नमवतो. यात गिब्जचा पराक्रम असला तरी आपल्या फलंदाजीचा षंढपणाही आहेच. वेगवान मारा यांच्या वाटचाला विदेशी होणाऱ्या दौऱ्यात, अथवा स्वदेशी आलेल्या पाहुण्यांना तोंड द्यावे लागते त्याच वेळी होणार–होत आलेला आहे. या अपरिचित प्रांतातील ससेहोलपट ही बुद्धिला न पटणारी बाब वाटत नाही. पण वर्षभर फिरकीचा मारा करणारे गोलंदाज अवती भवती असताना त्यांच्या गोलंदाजीला तोंड देणारे आमचे फलंदाज खेळपट्टीची फिरकीला म्हणावी तशी साथ नसतानाही गिब्ज लीलया गुंडाळतो ही बाब बुद्धीला, भावनेला पटतच नाही. पहिल्या डावामध्ये गिब्जने भारताचे चार खेळाडू खावेत याच मोठे आश्चर्य वाटते.

सामन्यात एक अवस्था अशी होती की भारतीय संघ ' फॉलो–ऑन 'ची नामुश्की लीलया टाळणार असे वाटत होते. चौथ्या दिवसाअखेर धावसंख्या चार बाद ३५० वरून ६ बाद ३७३ वर घसरल्यावर या विश्वासाला पहिला तडा गेला तरी ४५० धावांची अपेक्षा बाळगणे हे स्वप्नरंजन नव्हते. पण आधीच्या पराक्रमाची माती व्हावी अशी अवस्था निर्माण झाल्याने ज्याच्याकडून फलंदाजीमध्ये अपेक्षा नव्हत्या अशा बेदीला जिवाच्या आकांताने फॉलो ऑन टाळण्यासाठी प्रयत्न करावे लागले. बेदी–घावरीने धावसंख्या ३९२ वरून ४०६ वर नेली नसती तर सहाव्या दिवसाची गरज पडली

असती की नाही याचीही शंका वाटते. ९८ धावात ७ बळी घेणाऱ्या गिब्जने केवळ भारतीय फलंदाजीचा कणा मोडला नाही तर आपल्या संघाच्या विजयाची मुहूर्तमेढही रोवली.

### झंझावाती फलंदाजी

भारताने ' फॉलो-ऑन ' टाळला खरा, पण केवळ तांत्रिक अर्थाने. कारण शर्थीची झुंज देऊन ही नामुश्की टाळली असली तरी १९८ धावांचे ओझे भारतीय संघाच्या उरावर होते. स्वाभाविकपणे शक्य तेवढ्या झपाट्याने धावा गोळा करणे, शक्य तितक्या लवकर डाव घोषित करणे व उरलेल्या वेळेचे आणि धावांचे गणित भारतीय संघाला पेलणार नाही अशी अवस्था झाल्यावर–' खेळा बेट्यांनो ' असे आव्हान देऊन भारतीय संघाला फलंदाजी करण्यास वाट करून देणे–एवढ्या माफक उद्देशाने वेस्ट इंडिज संघ फलंदाजीस उतरला. किती गडी बाद होतात याला त्यांच्या लेखी महत्त्व नव्हतेच. धावा किती जमतात, आणि काय वेगाने जमतात या गोष्टीवरून सामन्याची त्यांना अनुकूल असलेली वाटचाल तशीच चालू ठेवणे वेस्ट इंडिज संघाला आवश्यक होते.

धावा कमी सुटाव्यात याच उद्देशाने मन्सूरअलीने घावरी–सोळकर मारा लांबवला पण–सर्वसाधारणपणे भारतीय संघाची दृष्टी लॉइड डाव घोषित कधी करतो यावरच लक्ष ठेऊन होती. फलंदाजांना जरबेत ठेवण्याचे काम एकट्या गोलंदाजाचे नसते. कुशल नेतृत्त्वाखाली मैदानावर हलणारा संघ अशी जरब बसवू शकतो. पण असा प्रयत्नही झाल्याचे जाणवले नाही. उलट क्षेत्ररक्षणासाठीही नाव असलेल्या गायकवाड, व्यंकटराघवन या मंडळींनी दोन धावा जिथे मिळणे शक्य होते तेथे चार धावा देण्याचे औदार्य दाखवले. अत्यंत खचलेल्या अवस्थेमध्ये भारतीय संघ मैदानावर वावरत होता.

वेस्ट इंडिजची बाजू एवढी बळकट. सामना जिंकायचा असेल तर वेगाने धावसंख्या जमवणे आवश्यक. अशा परिस्थितीत पहिल्या तासात केवळ ४८ धावा जमाव्यात हे मोठे भूषणावह नव्हते. पण तासाभरात एकंदर परिस्थिती लक्षात आल्यावर उरल्या दोन तासामध्ये या मंडळींनी भारतीय संघाला पळताभुई थोडी करून सोडली. चौकारांचा पाऊस पाडला. लॉइडने प्रसन्नाला दोन जोरदार षटकार लगावले. रिचर्डसने घावरीला एका षटकात चार वेळा सीमापार केले. उरला सुरला धीर खचून जावा अशी परिस्थिती होती. पाहुण्या संघाच्या जबर फटक्यांनी सीमापार गेलेले चेंडू परत आणता आणता भारतीय संघाची दमछाक झाली. बघता बघता दोनशे पाच धावा जमा झाल्या. लॉइड सुखावला. चहा-पाणी करायला त्याचे गेलेले साथीदार पुन्हा उतरवण्याची गरज नव्हती. ही परिस्थिती पाचव्या दिवशीची. या दिवशीच्या तासा दीड तासाच्या खेळात भारतीय फलंदाजीला खिंडार पडले की सामना खिशात घातल्या सारखाच होता. इंजिनिअर, गावस्कर, विश्वनाथ आपण परतवू असे स्वत: लॉइडलाही वाटले नसेल. पण भारतीय फलंदाजी एकदा मोडायला लागली की तिचा वेग चमत्कारिक असतो. वर उल्लेखलेले खंदे वीर पाचव्या दिवशी परतले आणि ' प्रेस बॉक्स ' थंड झाली. काल परवा कलम चालवू लागलेल्या पोरापासून तो हयातभर हाच धंदा करणाऱ्या मंडळीपर्यंत सगळ्यांना जे समजायचे ते समजून चुकले होते. आता प्रश्न फक्त वेळेचा होता. बाहेरगावच्या मंडळींनी आपल्याला कोणत्या गाडीने परतता येईल याचे आडाखे बांधण्यास प्रारंभ केला होता.

सामन्याच्या अखरच्या दिवशी जी वृत्तपत्रे हाती आली त्यांनी पराभव कबूल केल्यातच जमा होता. तथापी ह्यात घालवलेल्या मंडळींनाही निर्विवाद भविष्य वर्तवण्याची हिंमत नसल्याने बहुतेक मंडळी ' केवळ चमत्कारच भारतीय संघाला वाचवू शकेल ' हे किंवा अशा अर्थाचे वाक्य घालण्यास विसरली नव्हती. भोळी भाबडी क्रिकेटप्रेमी गेलेल्यांच्या नावाने बोटे मोडत उरलेल्या मंडळींबाबत अडाखे बांधत होती. याही मंडळींनी पतौडीला मात्र हिशेबी धरला नव्हता. (व्वा कर्णधार व्वा ! ! )

या अखेरच्या पर्वातील एक तेज शलाका म्हणजे अंशुमान–पटेल भागिदारी. त्याचा तपशील तर वर येऊन गेलाच आहे. तर यथाकाले शेवटचा खिलाडी ज्या पद्धतीने बाद व्हावा त्याच पद्धतीने चंद्रा बाद झाला. आणि कोणताही दोष नसताना दंगलीमुळे गेलेली नव्वद मिनिटे मागणाऱ्या पाहुण्या संघाला स्पष्ट नकार देणाऱ्या व्यवस्थापक मंडळींना पाहुण्या संघाने दोन तास शिलकी राखूनच मोकळे केले. सामन्याचे खूप वाजले.

सामना म्हटला की हारजीत आली. त्याची खंत नसावी पण टक्कर बरोबरीने झाली तर या विधानाला अर्थ. केविलवाण्या परिस्थितीत दोन सामने हरल्यावर विदेशी गढूळ झालेले स्वदेशी निस्तेज होऊन गेले होते. लागोपाठचे दोन सामने जिंकल्याने–क्रिकेट कुरुक्षेत्री झडलेली अखेरची झुंज वातावरण चेतवणारी होती. निर्विवादपणे सरस असलेल्या वेस्ट इंडीज संघाने सामन्यावर पहिल्या दिवशीपासूनच प्रभुत्त्व मिळवले हे खरे असले तरी सामन्यातील काही क्षण भारतीय फलंदाजांनी तेजाळवून सोडले. झुंज बरोबरीची नव्हतीच. पण ती पूर्ण एकांगी झाली नाही त्याचे श्रेय आपले. सामना संपला. मालिका गेली. विजयश्री पुन्हा रुसली. हे सारे खरे पण ब्रिजेश पटेल,अंशुमान, घावरी ही नवीन दमाची मंडळी खो देऊन आत आली. आता या खेळातील पतंगाचा दोर यांनीच संभाळावयाचा आहे. □ □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अपूर्व सवलत !
अर्थात् सिंगर कडूनच

# किंमत ३ महिन्यात द्या आणि आजच आपलं मेरिट* शिलाई यंत्र घ्या

## विशेष म्हणजे, लिस्ट प्राइसवर एकहि पैसा अधिक न देता.

"खरोखरच आश्चर्यकारक"

आता सिंगर आपणास एक अपूर्व सवलत देत आहे. हप्तेबंदीने खरेदी, पण जादा किंमत मात्र नाही.





"अय्या, किती किती बचत !"

किंमत तीन महिन्यात सवलतीने दिल्याने आपली किती बचत होते पहा. आपणास लिस्ट प्राइसवर एकहि पैसा अधिक द्यावा लागत नाही. शिवाय आपला पैसा किती झटपट वसूल होतो ते पाहिल्यावर आपले आपल्यालाच आश्चर्य वाटेल. आणि त्यानंतरची सगळी बचतच बचत !

"एकहि जादा पैसा द्यायला नको !"

साधारणपणे हप्तेबंदीने खरेदी करताना थोडी जादा किंमत पडते. माहीत आहे कां ? कंपनी आपणास जी सवलत देते त्याचा तो मोबदला असतो. आणि तो योग्यहि असतो. कारण आपण इकडे मेरिट शिलाई यंत्राचे हप्ते भरता, तर तिकडे आपली बचतहि होत असते ! (शिलाईचा खर्च वाचतो.)






"इतकी नामी योजना फार दिवस राहाणार नाही"

खरोखरच नामी ! अशी अपूर्व सवलत थोडया काळाकरितासुद्धा फक्त सिंगरच देऊ शकतात. तर विलंब नको. या सवलतीचा फायदा अवश्य घ्या. अशी संधि भाग्यानेच मिळते. आपल्या नजीकच्या सिंगर दुकानास अगर विक्रेत्याला भेट द्या.

सर्व जगाला ठाऊक आहे की, शिवणकलेचे पहिले शिक्षक, आम्ही.

सिंगर

सिंगर सोइंग मशिन कं. २०७, डी. एन. रोड, मुंबई ४००००१.



* सिंगर कंपनीचा ट्रेडमार्क.

CHAITRA-SM-79-MAR


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**